सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर गुरूवार, दि. २४ एप्रिल २०२५ वर्ष - तिसरे अंक २३ पाने : ८ किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## पहलगाम हल्ल्यानंतर भारताची घुसखोरी विरोधात कठोर मोहीम!

### चकमकीत दोन अतिरेकी ठार, १० किलो खएऊआणि शस्त्रसाठा जप्त

बारामुल्ला : जम्मू काश्मीर येथे पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर संपूर्ण जगात एकच खळबळ उडाली आहे. अचानक झालेल्या या हल्ल्यानंतर सुरक्षा दलांनी काश्मीर खोऱ्यात दहशतवाद्यांचा खात्मा करण्यासाठी ऑपरेशन सुरू केले. काल रात्रीच्या सुमारास बारामुल्लामध्ये झालेल्या भारताची घुसखोरीविरोधी मोहिमेदरम्यान सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमध्ये जोरदार गोळीबार झाला. या गोळीबारात दोन दहशतवाद्यांचा खात्मा झाला असून १० किलो आयईडी आणि शस्त्रसाठा जप्त झाला आहे.

१६१ इन्फंट्री ब्रिगेडचे कमांडर ब्रिगेडियर मयंक शुक्ला यांनी दिलेल्या माहितीनुसार, गेल्या काही दिवसांपासून भारतीय सुरक्षा दलांना गुप्तचर संस्थांकडून उरी सेक्टरमध्ये पाकिस्तानी दहशतवाद्यांच्या हालचालींबद्दल सतत माहिती मिळत होती. . २२ आणि २३ एप्रिलच्या मध्यरात्री, पहाटे १ वाजता, भारतीय सैन्याला उरी नाल्याजवळील एका लॉन्चपॅडवर दहशतवाद्यांच्या उपस्थितीची माहिती मिळाली. त्यानंतर काल रात्री घुसखोरीविरोधी मोहीम राबवण्यात आली. यावेळी एलओसीजवळील दहशतवाद्यांच्या हालचालींचा मार्ग काढण्यात आला आणि त्यांनी पहाटे ३ वाजता एलओसी ओलांडली. दोन तास सतत गोळीबार झाल्यानंतर, सुरक्षा दलांनी हल्ला करून दोन दहशतवाद्यांना कंठस्नान घातले.

त्याचबरोबर आमच्या सुरक्षा दलांनी या घनदाट जंगलात निर्जंतुकीकरण आणि शोध मोहीम राबवली. जम्मू आणि काश्मीर पोलीस त्यांची ओळख पटवण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यांच्याकडून शस्त्रे जप्त करण्यात आली आहेत - २ एके रायफल, एक ९ मिमी चायनीज पिस्तूल, मॅगझिन आणि मोठ्या प्रमाणात दारूगोळा. याव्यतिरिक्त, एक १० किलो आयईडी देखील जप्त करण्यात आला आहे, असे ते म्हणाले.

## चौघांची ओळख पटली; दोन पाकिस्तानी, दोन स्थानिक



जम्मू : जम्मू-काश्मीरमधील पर्यटनासाठी प्रसिद्ध असलेल्या पहलगाममध्ये मंगळवारी झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर संपूर्ण देश हादरला. या भीषण घटनेत २६ निरपराध पर्यटकांचा मृत्यू झाला असून, काहीजण गंभीर जखमी झाले. विशेष म्हणजे, या हल्ल्यात दहशतवाद्यांनी पर्यटकांची नावं आणि धर्म विचारून निवडक हत्या केल्याचे उघड झाल्याने संतापाचा अजूनच उद्रेक झाला आहे. या हल्ल्यानंतर तपास यंत्रणांनी केलेल्या चौकशीत चार दहशतवाद्यांची ओळख पटली असून, त्यापैकी दोन पाकिस्तानी आणि दोन स्थानिक असल्याचे स्पष्ट झाले आहे. हल्लेखोरांचा एक फोटो देखील समोर आला आहे. बैसरन परिसरात हा हल्ला करण्यात आला होता. विशेष म्हणजे, चार जणांनी थेट हल्ला केला, तर आणखी तीन जण दूरवरून कारवाईवर लक्ष ठेवून होते, अशी माहितीही समोर आली आहे.

## अतिरेक्यांच्या हल्ल्यात महाराष्ट्रातील सहा जणांचा मृत्यू

मुंबई : पहेलगाम येथे अतिरेक्यांनी केलेल्या हल्ल्यात महाराष्ट्रातील सहा जणांचा मृत्यू झाला. यात तीन डोंबिवलीकर, दोन पुणेकर आणि एक पनवेलचा रहिवासी आहे. मृत्युमुखी पडलेल्या महाराष्ट्रातील पर्यटकांचे पार्थिव आणि नातेवाईकांना पुन्हा राज्यात आणण्याची प्रक्रिया महाराष्ट्र शासनाने सुरू केली आहे.

मुंबईत मंत्री आशिष शेलार आणि मंत्री मंगलप्रभात लोढा हे मुंबई विमानतळ येथे समन्वयासाठी असतील, तर पुणे विमानतळावर मंत्री माधुरी मिसाळ यांच्याकडे जबाबदारी सोपविण्यात आली आहे. मंत्री गिरीश महाजन हे श्रीनगरसाठी रवाना होत आहेत. इतरही पर्यटकांना परत आणण्यासाठी व्यवस्था करण्यात येत आहेत. ही माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

श्रीनगर येथे पर्यटकांचे पार्थिव आणि त्यांच्या नातेवाईकांना विमानात बसवून देण्यासाठी खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांचे स्वीय सहाय्यक अभिजित दरेकर आणि त्यांची टीम काल रात्रीच श्रीनगरमध्ये पोहोचली आहे. तर मुंबईत पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील आणि गृहराज्यमंत्री योगेश कदम हे समन्वयासाठी उपस्थित राहणार आहेत. ही माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

जम्मू काश्मीरमध्ये अडकलेल्या महाराष्ट्रातील इतर पर्यटकांना सुखरूप परत आणण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. या पर्यटकांच्या मदतीसाठी शिवसेनेची एक टीम श्रीनगरमध्ये तळ ठोकून आहे. संजय लेले आणि दिलीप देसले (पनवेल) यांचे पार्थिव श्रीनगर-मुंबई एअर इंडियाच्या विमानाने मुंबईत आणण्यात येणार आहे. हे विमान आज दुपारी १२ वाजून ५ मिनिटांनी मुंबईसाठी श्रीनगर येथून उड्डाण करणार आहे. पुण्यातील कौस्तुभ गणवते आणि संतोष जगदाळे यांचे पार्थिव संध्याकाळी ६ वाजता निघणाऱ्या विमानाने पुण्यात आणले जाईल. तर डोंबिवलीचे रहिवासी असलेल्या हेमंत जोशी आणि अतुल मोने यांचे पार्थिव घेऊन येणारे विमान १ वाजून १५ मिनिटांनी निघून मुंबईला पोहोचेल.

## अमित शहांनी घेतली पिडीत कुटुंबियांची भेट

### गृहमंत्र्यांना पाहून अनावर झाले अश्रु



श्रीनगर, २३ एप्रिल : जम्मू-काश्मीरच्या पहलगाम येथे मंगळवारी २६ हिंदू पर्यटकांचे टार्गेट-किलींग झाल्यानंतर केंद्रीय गृहमंत्री अमित शहा तत्काळ काश्मीरला पोहचले. दरम्यान शहा आणि राज्याचे नायब राज्यपाल यांनी आज, बुधवारी पहलगाम हल्ल्यातील मृतांच्या कुटुंबियांनी श्रीनगर येथे भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. तसेच मृतकांना पुष्पचक्र अर्पण करून श्रद्धांजली दिली. श्रीनगरमध्ये मृतांच्या कुटुंबीयांना अमित शहा भेटताच त्यांना अश्रू अनावर झाले. त्यांनी शहा यांच्याकडे 'आम्हाला न्याय हवा आहे', अशी मागणी केली. त्यापूर्वी, मंगळवारी शहा यांनी पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर सर्व सुरक्षा एजन्सींसोबत उच्चस्तरीय बैठक घेतली. त्यानंतर या घटनेचा तपास राष्ट्रीय तपास यंत्रणेकडे (एनआयए) सोपवण्याचा निर्णय झाला. त्यानुसार एनआयएचे पथक आज, बुधवारी पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या ठिकाणी पोहोचले असून, ते पथक जम्मू-काश्मीर पोलिसांना तपासात मदत करेल.

## हिंदू-मुस्लिम केल्यामुळे पहलगाम हल्ला : रॉबर्ट वाड्रा

नवी दिल्ली, २३ एप्रिल : जम्मू-काश्मीरच्या पहलगाम येथे मंगळवारी झालेल्या २६ हिंदूंच्या टार्गेट किलींगवर गांधी कुटुंबियांचे जावई रॉबर्ट वाड्रा यांनी अतिशय वादग्रस्त विधान केले आहे. केंद्र सरकार सतत हिंदू-मुस्लीम करीत असल्यामुळेच हे टार्गेट-किलींग घडल्याचा दावा रॉबर्ट यांनी केला. दरम्यान हे आपले वैयक्तीक मत असून याचा काँग्रेस किंवा गांधी कुटुंबाशी संबंध नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

काँग्रेस खासदार प्रियंकांचे पती असलेले रॉबर्ट वड्रा म्हणाले की, मला आपल्या सरकारबद्दल खूप काळजी वाटते. सर्वप्रथम, या हल्ल्यात प्राण गमावलेल्या २६ लोकांना मी श्रद्धांजली अर्पण करतो. अनेक लोक जखमीही झाले आहेत. मी त्यांच्याबद्दल सहानुभूती व्यक्त करतो. मला



आशा आहे की तो लवकरच बरा होईल. दहशतवादी हल्ला करणे हा तुमचा मुद्दा मांडण्याचा एक कमकुवत मार्ग असल्याचे मला वाटते. आपल्या देशातील सरकार हिंदुत्वाबद्दल बोलत असल्याचे आपण पाहतो. यामुळे जेव्हा तुम्ही मशिदीबद्दल बोलता किंवा तुम्ही असे किंवा असे प्रार्थना करू शकत नाही असे म्हणता तेव्हा अल्पसंख्याकांना अस्वस्थ वाटते. अशा गोष्टींमुळे अराजकता आणि सांप्रदायिकता वाढते. जर तुम्ही या दहशतवादी घटनेकडे पाहिले तर ते लोकांचे ओळखपत्र तपासत होते. ते असे का करत होते, कारण आपल्या देशात हिंदू, मुस्लिम आणि ख्रिश्चन यांच्यात फूट आहे. मी चर्च जाळल्याचे व्हिडिओ फुटेज पाहिले आहे, काय चालले आहे? आपल्या देशात जातीय भावना का दुखावल्या जात आहेत ? यामुळे विभाजन निर्माण होत आहे. अशा संघटनांना असे वाटते की हिंदू हे मुस्लिमांसाठी धोका आहेत. आम्हाला हे नको आहे. जर तुम्ही बहुतेक हिंदू आणि मुस्लिमांना विचारले तर ते एकमेकांना मदत करतात. कोविड दरम्यान त्यांनी हे केले. त्याला राजकारण समजत नाही. त्याला निवडणुका जिंकण्याचे राजकारण समजत नाही. आयडी पाहिल्यानंतर मारणे हा एक संदेश आहे. हा संदेश पंतप्रधानांसाठी आहे. मुस्लिम आणि अल्पसंख्याक कमकुवत वाटत आहेत. मी मुस्लिमांच्या बाजूने बोललो होतो त्यामुळेच मला ईडीने चौकशीला बोलावल्याचा आरोप त्यांनी केला. दरम्यान वाड्रा यांनी आपल्या वादग्रस्त विधानाबद्दल माफी मागावी अशी मागणी भाजपने केली आहे.

## १० कोटींचा बँक घोटाळा! वरिष्ठ मॅनेजर, उद्योजक व एजंटला ५ वर्षांची शिक्षा

मुंबई : तब्बल १० कोटी रुपयांच्या बनावट 'लेटर ऑफ क्रेडिट' प्रकरणात सीबीआय न्यायालयाने तीन जणांना ५ वर्षांची सक्तमजुरी सुनावली आहे. या प्रकरणात विजया बँकेचे तत्कालीन वरिष्ठ व्यवस्थापक दामोधर कामत, माधव एंटरप्रायझेसचे मालक निखिल पट आणि एजंट सुरज तायडे दोषी ठरले.

या घोटाळ्याची सुरुवात २०१२ मध्ये झाली होती. कामत यांनी बनावट डउ जारी केल्यावर बँक ऑफ इंडिया च्या विलेपार्ले शाखेकडून १० कोटी रुपये मंजूर झाले. पाचवे डउ देताना संशय आल्याने चौकशी झाली आणि फसवणुकीचा पर्दाफाश झाला.

विशेष न्यायाधीश ए. व्ही. खरकर यांनी १७ एप्रिल रोजी दिलेल्या निकालात कामत यांना भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याखाली दोषी ठरवत १५ लाख दंड ठोठावला. निखिल पट यांना ८ कोटींचा दंड आणि सुरज तायडे यांना ३० लाखांचा दंड सुनावण्यात आला आहे.

या प्रकरणात एक आरोपी मृत असून दोन फरार आहेत. सात आरोपींपैकी एका आरोपीची निर्दोष मुक्तता झाली.

दरम्यान, देशाच्या आर्थिक रचनेवर घात करणाऱ्या पांढरपेशा गुन्ह्यांमध्ये वाढ होत असल्यामुळे कठोर शिक्षा देणे आवश्यक होते, असे न्यायालयाने नमूद केले.

## लवकरच लाडक्या बहिणींच्या खात्यात जमा होणार १५०० रुपये

मुंबई : महायुती सरकारने महिलांच्या आर्थिक दृष्टया सक्षमीकरणासाठी 'लाडकी बहीण योजना' सुरु केली आहे. या योजनेअंतर्गत वार्षिक उत्पन्न २.५० लाखांहून कमी असणाऱ्या महाराष्ट्रातील महिलांना दरमहा १५०० रुपये देण्यात येतात. आतापर्यंत महाराष्ट्रातील लाभार्थी महिलांना ९ हप्ते देण्यात आले आहेत. त्यानंतर आता एप्रिलचा हप्ता कधी मिळणार याकडे सर्वांचे लक्ष लागले असताना महत्त्वाची बातमी समोर आली आहे.

मंत्री अदिती तटकरे यांनी लाडकी बहीण योजनेचा पुढील हप्ता ३० एप्रिल २०२५ पर्यंत दिला जाणार असल्याची घोषणा केली आहे. ३० एप्रिल रोजी अक्षय तृतीया असून त्या मुहूर्तावर महाराष्ट्रातील लाडक्या बहिणींना १५०० रुपये देण्यात येणार आहेत. सध्या लाडक्या बहिणीच्या अर्जांची तपासणी सुरु असून, योजनेच्या निकषांनुसार अपात्र ठरणाऱ्या महिलांना या योजनेतून वगळण्यात येणार आहे. योजनेच्या निकषांनुसार ज्या महिलांचं उत्पन्न हे २.५० लाखांपेक्षा जास्त असेल अशा महिलांना या योजनेचा लाभ मिळणार नाही. आतापर्यंत लाडकी बहीण योजनेतून ९ लाख अपात्र महिलांची नावे वगळण्यात आल्याची माहिती देखील त्यांनी दिली.

८ लाख लाडक्या बहिणींचा हप्ता कपात

सरकारच्या नियमानुसार, एकाच व्यक्तीला वैयक्तिक लाभाच्या केवळ एका योजनेचा फायदा घेता येतो. पण मागील काही काळात अनेक महिला एकाचवेळी शेतकरी सन्मान निधी आणि लाडकी बहीण योजनेचा लाभ घेत असल्याचे दिसून आले. या प्रकाराची सरकारने छाननी केली असून, ज्या महिला दोन्ही योजना घेतात त्यांना 'लाडकी बहीण' योजनेतून केवळ ५०० रुपयेच मिळतील, असा निर्णय घेतला आहे. या नव्या निर्णयामुळे सुमारे ८ लाख लाभार्थी महिलांवर परिणाम होणार आहे.

'आर्थिक लाभाचा दुहेरी फायदा मिळू नये, यासाठी हा निर्णय घेतला गेला आहे. त्यामुळे यापुढे संबंधित महिलांना केवळ एकाच योजनेचा मुख्य लाभ घेता येणार असून, दुसऱ्या योजनेतील सहाय्य मर्यादित स्वरूपात मिळेल' असे सरकारने स्पष्ट केले आहे. महायुती सरकारने लाडक्या बहिणींना २१०० रुपये देण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, याबाबत कोणतीही घोषणा करण्यात आलेली नाही. आर्थिक परिस्थिती सुधारल्यानंतर आम्ही महिलांना २१०० देऊ, असं अजित पवारांनी म्हटलं आहे. तर महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी जाहिरनामा हा ५ वर्षांसाठी असतो. या काळात आम्ही लाडक्या बहिणींना कधीही २१०० रुपये देऊ, असे म्हटले होते. त्यामुळे २१०० रुपये कधी येणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## तुर्कस्तानमध्ये भूकंपामुळे हादरली जमीन

तुर्कस्तान : तुर्कस्तानमध्ये (तुर्कीये किंवा टर्की) भूकंपामुळे जमीन हादरली. जर्मन भूगर्भतज्ज्ञांनी तुर्कस्तानमध्ये ६.२ रिश्टर क्षमतेचा भूकंप झाल्याची नोंद केली आहे. भूकंपाचा केंद्रबिंदू राजधानी इस्तंबूलजवळ मरमारा समुद्रात १० किमी. खोल होता. या भूकंपामुळे जीवितहानी झाल्याचे वृत्त अद्याप हाती आलेले नाही. याआधी सहा फेब्रुवारी २०२३ रोजी तुर्कस्तानमध्ये ७.८ रिश्टर क्षमतेचा भूकंप झाला होता. यानंतर काही तासांत आणखी एक भूकंप आला. या लागोपाठच्या मोठ्या धक्क्यांमुळे तुर्कस्तानच्या दक्षिणेकडील ११ प्रांत उद्ध्वस्त झाले होते. लागोपाठच्या दोन भूकंपांमुळे तुर्कस्तानमधील शेकडो इमारती कोसळल्या. अनेक इमारतींची पडझड झाली. सरकारी आकडेवारीनुसार ५३ हजारांपेक्षा जास्त नागरिकांचा मृत्यू झाला होता. सीरियाच्या उत्तरेकडील भागात भूकंपामुळे सहा हजार नागरिकांचा मृत्यू झाला होता.

## काश्मीरमधील परिस्थितीसंदर्भात मोदी सरकारचा विमान कंपन्यांना इशारा

नवी दिल्ली , २३ एप्रिल - काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्री श्री राम मोहन नायडू यांनी पीडित पर्यटक आणि त्यांच्या कुटुंबियांची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी काही वेगवान निर्णय घेतला असून विमान कंपन्यांना सज्जड दम भरला आहे.

केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्र्यांनी वैयक्तिकरित्या केंद्रीय गृहमंत्री अमित शाहांशी चर्चा केली आहे. या प्रकरणाशी संबंधित अधिकाऱ्यांशी जवळून समन्वय साधून काम करण्याचे निर्देश देखील दिले आहेत. नायडू हे काश्मीरमधील परिस्थितीवर २४ तास लक्ष ठेवून आहेत. पीडितांना तात्काळ मदत पोहचवण्याच्या उद्देशाने श्रीनगरहून ४ विशेष विमानांची व्यवस्था करण्यात आली आहे. यापैकी २ विमानं दिल्ली आणि २ विमानं मुंबईला पाठवली जाणार आहेत. तसेच पुढील पीडितांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी अतिरिक्त विमाने केंद्रीय नागरी विमान उड्डाण मंत्रालयाकडून तयार ठेवण्यात आली आहेत.

कॅबिनेट मंत्री श्री राम मोहन नायडू यांनी सर्व विमान कंपन्यांसोबत तातडीची बैठक घेतली आणि विमान कंपन्यांना वाढीव किमतींसंदर्भात दम भरल्याप्रमाणे कठोर शब्दांमध्ये थेट इशाराच दिला आहे. या संवेदनशील काळात कोणत्याही प्रवाशावर भार पडू नये याची खात्री करून विमान कंपन्यांना नियमित भाडे पातळी राखावी, असे निर्देश केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्र्यांकडून देण्यात आले आहेत. नागरी विमान वाहतूक मंत्रालय काश्मीरमधील परिस्थितीसंदर्भात अलर्टवर असून सर्व बाधितांना सर्वतोपरी मदत करण्यासाठी आम्ही वचनबद्ध असल्याचं मंत्रालयाने म्हटलं आहे.याशिवाय , नायडू यांनी सर्व विमान कंपन्यांना मृत व्यक्तीचे पार्थिव त्यांच्या मूळ राज्यात पोहोचवण्यासाठी पूर्ण सहकार्य करण्याचे निर्देश दिले आहेत. राज्य सरकारे आणि स्थानिक अधिकाऱ्यांशी समन्वय साधून काम करावे, असं नायडू यांच्याकडून कंपन्यांना सांगण्यात आलं आहे.दरम्यान, या हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्या संतोष जगदाळे आणि कौस्तुभ गणबोटे यांचं पार्थिव आज(दि. २३) विशेष विमानाने पुणे विमानतळावर आणलं जाणार आहे.

## प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कारसाठी अर्ज मागविले

छत्रपती संभाजीनगर, दि.२३- प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार २०२५ साठी ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले आहेत. शौर्य, क्रिडा, समाजसेवा, विज्ञान आणि तंत्रज्ञान पर्यावरण, कला - संस्कृती आणि नवोन्मेष या क्षेत्रात राष्ट्रीय स्तरावर नावलौकिक मिळवणाऱ्या मुलांना हा पुरस्कार दिला जातो. अर्ज नामांकन https://awards.gov.in या संकेतस्थळा मार्फत ऑनलाइन पद्धतीने स्वीकारले जाणार आहेत. ज्या मुलांचे वय ५ वर्षापेक्षा अधिक व ३१ जुलै २०२५ रोजी १८ वर्षापेक्षा कमी आहे व ज्या मुलांनी शिक्षण, कला, सांस्कृतिक कार्य, खेळ नाविन्यपूर्ण शोध, सामाजिक कार्य व शौर्य अशा क्षेत्रात विशेष नैपूण्यपूर्ण कामगिरी केलेली आहे त्यांचे प्रस्ताव वरील संकेतस्थळावर स्वत: मुले किंवा त्यांचे वतीने राज्य सरकार, केंद्रशासित प्रदेश, जिल्हाधिकारी, पंचायत राज संस्था, नागरी स्वराज्य संस्था, शैक्षणिक संस्था इ.अर्ज करु शकतात.

## सोयगाव तालुक्यातील जरंडी जवळील अपघातात भरधाव वाहनांच्या धडकेत दोन जागीच ठार, एक गंभीर

तभा.वृत्तसेवा
सोयगाव,दि.२३ एप्रिल

भरधाव अज्ञात वाहनाने मोटारसायकलला मागून जोरदार धडक देऊन मोटारसायकल वर पुढे बसलेल्या पाच वर्षीय मुलीला हवेत उडवून चालक पित्याला पन्नास फूट फरफटत नेल्याची घटना सोमवारी रात्री आठ वाजेच्या सुमारास जरंडी गावाजवळ सोयगाव-बनोटी रस्त्यावर घडली या भयंकर अपघातात बाप व मुलगी जागीच ठार झाले तर दुसरी मुलगी गंभीर जखमी झाली आहे अपघाताची माहिती मिळताच निंबायती व जरंडी येथील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत मदतकार्य केले.

अजय रघुनाथ राठोड(वय.३२रा.




न्हावीतांडा) व वैशाली(अजय) राठोड (वय.८रा.न्हावीतांडा) असे अपघातात जागीच ठार झालेली असून काजल अजय राठोड(वय.१०) गंभीर जखमी झाली आहे हे तिघेही जरंडी येथून निंबायती(न्हावीतांडा) येथे मोटारसायकल क्र-एम एच-१९ ए.बी.-३७१८ वरून जात असताना सोयगाव-बनोटी रस्त्यावर जरंडी गावाजवळ मागून येणाऱ्या भरधाव अज्ञात वाहनाने त्यांना उडविले यामध्ये मृत वैशाली राठोड हिस या भरधाव वाहनाने प्रवास हवेत उडवून अजय राठोड(वय. ३२) यास पन्नास फूट फरफटत घेऊन गेले तर काजल ही गंभीर जखमी झाली असून तिला तातडीने उपचारासाठी जळगाव येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.दरम्यान घटनेची माहिती मिळताच निंबायती व जरंडी येथील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेवुन मदतकार्य केले दरम्यान भरधाव अज्ञात वाहनधारकाने वाहनासह घटनास्थळवरून पळ काढला होता निंबायती येथील पोलीस पाटील मूलचंद राठोड,भागचंद चव्हाण,राजू पाटील,गजानन राठोड,पारस राठोड,बबलू राठोड,नाना सुस्ते,जरंडीचे माजी सरपंच समाधान तायडे,माजी उपसरपंच सुनील पवार आदींनी घटनास्थळवरून जखमी मुलगी काजल राठोड हिस जरंडी प्राथमिक आरोग्य केंद्रात तातडीने उपचारासाठी दाखल करून दोन्ही अपघातात मृत झालेल्याचे मृतदेह शवविच्छेदन साठी सोयगाव ग्रामीण रुग्णालयात पाठविले होते.अजय राठोड यांच्या पश्चात वडील,पत्नी,भाऊ,एक मुलगा,एक मुलगी असा परिवार आहे.याप्रकरणी सोयगाव पोलीसांनी घटनास्थळी पंचनामा करून रात्री अज्ञात वाहनधारकाविरुद्ध गुन्ह्याची नोंद केला असून पुढील तपास सोयगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक पंकज बारवाल यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक गजानन आरेकर,राजू बरडे,रवींद्र तायडे,सादीक तडवी करीत आहे.

## जागतिक वसुंधरा दिनानिमित्त झाडांना आच्छादन

छत्रपती संभाजीनगर - जागतिक वसुंधरा दिनाचे औचित्य साधून कॉस्मो फाऊंडेशन व प्रयास युथ फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने बायोडायव्हर्सिटी हब येथे झाडांना आच्छादन व प्लास्टिक निर्मूलन या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होत. या कार्यक्रमाला कॉस्मो फर्स्ट लिमिटेडची प्रॉडक्शन युनिटचे कर्मचारी आपल्या दैनंदिन कामातून वेळ काढून पर्यावरण संवर्धनासाठी चालू असलेल्या या उपक्रमास खारीचा वाटा उचलण्यासाठी मातीचे पोषण करून आपण धरती मातेचा उत्सव साजरा करू हे ब्रीद घेऊन मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीस पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले.

## राज्यातील बाजार समित्यांची वार्षिक क्रमवारी जाहीर

पुणे, २३ एप्रिल : बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पांतर्गत राज्यातील ३०५ बाजार समित्यांची आणि ६८ खाजगी बाजारांची सन २०२३-२४ या वर्षाच्या कामगिरीवर आधारित वार्षिक क्रमवारी पणन संचालनालयाकडून जाहीर करण्यात आली आहे.

या क्रमवारीनुसार राज्यातील १० बाजार समित्यांमध्ये पुणे विभागातील बारामती बाजार समितीने तिसरा क्रमांक पटकावला आहे. बाजार समित्यांच्या वार्षिक क्रमवारीनुसार राज्यात पहिल्या १० बाजार समित्यांमध्ये वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट बाजार समिती १७८ गुण मिळवून पहिल्या क्रमांकावर, वाशिम जिल्ह्यातील कारंजा लाड बाजार समिती १७१.५ गुणांसह दुसऱ्या स्थानी, बारामती १६५ गुणांसह तिसऱ्या स्थानी, १५५.५ गुणासह पंढरपूर पाचव्या तर १४९ गुण मिळवून अकलूज आठव्या स्थानावर आहे. तसेच राज्यातील सहकार विभागाच्या रचनेनुसार विभागातील बारामती, पंढरपूर व अकलूज हे अनुक्रमे पहिल्या तीन स्थानावर आहेत. बाजार समित्यांची तसेच खाजगी बाजारांची क्रमवारी निश्चित करण्यासाठी पणन संचालनालयाकडून जागतिक बँकेच्या सुचनेनुसार शेतमालाच्या विक्री व्यवस्थेसाठी बाजार समितीत असलेल्या पायाभूत व इतर सुविधा, आर्थिक व वैधानिक कामकाज, योजना, उपक्र म राबविण्यातील सहभाग यानुसार ३५ निकष तयार करण्यात आले होते. बाजार समित्यांच्या निकषासाठी २०० गुण व खाजगी बाजारांसाठी २५० गुण निश्चित करण्यात आले होते. या क्रमवारीमुळे शेतकऱ्यांना बाजार समित्यांमध्ये तसेच खाजगी बाजारांमध्ये आकर्षित करण्यासाठी अधिकाधिक सुविधा देण्याची निकोप स्पर्धा निर्माण होण्यास चालना मिळेल. शेतकऱ्यांच्या हितासाठी बाजार समित्यांनी अधिक जोमाने कामकाज करावे, असे आवाहन पणन संचालक विकास रसाळ यांनी केले

विदेश

# चीन व पाकिस्तानमध्ये वाढती दरी

अलोक गोस्वामी

**चीन आणि पाकिस्तान यांना तज्ज्ञ 'आयर्न ब्रदर्स' म्हणतात. या दोघांकडे एकेकाळी कट्टर मित्र म्हणून पाहिले जात होते. मात्र, या दोन देशांमधील दरी वाढते आहे. यामागे तणावपूर्ण आर्थिक आणि सामरिक संबंध आहेत, त्यांना पुनरुज्जीवित करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. यामध्ये मुख्य भूमिका चीन-पाकिस्तान इकॉनॉमिक कॉरिडॉरची आहे.**

'चीन-पाकिस्तान इकॉनॉमिक कॉरिडॉर' म्हणजेच सीपीईसी या आपला महत्त्वाकांक्षी प्रकल्पाच्या माध्यमातून जिनांच्या देशाला वेठीस धरणारा कम्युनिस्ट ड्रॅगन आता पाकिस्तानपासून अंतर ठेवू पाहात आहे. सीपीईसी प्रकल्पात काम करणाऱ्या चिनी नागरिकांच्या सुरक्षेतील गंभीर त्रुटी आणि त्यांचे मृत्यू हे त्यामागचे खरे कारण असल्याचे सांगितले जात आहे. लाख आश्वासने देऊनही पाकिस्तान सुरक्षेच्या मुद्यावर चीनला ठोस आश्वासन देण्यात साफ अपयशी ठरला आहे. दक्षिण आशियातील घडामोडींवर लक्ष ठेवणाऱ्या एका पत्रिकेने याबाबत सखोल अध्ययन व विश्लेषण केले आहे.

सुरक्षेसंदर्भातील चीनच्या सार्वजनिक वक्तव्यांमुळे दुखावलेल्या महमंद अली जिनांच्या देशाचे एक शिष्टमंडळ लवकरच बीजिंगला जाणार असून, आपल्या 'मालकाचा' राग शमविण्याचा प्रयत्न करणार असल्याची माहिती आहे. या प्रकरणी पाकिस्तानवर प्रचंड कूटनीतिक दबाव आहे, जो आणखी मोठ्या प्रमाणात वाढण्याचा धोका आहे. एकूणच, पाकिस्तानला स्वत:च्याच सीपीईसी प्रकल्पात दुर्लक्षित होण्याची भीती सतावत आहे.

या संदर्भात 'द डिप्लोमॅट' पत्रिकेत प्रकाशित झालेल्या एका लेखात म्हटले आहे की, ज्यांना तज्ज्ञांकडून 'आयर्न ब्रदर्स' म्हटले जात होते आणि एकेकाळी कट्टर मित्र म्हणून पाहिले जात होते, ते चीन आणि पाकिस्तान सध्या त्यांच्या संबंधांच्या गुंतागुंतीच्या टप्प्यातून जात आहेत. यामागे तणावपूर्ण आर्थिक आणि सामरिक संबंध आहेत, त्यांना पुनरुज्जीवित करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. यामध्ये मुख्य भूमिका चीन-पाकिस्तान इकॉनॉमिक कॉरिडॉरची आहे.

सीपीईसी प्रकल्पांतर्गत, चीनने पाकिस्तानमधील पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी सुमारे ६२ अब्ज डॉलर्स देण्याचे वचन दिले आहे. यामध्ये मेगा पोर्ट, हायवे, रेल्वे आणि पॉवर प्लांट यांसारख्या महत्त्वाच्या प्रकल्पांचा समावेश आहे. तथापि, लॉन्च होऊन एक दशकानंतरही, त्यांचे अनेक प्रकल्प वाढत आहेत. परंतु त्याची गती अतिशय संथ आहे. या आव्हानांच्या केंद्रस्थानी चीनची सुरक्षाविषयक चिंता आहे, जी प्रादेशिक अस्थिरता आणि पाकिस्तानच्या अंतर्गत शासनाशी संबंधित समस्यांमुळे निर्माण झाली आहे.

२०२१ मध्ये काबुलमध्ये अफगाण तालिबान सत्तेवर आल्यानंतर, पाकिस्तानमधील दहशतवादी हल्ल्यांमध्ये वाढ झाल्याने देशातील सुरक्षा परिस्थितीतीवर लक्षणीय परिणाम झाल्याचे मासिकाच्या विश्लेषणात नमूद करण्यात आले आहे. याचा थेट परिणाम चिनी कामगारांच्या सुरक्षेवर झाला आहे. मार्च २०२४ मध्ये उत्तर पाकिस्तानमध्ये झालेल्या एका हल्ल्यात पाच चिनी अभियंते ठार झाले होते. गेल्या नोव्हेंबरमध्ये कराची विमानतळाजवळ झालेल्या दहशतवादी हल्ल्यात दोन चिनी नागरिकांचा मृत्यू झाला होता आणि किमान दहा जण जखमी झाले होते.






या हल्ल्यांमुळे दोन्ही देशांमध्ये तणाव निर्माण झाला आहे. पाकिस्तानात वास्तव्यास असलेल्या व या प्रकल्पात काम करणाऱ्या चिनी अधिकाऱ्यांमध्ये निराशा वाढत आहे. सुरक्षेबद्दल आणि प्रकल्पांच्या प्रगतीवर होणाऱ्या परिणामांबद्दल आपली चिंता व्यक्त करण्यासाठी हे चिनी अधिकारी अधिक प्रखरपणे व सार्वजनिक स्वरूपात आपले म्हणणे मांडत आहेत.

नियतकालिकाने पुढे म्हटले आहे की, इस्लामाबादमधील चीनचे राजदूत जियांग झांग यांनी अलीकडेच एका कार्यक्रमात पाकिस्तानचे परराष्ट्र मंत्री इशाक दार यांना सांगितले होते की, 'केवळ सहा महिन्यांत आमच्यावर दोनदा हल्ले होणे हे कोणत्याही परिस्थितीत स्वीकार्य नाही. हे दोन्ही देश उघडपणे आपल्या तक्रारी मांडण्यास आजपर्यंत टाळत होते. पण कदाचित आता पाणी डोक्यापर्यंत आले आहे आणि चिन्यांना गप्प बसणे आता अवघड जात असून ही गोष्ट आता त्यांच्या सहनशक्तीच्या पलीकडे जात आहे.

चीनने पाकिस्तानवर केलेली, विशेषत: सुरक्षेच्या मुद्यावर आणि संयुक्त प्रकल्पांमधील अकार्यक्षमतेवर केलेली प्रखर टीका गैरसमज निर्माण करू शकते. या गोष्टीचा ऐतिहासिक द्विपक्षीय संबंधांवर परिणाम होऊ शकतो, असे तज्ज्ञांचे मत आहे.

अलीकडेच द गार्डियनने एका वृत्तात लिहिले होते की, पाकिस्तानमधील चीनचे राजनैतिक सचिव वांग शेंगजी यांनी इस्लामाबादची निंदा केली आहे कारण पाकिस्तानने सुरक्षेशी संबंधित समस्या सोडवण्यासाठी पुरेसे पाऊल उचलले नाही. 'ग्वादर आणि बलुचिस्तानमध्ये चिनी लोकांबद्दल शत्रुत्व आहे' असे वक्तव्य देखील वांग शेंगजी यांनी केले होते. चिनी अधिकाऱ्याच्या या टिप्पणीमुळे असे चित्र निर्माण झाले की दोन्ही ठिकाणच्या लोकांचा सीपीईसी प्रकल्पाला पाठिंबा नाही.

या धक्कादायक वृत्तामुळे पाकिस्तानी अधिकाऱ्यांमध्ये चिंता निर्माण झाली आहे. त्यांच्या चिनी सहकाऱ्यांनी एकापाठोपाठ एक केलेल्या टीकेवर तोडगा कसा काढायचा हेच या पाकी अधिकाऱ्यांना समजेनासे झाले आहे. पाकिस्तानी अधिकाऱ्यांनी चिनी दूतावासाला विश्वासात घेण्याचे भरपूर प्रयत्न केले. पण चिन्यांकडून पाकिस्तानला जाहीरपणे कधी फटकारले जाईल हे सांगता येत नाही.

'द गार्डियन'मध्ये प्रकाशित झालेल्या या लेखाला उत्तर देताना, पाकिस्तानमधील चिनी दूतावासाने म्हटले आहे की वृत्तपत्रात प्रकाशित केलेले दावे 'एकतर्फी' आहेत आणि लेखकाला चीनच्या मूळ भूमिकेची मूलभूत माहिती नव्हती. आपल्या याच वक्तव्यात चीनने खासकरून ग्वादर बंदर आणि बलुचिस्तान प्रांताच्या विकासास पाठिंबा देण्याच्या आपल्या वचनबद्धतेची पुन्हा ग्वाही दिली. चिनी दूतावासाने गेल्या वर्षभरातील महत्त्वपूर्ण कामगिरीवर प्रकाश टाकला, ज्यात आपत्कालीन मदत, पायाभूत सुविधा प्रकल्प आणि सांस्कृतिक देवाणघेवाण यांचा समावेश होता. तथापि, दूतावासाचे म्हणणे आहे की या सर्व प्रयत्नांमधून व्यावहारिक सहकार्य मजबूत करण्याचा आणि पाकिस्तानात स्थानिक रोजगार वाढविण्याचा बीजिंगचा निर्धार दिसून येतो. परंतु वस्तुस्थिती ही आहे की, अंतर्गत अहवाल फारसा सकारात्मक नाही.

विशेष म्हणजे, बीजिंगने आपल्या अधिकाऱ्यांनी मीडियाशी या विषयावर चर्चा केल्याचे स्पष्टपणे नाकारलेले नाही. हा विकास पाकिस्तानशी चर्चा करण्याच्या चीनच्या दृष्टिकोनातील सूक्ष्म बदलाचे संकेत देतो, यातून सीपीईसी प्रकल्पांमधील विलंब आणि अडथळ्यांबद्दल ड्रॅगनची वाढती निराशा देखील प्रतिबिंबित होते. मात्र, जगाला दाखविण्यासाठी का होईना पण आपली पाकिस्तानशी मैत्री असल्याची भूमिका चीन आजही सार्वजनिक स्वरूपात मांडत आहे. पण प्रत्यक्षात सध्या पाकिस्तान आणि चीनमधील संबंध डळमळीत आहेत.

---


विश्लेषण

# तहव्वूर हुसेन राणाचे यशस्वी प्रत्यार्पण

प्रफुल्ल केतकर

४ एप्रिल २०२५ रोजी, अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने तहव्वूर हुसेन राणा याने दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या प्रकरणात दिलासा मिळविण्यासाठी दाखल केलेली पुनर्विचार याचिका फेटाळून लावली, ज्यामुळे त्याचा भारतात प्रत्यार्पणाचा मार्ग मोकळा झाला. १० एप्रिल रोजी, राष्ट?ीय तपास संस्थे (एनआयए) ला २६ नोव्हेंबर २००८ रोजी मुंबईवरील दहशतवादी हल्ल्यातील एका 'मोस्ट वॉन्टेड' आरोपीची औपचारिक कस्टडी मिळाली. भारतने १९९० च्या दशकात अनेक देशांसोबत यशस्वी रीत्या प्रत्यार्पण करार केले असले तरी, विविध देशांतर्गत कायद्यांमुळे कुख्यात गुन्हेगारांचे प्रत्यार्पण करणे कायदेशीर प्रक्रियेच्या गुंतागुंतीमुळे आव्हानात्मक बनते. भारताने सतत पाठपुरावा केल्यामुळे राणाचे भारतात प्रत्यार्पण करणे शक्य झाले आहे. केंद्र सरकारचे हे यश अनेक प्रकारे महत्त्वपूर्ण आहे.

लष्करी डॉक्टर असल्याचा दावा करणारा पाकिस्तानी वंशाचा कॅनेडियन दहशतवादी लष्कर-ए-तोयबा (एलईटी) या दहशतवादी संघटनेचा सदस्य म्हणून किमान बारा दहशतवादी कटांमध्ये सहभागी असल्याचे आढळून आले आहे. २००८ चा मुंबईवरील दहशतवादी हल्ला हा 'दहशतवादाचा जागतिक निर्यातदार' असलेल्या पाकिस्तानकडून झालेल्या राक्षसी कृत्यांपैकी एक होता. या दहशतवादी हल्ल्यात अमेरिकन आणि इस्रायली नागरिकांसह एकशे सहासष्ट जणांना आपले प्राण गमवावे लागले आणि शेकडो जण जखमी झाले. राणा या दहशतवादी हल्ल्याचा मास्टरमाईंड होता आणि डेव्हिड हेडली आणि सहकाऱ्यांना आवश्यक ते निर्देश देत होता, असे तपासात सिद्ध झाले आहे. २००९ मध्ये प्रेषित मोहम्मद पैगंबरांचे व्यंग्यचित्र काढल्याच्या आरोपाखाली डॅनिश वृत्तपत्र जायलँड-पोस्टेनवर झालेल्या अयशस्वी हल्ल्याशी संबंध असल्याबद्दल त्याला अटक करण्यात आली होती. जरी अमेरिकेच्या न्यायालयाने राणाला मुंबई हल्ल्यात थेट सहभाग असल्याच्या



> **"अपील न्यायालयाने जिल्हा न्यायालयाशी सहमती दर्शवत म्हटले की, याचिकाकर्त्याचे प्रत्यार्पण हे प्रत्यार्पण कायद्यातील (नॉन-बिस इन आयडेम) कलमाशी सुसंगत आहे. कारण 'भारतात आरोप लावण्यात आलेल्या गुन्ह्यांमध्ये (याचिकाकर्ता) असे घटक आहेत जे त्या घटकांपेक्षा स्वतंत्र आहेत, ज्या अंतर्गत (याचिकाकर्ता) संयुक्त राज्य अमेरिकेत खटला चालवला गेला होता."**
>
> **राणाच्या याचिकेवर, युनायटेड स्टेट्सच्या सर्वोच्च न्यायालयाची टिप्पणी. क्रमांक २४-५५०, पृष्ठ ७**

आरोपातून निर्दोष मुक्त केले असले तरी, मुंबई आणि कोपनहेगन हल्ल्यात डेव्हिड हेडलीला भौतिक मदत केल्याबद्दल त्याला दोषी ठरवण्यात आले. प्रत्यार्पणाची शक्यता धुसर असताना, २०११ च्या आरोपपत्रात हेडली आणि राणा दोघांच्याही नावाचा समावेश करण्यात आला आणि त्यांच्या अनुपस्थितीत खटला चालवण्यात आला, जो नैसर्गिक न्यायाच्या भावनेविरुद्ध आहे. या प्रकरणातील तपास प्रक्रियेला एक वेगळ्या आव्हानाला सामोरे जावे लागले होते कारण सर्व आरोपी विदेशी नागरिक होते. यात सात पाकिस्तानी नागरिक आणि दोन अमेरिका आणि कॅनडाचे नागरिक होते. तरीही, भारतीय एजन्सींनी या प्रकरणाचा जबरदस्त पाठपुरावा केला आणि सरकारचे कायदेशीर आणि राजनैतिक यशाच्या स्वरूपात प्रत्यार्पण यशस्वी रीत्या व्यवस्थापित केले.

देशांतर्गत पातळीवर, 'भगवा दहशतवाद' सिद्धांताला चालना देण्यासाठी पाकिस्तानला क्लीन चीट देण्याचा प्रयत्न करण्यात आला. मुंबई पोलिसांचे उपनिरीक्षक तुकाराम ओंबळे यांच्या शौर्यपूर्ण बलिदानामुळे मुंबई दहशतवादी हल्ल्यातील एक सूत्रधार अजमल कसाबला अटक करून न्यायालयात खटला चालवण्यात आला आणि हाफिज सईद, झकी-उर-रहमान लखवी आणि लष्कर-ए-तोयबा आणि हरकत-उल-जिहाद-अल-इस्लामी (हुजी) चा इलियास काश्मिरीशी पाकिस्तानचा संबंध असल्याचे तपासतून निष्पन्न झाले. काही काँग्रेस नेत्यांनी राष्ट?ीय स्वयंसेवक संघाला दहशतवादी हल्ल्यासाठी जबाबदार धरण्याचा केलेला अपमानास्पद प्रयत्न राणाच्या सखोल चौकशीतून अधिक जोरकसपणे हाणून पाडता येईल.

विदेशात सैनिक पाठवून दहशतवादाविरुद्धचे युद्ध लढता येत नाही. पाकिस्तानसारख्या दहशतवादाच्या केंद्रांना एकटे पाडून त्यांना धडा शिकवला पाहिजे की दहशतवादाची निर्यात करणे हा परराष्ट? धोरणाचा पर्याय असू शकत नाही. दहशतवादाचे आर्थिक पुरवठा नेटवर्क सर्व बाजूंनी चिरडून टाकण्याची आवश्यकता आहे. दहशतवादी नेटवर्क आणि स्लीपर सेल्स नष्ट करण्यासाठी देशांतर्गत कायदेशीर व्यवस्था आणि सुरक्षा यंत्रणा अतिशय मजबूत केल्या पाहिजेत. दहशतवादाचा मुकाबला करण्यासाठी सर्व लोकशाहीवाद्यांनी गुप्त माहिती आणि प्रत्यार्पणाच्या आघाडीवर सहकार्य केले पाहिजे. हे सर्व करत असताना, दहशतवादाच्या आरोपीलाही न्यायालयात निष्पक्ष सुनावणीपासून वंचित ठेवता कामा नये. भारताने आपल्या आचरणातून दहशतवादाविरुद्धच्या युद्धाचे हे सर्व पैलू दाखवून दिले आहेत. भारताच्या कायदेशीर आणि राजनैतिक कौशल्यामुळे तसेच भक्कम पुराव्यांमुळे उदारमतवादी अमेरिकन न्यायालयांना देखील राणावरील आरोपांविषयी भारताने कसे पटवून दिले हे अनुकरणीय आहे. दहशतवादावरील कायदेशीर तपासात ही एक केस स्टडी बनली पाहिजे.

**(ऑर्गनायझरवरून साभार)**

---




# 'सुरक्षित तट, समृद्ध भारत'

केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल (सीआयएसएफ) कडून सध्या लखपत (गुजरात) ते कन्याकुमारी येथे देशातील पहिली 'सुरक्षित तट, समृद्ध भारत' यात्रा सुरू आहे. 'ग्रेट इंडियन कोस्टल सायक्लोथॉन' नावाने या यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. 'सुरक्षित तट, समृद्ध भारत' या संकल्पनेअंतर्गत निघालेल्या या सायकल रॅलीचे उद्दिष्ट किनारी भागात राष्ट्रीय सुरक्षेबद्दल जागरूकता निर्माण करणे, मादक पदार्थ, शस्त्रे आणि स्फोटकांसह तस्करीमुळे निर्माण होणाऱ्या धोक्यांवर प्रकाश टाकणे हा आहे.

सीआयएसएफचे कमांडेंट राहुल कुमार यांनी दिलेल्या माहितीनुसार, सीआयएसएफच्या ५६ व्या स्थापना दिनानिमित्त ही रॅली आयोजित करण्यात आली आहे. ही मोहीम पूर्व किनाऱ्यावरील पश्चिम बंगालमधील बक्खली येथून सुरू झाली आहे. पश्चिम मार्ग ३,७७५ किमी तर पूर्व मार्ग २,७७८ किमीचा असेल. सायकलस्वार मुंबई, कोकण, गोवा, हल्दिया, कोणार्क, विशाखापट्टणम, चेन्नई आणि पाँडिचेरी यासारख्या प्रमुख किनारी शहरांमधून प्रवास करणार आहेत. एकूण १०० समर्पित सीआयएसएफक्र सायकलस्वार असून, त्यात ४ महिलांचा समावेश आहे. २५ दिवसांत ११ राज्यांचा ६,५५३ किमीचा कठीण प्रवास हे जवान करणार आहेत.

***(पांचजन्यवरून साभार)***

---

संस्कृती

# बैसाखी आणि खालसा पंथ

पूनम नेगी

बैसाखी हा कृषी सण वैशाख महिन्यात साजरा केला जातो. सूर्याच्या स्थितीत परिवर्तन झाल्यामुळे बैसाखीपूर्वी बहुतेक शेतात गहू पिकतो आणि पिकलेल्या पिकाची कापणी सुरू होते. बैसाखीच्या दिवशी सूर्यास्तानंतर अग्निदेवाला नवान्न अर्पण करण्याची परंपरा आहे. या परंपरेमागे लोककल्याणाचीही दैवी भावना दडलेली आहे की हे अग्निदेव! तुम्ही या अन्नामध्ये एवढी शक्ती आणि ऊर्जा भरावी की ज्यामुळे संपूर्ण राष्ट्राचा जठराग्नि शांत होऊ शकेल. रंगीबेरंगी पारंपरिक पोशाख परिधान केलेले शीख समाजाचे लोक जेव्हा ढोल-ताशांच्या तालावर भांगडा नृत्य करतात तेव्हा नवीन पिकाच्या या कृषी महोत्सवाचा उत्साह आणि वैभव पाहण्यासारखे असते. नानकशाही कॅलेंडरनुसार, शीख पंथानुयायांचे नवीन वर्ष या बैसाखी उत्सवापासून म्हणजेच वैशाख महिन्याच्या पहिल्या तारखेपासून सुरू होते.

बैसाखीच्या दिवशी इसवीसन १६९९ मध्ये शिखांचे दहावे गुरू, गुरू गोविंदसिंग महाराज यांनी, केशवगड आनंदपूर साहिब (पंजाब) च्या भूमीवर गुरू नानकदेव महाराजांच्या निर्मल पंथाला एक नवी दिशा प्रदान करीत 'खालसा पंथा'चा पाया रचला. खालसा हा मुळात फारसी भाषेतील शब्द आहे, ज्याचा शाब्दिक अर्थ आहे 'खलिस'. खलिस म्हणजे सोन्यासारखा शंभर टक्के शुद्ध. गुरू नानक देव यांनी सत्यनिष्ठा आणि सामाजिक समरसतेच्या भावनेसह तसेच सेवा, शालीनता आणि समाधानाच्या शिकवणीसह धर्म आणि न्यायाच्या रक्षणासाठी खालसा पंथाचा पाया रचला. आपल्या सर्व पूर्वसुरींच्या शिकवणीचे सारतत्त्व ग्रहण करीत त्यांनी या खालसा पंथाची स्थापना केली.

शीख पंथाची शिकवण आणि मूल्यांचे अनुसरण करणारे धर्मावलंबी दहाव्या गुरुंनी अमृत चाखल्यानंतर 'खालिस'



झाले. शीख अनुयायांना खालिस बनवणारी ही घटना मध्ययुगातील अत्यंत क्रांतिकारी आणि आध्यात्मिक घटना मानली जाते. त्यावेळी भारतावर रानटी मोगल आक्रमक औरंगजेबाचे राज्य होते आणि देशातील हिंदू विशेषत: काश्मिरी पंडित त्या धर्मांध राजाच्या क्रूरतेने आणि अत्याचाराने प्रचंड भयभीत झाले होते. या अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी, बैसाखीच्या शुभ दिवशी गुरू गोविंद सिंग यांनी आपल्या धर्माच्या आणि राष्ट्राच्या रक्षणासाठी, विविध जाती, धर्म आणि प्रांतातील पंच प्यारेंची निवड केली आणि त्यांना अमृत दिले आणि त्यांना पाच ककार (कच्छ, कडा, कृपाण, केश आणि कंघा) धारण करणे अनिवार्य केले. त्यांनी धर्म आणि जातीच्या आधारे भेदभाव सोडून मानवी मूल्यांना, भावनांना, माणुसकीला महत्त्व देण्याची दृष्टी लोकांना दिली. यावेळी त्यांनी एक नवीन घोषणा दिली - 'वाहे गुरुजी का खालसा - वाहे गुरूजी की फतेह' म्हणजेच खालसा ईश्वराचा आहे आणि ईश्वराचा विजय निश्चित आहे. आपल्या अनुयायांना एका हातात माळ आणि दुसऱ्या हातात तलवार देऊन मानवतेचे रक्षण करण्यासाठी संत आणि सैनिकांना एकत्र करण्याची गुरू गोविंदसिंग यांचा दृष्टिकोन खरोखरच अद्भुत आहे. या शुभ दिवशी गुरू गोविंद सिंग यांनी गुरु ग्रंथ साहिबला मार्गदर्शक म्हणून निवडले.

गुरुजींनी आपल्या अनुयायांमध्ये अलौकिक शक्तीचा अंतर्भाव करून त्यांना उपदेश केला की खालसात कुणीही उच्च-नीच नाही, सर्व एकस्वरूप आहेत, सर्व समान आहेत. देश आणि मानवजातीच्या रक्षणासाठी तन-मन-धन यासह सर्वस्वाचा त्याग करणे आणि गरीब, अनाथ आणि असहाय यांच्या रक्षणासाठी नेहमी अग्रेसर राहणे हा खालसाचा प्रथम धर्म आहे, आद्य कर्तव्य आहे. श्री गुरू गोविंदसिंग यांनी खालसा पंथाची निर्मिती करून, लोकांमध्ये हा विश्वास निर्माण केला की त्यांचा जन्म एक ईश्वरीय कार्य पूर्ण करण्यासाठी झाला आहे. लवकरच त्यांनी या पंथाने नेतृत्व हाती घेतले. जे शीख या पंथात सामील झाले नाहीत आणि दाढी करीत होते त्यांना सहजधारी म्हणून ओळखले जाऊ लागले. औरंगजेबाच्या अत्याचारांचा मुकाबला करण्यासाठी, मोगली फौजेचा प्रतिकार करण्यासाठी गुरूंनी 'अकाली खालसा सेने' ची स्थापना करून त्यांना निळी वस्त्रे परिधान करण्याचा आदेश दिला. यांना निळे कपडे घालण्याचा आदेश दिला. या अकाली सेनेची एक शाखा सरदार मानसिंह यांच्या नेतृत्वाखाली निहंग सिंही नावाने प्रसिद्ध झाली. पर्शियन अर्थात फारसी भाषेत निहंग शब्दाचा अर्थ मगर आहे म्हणजेच कोणत्याही अत्याचारापुढे मान न तुकविणारी निर्भय व्यक्ती. त्याचा संस्कृत अर्थ निसर्ग असा आहे. म्हणजे संपूर्णपणे अपरिग्रही. अनासक्त, मुक्त, पुत्र, कलत्र आणि जगापासून विरक्त आणि अनिकेत. निहंग लोक विवाह करीत नाहीत आणि साधू वृत्ती धारण करतात. त्यांच्या जथ्याचे (गट) नेतृत्व करणाऱ्याला जत्थेदार म्हणतात. दु:खी, पीडित, आणि दुर्बळांचे रक्षण करण्याबरोबरच शीख पंथाचा प्रचार करणे हे त्यांचे पवित्र कर्तव्य असते. ते इतके शूरवीर होते की प्रत्येक अकाली स्वत:ला सव्वा लाखाच्या बरोबरीचा समजत असे. एखाद्याच्या मृत्यूची बातमीही जणू ती व्यक्ती युद्धाला गेल्याच्या थाटात सांगितली जात असे. जणू मृत्यूलोकात देखील मृत व्यक्ती युद्धाला गेली आहे. कोरड्या हरभऱ्याला बदाम आणि पैसा व सोन्याला तुकडे म्हणत ते आपला निरासक्त, विरक्त भाव दर्शवितात.

> आमच्या उत्सवप्रिय राष्ट्राचे बहुरंगी सौंदर्य आणि चैतन्य आमच्या सण/उत्सव संस्कृतीत आहे आणि बदलत्या ऋतूंशी संबंधित (ऋतुचक्र परिवर्तन) आपल्या विविध सणांच्या मागे असलेले सामाजिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक हेतू आपल्या शाश्वत संस्कृतीच्या उत्कृष्टतेचे प्रतिबिंब आहेत. बैसाखी हा असाच एक निसर्ग उत्सव आहे जो विशेषत: पंजाब, हरयाणा, हिमाचल प्रदेश, उत्तर राजस्थान आणि पश्चिम उत्तर प्रदेशमध्ये साजरा केला जातो. शेतकऱ्यांच्या साध्या, कष्टाळू आणि आनंदी जीवनाची झलक या उत्सवात पाहायला मिळते. आपल्या सर्वांना माहीत आहे की शेती हे अत्यंत कष्टाचे काम आहे. नोकऱ्या आणि व्यवसायात गुंतलेला वर्ग हा केवळ स्वत: आणि कुटुंबापुरता मर्यादित आहे, तर आपले शेतकरी अनेक प्रतिकूल, विषम परिस्थिती आणि नैसर्गिक आपत्तींशी झगडून संपूर्ण देशवासीयांच्या पोटापाण्यासाठी अन्न पिकवतात. म्हणूनच आमच्या सनातन संस्कृतीत शेतकऱ्याला अन्नदाता ही पदवी देण्यात आली आहे.

बैसाखी उत्सवाचा आणखी एक संदर्भ स्वातंत्र्य चळवळीच्या आणखी एका अविस्मरणीय तारखेशी संबंधित आहे. १३ एप्रिल १९१९ रोजी बैसाखी सणाच्या दिवशी अमृतसरमध्ये जालियनवाला बाग हत्याकांड घडले होते. असे म्हणतात की याच बैसाखीच्या दिवशी भगतसिंग यांनी सर्वप्रथम सार्वजनिक ठिकाणी 'मेरा रंग दे बसंती चोला' हे प्रख्यात गीत गायले होते. स्वातंत्र्यापूर्वी बैसाखी सणाने तमाम देशवासीयांना ब्रिटीशांच्या गुलामगिरीविरुद्ध संघटित केले होते, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

एकीकडे इंग्रजी महिन्याचा एप्रिल महिना 'फुल्स डे'ने सुरू होतो, तर दुसरीकडे त्याच एप्रिल महिन्यात येणारा हिंदी महिना बैसाख हा त्याग, समर्पण व बलिदानाची प्रेरणा देणाऱ्या बैसाखी सणाने सुरू होतो, ही विचित्र आणि हास्यास्पद परिस्थिती आहे.

हा कृषी सण देशात वेगवेगळ्या नावांनी साजरा केला जातो हे माहीत असायला हवे. केरळमध्ये याला 'विशू', बंगालमध्ये 'नब वर्षा', आसाममध्ये 'रोंगाली बिहू', तामिळनाडूमध्ये 'पुथंडू' आणि उत्तराखंड आणि बिहारमध्ये 'वैशाख सण' म्हणून साजरा केला जातो. या सणानिमित्त देशभरात बैसाखी मेळ्यांचेही आयोजन केले जाते.

**(पांचजन्यवरून साभार)**




## सॅप: भारतीय व्यवसाय मुख्य व्यवसाय कार्ये बदलण्यासाठी एआयचा वापर

मुंबई : मुंबईतील सॅप नाऊ एआय टूरमध्ये, सॅप इंडियाने आज भारतीय व्यवसायांना कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) कसा फायदा होत आहे याचे नवीन विश्लेषण उघड केले. एआय प्रचारापासून वास्तविक-जगातील प्रभावाकडे वाटचाल करत, भारतीय उद्योग व्यवसाय ऑपरेशन्समध्ये एआय उपायांचा अवलंब करत आहेत, ज्यामुळे २०२५ हे मोजता येणारे एआय परिणामांचे वर्ष बनले आहे.एंटरप्राइझ ॲप्लिकेशन्स आणि बिझनेस एआय मध्ये आघाडीवर असलेली सॅप या वर्षी बाजार भांडवलीकरणाच्या बाबतीत युरोपमधील सर्वात मोठी कंपनी बनली. १९९६ मध्ये स्थापन झाल्यापासून, सॅप इंडियन ऑपरेशन्सने विविध क्षेत्रांमध्ये वाढ आणि नवोपक्रमांना पाठिंबा देण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. महिंद्रा अँड महिंद्रा, एशियन पेंट्स, विप्रो लिमिटेड, इन्फोसिस लिमिटेड, वाहदम टीज, ओला, वेकफिट, देहात, जक्कार आणि इतर अनेक आघाडीच्या संस्थांसोबत भागीदारी करून, त्यांनी देशभरात लक्षणीय आर्थिक प्रभाव पाडण्यास मदत केली आहे.

## 'अर्थ डे' निमित्त पुन्हा एकदा शाश्वत पर्यावरणासाठी आपली वचनबद्धता जाहीर

'अर्थ डे' निमित्त यावर्षी संपूर्ण जग 'अवर पॉवर, अवर प्लॅनेट' या थीमनुसार एकत्रित येत असताना आम्हाला देखील या गोष्टीची जाणीव आहे कि आपल्या पर्यावरणाचे रक्षण करण्याची जबाबदारी आपल्यापैकी प्रत्येकावर आहे. टोयोटा किर्लोस्कर मोटरच्या (टीकेएम) मूलभूत मूल्यांमध्येच ही जबाबदारी समाविष्ट करण्यात आली आहे. त्यामुळे आम्ही सातत्याने नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान तयार करत आहोत आणि वेगवेगळ्या प्रकारची इलेक्ट्रिफाईड वेहिकल टेक्नॉलॉजी (एती*) विकसित करत आहोत, ज्यामध्ये पर्यायी इंधनावर चालणाऱ्या पॉवरट्रेन्सचा(वाहनांचा) समावेश आहे. या प्रयत्नांत आम्ही अनेक मार्गांनी काम करत आहोत, त्याचबरोबर अक्षय ऊर्जेचा(रिनिवेबल एनर्जी) वापर करून सामूहिक शाश्वत उपक्रमांचे नेतृत्व करत आहोत जेणेकरून पर्यावरणदृष्ट्या सक्षम जग घडवता येईल.

## विवोने ७३००एमएएच बॅटरीसह टी४ ५जी लाँच केला

पुणे - जागतिक स्तरावरील नाविन्यपूर्ण स्मार्टफोन ब्रँड असलेल्या विवोने त्यांच्या टी-सिरीजमधील एक नवीन स्मार्टफोन - विवो टी४ ५जी सादर केला आहे. हा फोन भारतातील सर्वात मोठी ७३००एमएएच हाय-डेन्सिटी बॅटरीऑ आणि ९०डब्ल्यू फ्लॅशचार्जसह येतो, जो स्लिम आणि स्टायलिश डिझाइनमध्ये शक्तिशाली बॅटरी परफॉर्मन्स देतो. स्नॅपड्रॅगन ७एस जेन ३ प्रोसेसरद्वारे समर्थित, वीवो टी४ ५जी हा स्मूथ मल्टीटास्किंग अनुभव देतो आणि ८२०के+ -पर्ढीढी स्कोअर मिळवतो, जो त्याच्या सेगमेंटमधील सर्वात वेगवान स्मार्टफोन बनतो. यात या सेगमेंटमधील सर्वात तेजस्वी क्वाड-कर्व्हड अमोलेड डिस्प्ले आहे ज्याची स्थानिक पीक ब्राइटनेस ५०००निट्स पर्यंत आहे.

## टॉमी हिलफिगर मुंबईत दाखल

मुंबई : टॉमी हिलफिगर, या पीव्हीएच कॉर्प.चा भाग असलेल्या ब्रँडने श्री. टॉमी हिलफिगर यांच्या भारतातील मुंबई भेटीची माहिती दिली. १५ एप्रिल २०२५ रोजी जगातील एका सर्वाधिक दमदार आणि स्टायलिश शहरात श्री. हिलफिगर यांनी फॅशन, सांस्कृतिक आदानप्रदान आणि संपर्क असा उत्साही दिवस व्यतित करत या ब्रँडची ओळख अधोरेखित केली. वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स या मुंबईतील लक्झ्युरी शॉपिंग भागात असलेल्या जिओ वर्ल्ड ड्राइव्ह येथील टॉमी हिलफिगरच्या स्टोअरला भेट देऊन या दिवसाची सुरुवात झाली. भारतातील सर्जनशील व्यक्तींमध्ये गणल्या जाणाऱ्या सारा-जेन डायस आणि बॉलिवुड अभिनेत्री, मॉडेल आणि सामाजिक कार्यकर्त्या मानुषी छिल्लर यांच्यासोबत हिलफिगर यांचे चर्चासत्र झाले.

# टोमॅटो-कांदा-भाजीपाला विक्रीसाठी विठ्ठलपूर मार्केट आजपासून सुरू

### २७ एप्रिलला आमदार संजना जाधव यांच्या हस्ते पूजन

तभा वृत्तसेवा

कन्नड :-दि.२३ एप्रिल - कन्नड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या पुढाकाराने विठ्ठलपूर शिवारात टोमॅटो, कांदा व भाजीपाला यासाठी स्वतंत्र बाजारपेठ उभारण्यात आली असून, ही बाजारपेठ आजपासून शेतकऱ्यांसाठी खुली होत आहे. या नव्या बाजारपेठेच्या उद्घाटनानिमित्त २७ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता शिवसेनेच्या आमदार संजना जाधव यांच्या हस्ते पूजन व शेतकरी सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. या नव्या बाजारपेठेमुळे परिसरातील शेतकऱ्यांना आपल्या शेतमालाची विक्री करण्यासाठी आता सुलभ व पारदर्शक व्यवस्था उपलब्ध होणार आहे. यामुळे त्यांना योग्य भाव मिळवण्यास मदत होणार असल्याचे बाजार समितीने सांगितले.

कन्नड कृषी उत्पन्न बाजार समितीने आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये उल्लेखनीय कामगिरी बजावत १ कोटी ३० लाख १९ हजार ५६९ रुपयांचे उत्पन्न मिळवले असून, खर्च वजा जाता समितीला १९ लाख रुपयांचा निव्वळ नफा मिळाल्याची माहिती देण्यात आली. याशिवाय केंद्र शासनाकडून ३८ लाख रुपयांचे अनुदान प्राप्त झाले आहे. या आर्थिक बळकटीच्या जोरावर विठ्ठलपूर शिवारात नव्या बाजारपेठेची संकल्पना प्रत्यक्षात उतरवण्यात आली आहे.

समितीने सर्व शेतकऱ्यांना आवाहन केले आहे की, आपला शेतमाल फक्त अधिकृत बाजार समितीच्या मार्केटमध्येच विक्रीस आणावा. समिती शेतकऱ्यांना योग्य भाव, पारदर्शक व्यवहार आणि सुरक्षिततेची हमी देत आहोत. असेही बाजार समितीचे वतीने सांगण्यात आले आहे.

### शेतकऱ्याच्या मालाला योग्य दर मिळणार

बाजार समितीच्या मार्केटमध्ये शेतमाल विक्री केल्यास शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाचे योग्य आणि बाजार भावानुसार दर मिळतात. येथे वजनावर आधारित व्यवहार होत असल्यामुळे पारदर्शकता कायम राहते आणि शेतकऱ्यांचा विश्वास वाढतो. यामुळे दलालांची मध्यस्थी कमी होते आणि शेतकऱ्यांना थेट फायदा मिळतो. शेतकऱ्यांनी या सुवर्णसंधीचा लाभ घेऊन आपला शेतमाल अधिकृत मार्केटमध्ये विक्रीस आणावा. यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढून त्यांचे जीवन अधिक चांगले होईल.

- साईनाथ आल्हाड, संचालक, कृषी उत्पन्न बाजार समिती कन्नड

### व्यापाऱ्यांनी शेतकऱ्याची फसवणूक करू नये

व्यापाऱ्यांनी शेतकऱ्यांची फसवणूक करू नये यासाठी बाजार समिती नेहमी सतर्क असते आणि वेळोवेळी सतत लक्ष ठेवते. कुठल्याही प्रकारची फसवणूक आढळल्यास संबंधितांविरुद्ध तातडीने योग्य ती कारवाई केली जाते, बाजार समितीचा उद्देश शेतकऱ्यांना न्याय मिळवून देणे आणि पारदर्शक व्यवहार सुनिश्चित करणे हाच आहे. यासाठी बाजार समितीने स्वतंत्र निरीक्षण पथकही तयार केले आहे.

- शेख युसुफ शेख मुनीर, संचालक, कृषी उत्पन्न बाजार समिती, कन्नड

### बाजार समितीचा केंद्रबिंदू नेहमीच शेतकरी आहे

कन्नड कृषी उत्पन्न बाजार समितीचा केंद्रबिंदू नेहमीच शेतकरी आहे. म्हणूनच विठ्ठलपूर येथील मार्केटमुळे कन्नड, खुलताबाद, सिल्लोड, वैजापूर, फुलंब्री परिसरातील हजारो शेतकऱ्यांना थेट फायदा होणार आहे. या माध्यमातून शेतकऱ्यांना आपला शेतमाल अधिक चांगल्या दराने विक्री करण्याची संधी मिळेल. त्यामुळे सर्व शेतकऱ्यांना विनंती आहे की, त्यांनी आपला शेतमाल बाजार समितीतच विक्रीसाठी आणावा आणि या उपक्रमाचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा. हा उपक्रम शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीस हातभार लावणारा ठरेल. बाजार समितीने घेतलेली ही सकारात्मक पावले ग्रामीण अर्थव्यवस्थेस नवी दिशा देतील.

-डॉ.मनोज राठोड, सभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती, कन्नड

## क्रीडा संकुलनासाठी आलेल्या निधीचा योग्य वापर करा : आ संजना जाधव

तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.२६ एप्रिल - कन्नड शहरातील क्रीडा संकुनासाठी आलेल्या निधीचा योग्य वापर करा शहरातील खेळाडूंना व नागरिकांना सुविधा द्या . तालुका क्रीडा अधिकारी दोन दिवसाला शहरात यायलाच पाहिजे . सार्वजनिक व्यायामशाळा सुरू करा .रंग रंगोटी करा खूपच दुरवस्था झालेली दिसत आहे असे तहसीलदार यांच्या दालनात घेण्यात आलेल्या आमदार झाल्यानंतर पहिल्याच अध्यक्षीय बैठकीत संजना जाधव यांनी अधिकाऱ्यांना सूचना दिल्या .

आजपर्यंत किती निधी आला व त्याचा काय उपयोग केला . कोणती कामे केली आज या क्रीडा संकुलनाची खूपच दुरवस्था झालेली दिसत आहे अशा सूचना मांडल्या . क्रीडा संकुल च्या जागेवर भरणाऱ्या भाजी मंडई साठी नगर परिषदने नवीन जागेची व्यवस्था करा , क्रीडा संकुल वर कोण कोणते कर्मचारी नियुक्त केलेले आहेत ते काय काम करतात याची माहिती मला तात्काळ द्या असे आपल्या अध्यक्षतेखाली घेतलेल्या पहिल्याच बैठकीत आमदार जाधव यांनी क्रीडा अधिकाऱ्यांना सुनावले या बैठकीला उपविभागीय अधिकारी संतोष गोरड , प्रभारी तहसीलदार दिलीपकुमार सोनवणे , जिल्हा क्रीडा अधिकारी बाजीराव देसाई , तालुका क्रीडाअधिकारी सचिन पुरी , नगरपालिकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी भालेराव सहाय्यक पोलीस निरीक्षक कुणाल सूर्यवंशी , शिक्षण विभागाचे लाडके , बांधकाम विभागाचे इंजिनियर प्रशांत एरणे पंचायत समितीचे सहाय्यक गटविकास अधिकारी विजय पंडित , विस्तार अधिकारी संतोष दारकुंडे , उपस्थित होते .

## सह्याद्री फाटा परिसरात स्पीडब्रेकर बसवण्याची मागणी



तभा वृत्तसेवा

पैठण दि २३ :- राज्य महामार्गाला जोडणारा सह्याद्री हॉटेल चौफुलीवर पैठण शहरात प्रवेश करणाऱ्या तसेच बाहेर जाणाऱ्या रस्त्यावर अपूर्ण कमानी लगत गतिरोधक बसवण्याची मागणी येथील नागरिकांनी केली आहे.

पैठण शहरात प्रवेश करणाऱ्या कमानी जवळ स्पीडब्रेकर नसल्याने मोठ्या स्पीडने वाहने चौपदरी रस्त्यावर येत असून याठिकाणी रस्ता झाल्याने आधीच गाड्या मोठ्या वेगाने जात असतांना यामुळे मोठा अपघात घडण्याची शक्यता निर्माण झाली आहे.दक्षिण काशीत येणारे भाविक पर्यटक मोठ्या प्रमाणात या रस्त्याने येत असतात तसेच परिसरात शाळा, दवाखाना, शॉपिंग मॉल, शोरूम, हॉटेल असल्याने या चौकात नेहमी नागरिकांची वर्दळ असते यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने याठिकाणी तात्काळ स्पीडब्रेकर टाकावे अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

## सारिका काबरा यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ शुक्रवार रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२३ एप्रिल

छत्रपती संभाजीनगर येथील सारिका काबरा यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दि.२५ शुक्रवार रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. दलालवाडी येथील औषधी भवनातील मीटिंग हॉल येथे सकाळी १० वा.शिबिर सुरू होईल.यासाठी सारिका काबरा मित्ररक्त डाटा बँक,लायन्स क्लब,छत्रपती संभाजीनगर केमिस्ट असोसिएशन,माहेश्वरी मित्र मंडळ सहकार्य करीत आहे.यात सहभागी होऊन रक्तदान करण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.तरी या शिबिरात जास्तीत जास्त रक्तदान करावे ही विनंती आहे.

## संघ हीच जीवनगाथा



अलकः- (९९) विवेकानंद शिला स्मारक

सुरुवातीला या शिलेवर विवेकानंद शिला नावाची पाटी लावली. परंतु या पाटीला तमिळनाडूच्या मसीहा चर्चने विरोध केला. जवळपास सगळ्याच तटवर्ती (मछुआरे) कोळी समुदायाचे धर्मांतरण करून त्यांना ख्रिश्चन बनवले होते. चर्चने अनेक तऱ्हेने बल-कपट चा प्रयोग केला होता. सर्वप्रथम चर्चने शिलेवर लावलेल्या विवेकानंद शिला स्मारकाची पाटी उडवली व तिथे काँक्रीटचा विशाल क्रॉस उभा केला. आणि त्या ठिकाणी सेंट झेवियरचे स्मारक उभे करण्याचे घोषित केले. जेवियर हा धर्मांतरण करणारा पोर्तुगीज मिशनरी होता. परंतु नंतर काही


संघकार्यकर्त्यांनी पोहत जाऊन त्या क्रॉस ची तोडफोड केली. परत एक छोटी पाटी तिथे लावली. आणि यावेळी तमिळनाडू सरकारने शिला स्थानाच्या चारी बाजूने १४४ कलम जारी केले. स्मारक प्रमुख एकनाथजी रानडे यांनी राष्ट्रीय स्मारक समितीचे गठन केले. त्या समितीचे अध्यक्ष होते श्री मन्मथ पद्मनाभन आणि संपूर्ण देशातील अनेक एकनिष्ठ स्वयंसेवक त्याचे पदाधिकारी झाले. श्री एकनाथजींच्या मार्गदर्शनाखाली ही समिती कार्यरत होती. साऱ्या देशभरातून प्रत्येक नागरिकाकडून कमीत कमी फक्त एक रुपया घ्यावा त्याहून जास्त निधी तुमच्या मर्जीप्रमाणे द्यावा असे ठरले. स्वामी विवेकानंदांच्या छोट्या-मोठ्या गोष्टी शाळा- कॉलेजातून सांगणे सुरू झाले. थोडक्यात करोडो देशवासीयांच्या हृदयात स्वामीजींना आपुलकीचे स्थान मिळाले धनसंग्रहाचा प्रश्न चुटकीसरशी सुटला. आणि चार सप्टेंबर १९७१ ला कन्याकुमारीला स्वामी विवेकानंद शिला स्मारकाचे उद् घाटन

तेव्हाचे राष्ट्रपती वराहगिरी व्यंकट गिरी यांच्या हस्ते झाले. प्रकृती अस्वास्थ्य मुळे श्री गुरुजी जाऊ शकले नव्हते. पण नंतर त्यांनी आवर्जून भेट दिली व स्मारक पाहून श्री. गुरुजींच्या डोळ्यातून आनंदाश्रू वाहिले

क्रमशः

**लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१,
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती

## लव फिल्म्स प्रस्तुत 'देवमाणूस' - भावनांनी भरलेला, थरारक अनुभव लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला!



छत्रपती संभाजीनगर - लव रंजन आणि अंकुर गर्ग यांच्या लव फिल्म्सची निर्मिती असलेला आणि तेजस प्रभा विजय देऊस्कर दिग्दर्शित 'देवमाणूस' हा बहुप्रतिक्षित मराठी चित्रपट २५ एप्रिल २०२५ रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. हा चित्रपट लव फिल्म्सच्या मराठी सिनेसृष्टीतील प्रवासाची सुरुवात अधोरेखित करणारा एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. 'देवमाणूस' मध्ये महेश मांजरेकर, रेणुका शहाणे, सुबोध भावे, सिद्धार्थ बोडके यांसारख्या ताकदीच्या कलाकारांच्या प्रमुख भूमिका असून त्यांच्या अभिनयामुळे चित्रपटाची कथा अधिक प्रभावीपणे प्रेक्षकांपर्यंत पोहोचणार आहे. या चित्रपटाचा ट्रेलर नुकताच प्रदर्शित झाला असून ट्रेलरला प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे.

## आयुष्याला नव्याने सामोरे जाण्याची प्रेरणा देणारा 'आता थांबायचं नाय' १ मेला येणार प्रेक्षकांच्या भेटीला



छत्रपती संभाजीनगर - झी स्टुडिओज् नेहमीच प्रेक्षकांना , मनोरंजक, दर्जेदार आशय असलेले चित्रपट देत आले आहेत. झी स्टुडिओज्, चॉक अँड चीज फिल्म्स आणि फिल्म जॅझ मिळून आपल्यासाठी असाच एक सकारात्मक दृष्टिकोन देणारा चित्रपट आपल्या प्रेक्षकांसाठी घेऊन येत आहेत . सहकुटुंब हसत खेळत प्रत्येकाला अंतर्मुख करायला लावणारा 'आता थांबायचं नाय' हा चित्रपट येत्या महाराष्ट्रदिनी म्हणजेच १ मे रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

परीक्षा म्हंटल की पोटात गोळा येतो पण या चित्रपटातील परीक्षेचे किस्से तुम्हाला कधी हसवतील, तर कधी रडवतील आणि जाताना नक्कीच काहीतरी देऊन जातील. या चित्रपटातील 'भोलानाथ'चे लहान मुलांचे मोठ्यांसाठी असलेले गाणे या चित्रपटाबद्दलची उत्सुकता अधिकच वाढवणारे आहे. यावर्षी लहानांच्या सुट्टीत मोठ्यांची शाळा आपल्याला या चित्रपटाच्या निमित्ताने पाहायला मिळणार हे नक्की !


## जाहीर प्रगटन

**मे. दिवाणी न्यायाधिश क. स्तर गंगापुर न्यायालय गंगापुर**

सिव्हील एम.ए.३२७/२०२५

अर्जदार : १) रशिदा उस्मानशा शाह, वय ७३ वर्ष धंदा घरकाम, रा. घोडेगाव ता. गंगापुर जि.छत्रपती संभाजीनगर २) सबेराबी रफिकशा सय्यद, वय ४७ वर्ष धंदा घरकाम. रा. शंकरपुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ३) राजु उस्मान शाह, वय ५७ वर्ष धंदा-शेती, रा. सांवगी लासुरस्टेशन ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ४) शब्बीर उस्मान शाह, वय ४८ वर्ष धंदा शेती, रा. घोडेगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ५) फारूख उस्मान शहा, वय ५१ वर्ष धंदा-शेती. रा. घोडेगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ६) सुलताना कलीम शाहा, वय ५४ वर्ष धंदा-शेती, रा. संवदगाव ता. वैजापुर जि. छत्रपती संभाजीनगर ७) अफसर आनसार शाहा, वय ५० वर्ष धंदा-शेती. रा. लासुररोड सावंगी ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ८) रूक्सानाबी आबेद शहा, वय ३५ वर्ष धंदा शेती, रा. मक्रणपुरता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार-निरंक

प्रकरण- वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत.

उपरोक्त विषयी सर्वत्र कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदारांनी त्यांचे विधीज्ञ ॲड.श्री.जी.बी.चव्हाण यांचे मार्फत अर्ज सादर केला की, अर्जदार क. १ ही अर्जदार नं. २ व ८ ची आई आहे. अर्जदार नं. १ चे पती व अर्जदार नं. २ व ८ यांचे वडिल नामे उस्मान कडु शाहा हेमौजे घोडेगाव ता. गंगापुर येथील रहिवाशी होते ते दि. २४/११/२०२२ रोजी मौजे घोडेगाव ता. गंगापुर येथे मयत झालेले आहेत. अर्जदार नं. १ ते ८ हे मयताचे कायदेशीर वारसदार आहेत. अर्जदार यांचे व्यतिरिक्त मयतास इतर कुणीहीवारसदार नाही. मयताची आई ब-याच वर्षापुर्वी मयत झालेली आहे.

अर्जदार नं. १ ते ८ यांचे व्यतिरिक्त मयतास कुणीही इतर वारसदार नाही. अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारसदार असून अर्जदार यांच्या व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारसदार नसल्याचे नमुद करून मयताचे पश्चात कार्यालयीन शासकीय व इतर कामासाठी या न्यायालयात वारसप्रमाणपत्र मिळणेकामी अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तूत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्याचा असलेला आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा मद्तीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. सदर प्रकरणात पढील तारीख दिनांक १६/०६/२०२५ रोजीची ठेवण्यात आलेली आहे. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक २१/०४/२०२५ रोजी दिले.

कनिष्ठ लिपीक | सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय गंगापुर

## जाहीर प्रगटन

**मा. श्री. ए. बी. इंगोले, ३ रे सह. दिवाणी न्यायाधिश, (क. स्तर) न्यायालय गंगापूर**

सिव्हील एम.ए. क्रं. ३३१/२०२५ पुढील तारीख १३/०६/२०२५

अर्जदार : १) बाळु पिता विनायक सरोवर वय ६३ वर्षे, धंदा मजूरी रा. जामगांव, ता. गंगापूर जि. औरंगाबाद २) विमल भ्र. गोरखनाथ चव्हाण वय ५९ वर्षे, धंदा घरकाम रा. घर नं. २-२-२१, सूर्यवाडी, हर्मुल ता. जि. औरंगाबाद ३) पंढरीनाथ पिता विनायकराव सरोवर वय ४९ वर्षे, धंदा मजूरी रा. गल्ली नं. ५/६, जाधववाडी, सुरेवाडी, औरंगाबाद, ता. जि. औरंगाबाद ४) अशोक पिता विनायक सरोवर वय ५२ वर्षे, धंदा मजूरी रा. डोणगांव, ता. गंगापूर जि. औरंगाबाद

// विरूध्द //

गैरअर्जदार - निरंक

प्रकरण - बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणेबाबत.

सर्व जनतेस कळविण्यात येते उपरोक्त अर्जदारांनी या न्यायालात ॲड. आफताब एस. शेख रा. गंगापूर ता. गंगापूर यांच्या मार्फत बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट / वारस प्रमाणपत्र मिळणेकामी अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्रं. १ ते ४ हे वरील नमुद ठिकाणचे कायमस्वरूपी राहणारे असून अर्जदार क्रं. १ ते ४ हे आपसात सख्खे भाऊ, विवाहीत बहिणी आहे. अर्जदार क्र. १ ते ४ यांचे वडील नामे विनायक दादा सरोवर हे दिनांक २८/१०/२०१९ रोजी मयत झालेले आहे. तसेच अर्जदार क्र. १ ते ४ यांची आई नामे सरस्वती विनायक सरोवर ह्या दिनांक २१/०२/२०२३ रोजी मयत झालेली आहे. तसेच अर्जदार क्र. १ ते ४ यांचे आजी आजोबा हे बऱ्याच वषापुर्वी मयत झालेले आहे. त्यामुळे मयत विनायक दादा सरोवर यांना अर्जदार क्रं. १, ३ व ४ हे मुले असून अर्जदार क्रं. २ ही विवाहीत मुलगी या नात्याने कायदेशीर वारसदार असून अर्जदार क्रं. १ ते ४ यांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाही. दोन्ही मयत मौजे डोणगांव, ता. गंगापूर जि. औरंगाबाद येथील कायमचे रहिवाशी होते. मयत विनायक दादा सरोवर यांच्या मृत्युमुळे अर्जदारांना शासकिय, निमशासकिय व इतर कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदारांनी सदरचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला असून वारस प्रमाणपत्राची मागणी केलेली आहे. सबब सदर प्रकरणी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप किंवा उजर असल्यास त्यांनी प्रस्तुत जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालात नोंदवावा. त्यानंतर आलेल्या उजर, आक्षेपाचा विचार केला जाणार नाही व अर्जदारांच्या मागणीप्रमाणे त्यांच्या हक्कात वारस प्रमाणपत्र देण्यात येईल करीता जाहीर प्रगटन.

आज दिनांक २१/०४/२०२५ रोजी माझ्या सहिने व या न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरून

लिपीक | सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क.स्तर गंगापूर

## जाहीर प्रगटन

**मा. ए.आय. आवटी मॅडम, दिवाणी न्यायाधिश, कनिष्ठ स्तर, कन्नड यांच्या न्यायालयात.**

दि.कि. अर्ज क्र.२२३/२०२५ पुढील तारीख ०२/०५/२०२५

अर्जदार :- १) सुशिला भ्र. सुभाष गायकवाड, वय- ४१ वर्षे, धंदा- मजुरी, रा. आंबा तांडा, ता. कन्नड जि. औरंगाबाद २) गोरख पि. सुभाष गायकवाड, वय २१ वर्षे, धंदा मजुरी, रा. आंबा तांडा, ता. कन्नड जि. औरंगाबाद ३) खंडु पि. सुभाष गायकवाड, वय- १६ वर्षे, धंदा- शिक्षण, अ.पा.क. अर्जदार क्र. १ जन्मदाती आई. ४) मनिषा भ्र. दिगंबर जाधव, वय २१ वर्षे, धंदा घरकाम, रा. शिंदी बोढरा, ता. चाळीसगाव जि. जळगाव,

विरुध्द

गैरअर्जदार - महाराष्ट्र शासन तर्फे जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद

अर्ज - वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ जे. सी. मगर यांचे मार्फत मा. न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार क्र. १ ते ४ हे वरील ठिकाणचे कायमचे रहीवाशी असुन अर्जदार क्र. १ ही अर्जदार क्र. २ ते ४ यांची आई असुन अर्जदार क्र. २ ते ४ हे आपसात सख्खे भाऊ-बहीन आहे. अर्जदार क्र. १ हो अर्जदार क्र. ३ ची अ.पा.क. जन्मदाती आई आहे.

अर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार क्र. २ ते ४ यांचे वडील नामे सुभाष उखा गायकवाड हे होते ते दिनांक २९/०१/२०२५ रोजी सायंकाळी मौजे विडणी ता. फलटन जि. सातारा येथे नितीन खंडु शेंडे यांच्या शेतात उसतोड करत असतांना मयताच्या अंगावर विजेचे तार पडली व त्यामुळे त्यांचा जागेवरच मृत्यु झाला मयत सुभाष उखा गायकवाड यांचा अंत्यविधी मौजे विडणी येथे झालेला आहे. त्यासंबंधी पोलीस स्टेशन फलटन ग्रामीण यांच्याकडे रितसर नोंद झाली असुन त्यास आकस्मात मयत नं. १३/२०२५ असा आहे. त्याची सत्य प्रत दाखल करीत असुन पोस्ट मॉटम रिपोर्टची सत्य प्रत, दाखल करीत आहे. तसेच मयत सुभाष उखा गायकवाड हे मौजे आंबा तांडा येथील कायमचे रहीवाशी होते. अर्जदार यांना मयत सुभाष उखा गायकवाड यांचे वारस प्रमाणपत्र हे शासकिय तसेच निमशासकिय, तलाठी, जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात देण्यासाठी, तसेच महसुल दप्तरी वारसाची नोंद करण्यासाठी तसेच विविध योजनेचा लाभ घेण्यासाठी, तसेच अपघात क्लेम मिळण्यासाठी तसेच मयताचे वारस असल्याची नोंद करण्यासाठी सदरील वारस प्रमाणपत्राची मागणी अर्जदार क्र. १ ते ४ हे करीत आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनव्दारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, सदर प्रकरणाबाबत कोणासही काही उजर. आक्षेप असल्यास त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात स्वतः अगर आपले विधिज्ञामार्फत हजर राहून उजर, आक्षेप सादर करावा. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास, अर्जदारांचे हक्कात वारस प्रमाणपत्र प्रदान करण्याचा आदेश पारीत करण्यात येईल.

सबब हे जाहीर प्रगटन.

दिनांक १६/०४/२०२५

आदेशावरुन

क. लिपिक | सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय, क. स्तर, कन्नड

## जाहीर प्रगटन

**मा. ए. आय. आवटी साहेब दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर कन्नड यांच्या न्यायालयात.**

दि.कि.अर्ज क्र. १४९/२०२५ पुढील तारीख २५/०४/२०२५

अर्जदार : १. विठ्ठल सोमा पवार, वय ५२, धंदा शेत, रा. वडनेर तांडा, ता. काड जि. औरंगाबाद, २. राजपाल विठ्ठल पवार, वय ३४, धंदा नोकरी, रा. बडनेर तांडा, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ३. शेषपाल विठ्ठल पवार, वय २८, धंदा-शेती, रा. वडनेर तांडा ता. कन्नड, जि. औरंगाबाद,

विरुद्ध

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन द्वारा जिल्हाधिकारी कार्यालय, छ. संभाजीनगर,

अर्ज :- बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ कलम २ व ३ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदारांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. डी. एन. चव्हाण यांच्या मार्फत मा. न्यायालयात अर्ज सदर केला कि, हे की, हे की, अर्जदार क्र. १ मयत काशीबाई विठ्ठल पवार यांचा पती आहे. अर्जदार क. २ ते ३ हे मुले आहेत. तसेच अर्जदार क्र. २ ते ३ आपसात सख्खे भाऊ असून अर्जदार क्र. १ हे त्यांचे वडील आहेत. मयत काशीबाई विठ्ठल जाधव यांना अर्जदार क्र. १ ते ३ हे कायदेशीर वारस आहे. अर्जदार १ ते ३ यांच्या व्यतिरिक्त मायतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाही. हे की, अर्जदार क्र. १ ची पत्नी व अर्जदार क्र. २ ते ३ यांची आई नामे काशीबाई विठ्ठल पवार ह्या वडनेर तांडा येथील रहिवाशी होते. मयत काशीबाई विठ्ठल पवार दि.०४/०४/२०२४ रोजी वडनेर तांडा, ता. कन्नड, जि. औरंगाबाद येथे आजारपणामुळे मरण पावली आहे. की, अर्जदार कं. १ ते ३ यांना मयत काशीबाई विठ्ठल पवार यांचे मृत्यू पश्चात तहसिल कार्यालय, नगर पालिका कार्यालय, ग्रामपंचायत कार्यालय, उपअधिक्षक भूमि अभिलेख कार्यालय, गाव, नगर व शहर भूमापन कार्यालय, तलाठी कार्यालय, महसूल दप्तरी, गट विकास अधिकारी कार्यालय व इतर शासकिय व निमशासकिय कार्यालय मध्ये आवश्यक ते कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदार कं. १ ते ३ हे मयताचे वारस असल्याबाबत कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. हे की, मयत काशीबाई विठ्ठल पवार हि वडनेर तांडा आजारपणामुळे मयत झाले आहे. सदरील मयतास अर्जदार कं, १ ते ३ हे कायदेशीर वारस असून त्यांना वेळोवेळी वेगवेगळ्या कार्यालयात वारस प्रमाणपत्राची आवश्यकता भासत असल्यामुळे सदरील अर्जास कारण दिनांक २०/०२/२०२५ रोजी मौजे वडनेर तांडा ता. कन्नड येथे घडले. त्याअर्थी या जाहीर प्रकटनाद्वारे सर्व जनतेस सूचित करण्यात येते कि, सदरील प्रकरणाबाबत कोणताही काही उजर आक्षेप असल्यास त्यांनी सदर जाहीर प्रकटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात स्वतः अगर आपले विधिज्ञामार्फत हजर राहून उजर आक्षेप दाखल करावा. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

दि. १६/०४/२०२५

आदेशावरुन

क. लिपिक | सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय, क. स्तर, कन्नड

## अग्रलेख...

# एक साधा प्रश्न माझा, लाख येती उत्तरे!

भारतातील सर्वांत जुन्या काँग्रेस पक्षाचे खासदार आणि लोकसभेतील विद्यमान विरोधी पक्षनेते राहुल गांधी असे प्रश्न विचारतात की, त्याची असंख्य उत्तरे दिली जाऊ शकतात. आता त्यांनी अमेरिकेत जाऊन असा प्रश्न केला की, महाराष्ट्रात भाजपाचा विजय झालाच कसा...? या प्रश्नाचे उत्तर अमेरिकेत जाऊन कसे मिळेल? ते भारतात किंवा महाराष्ट्रात मिळेल आणि एका ओळीचे उत्तर त्यांच्या प्रश्नाला मिळू शकत नाही. त्यांच्या प्रश्नाचे उत्तर अनेक मुद्यांमध्ये दिले जाऊ शकते आणि ते ऐकायचे असेल तर त्यांनी महाराष्ट्रात यावे आणि कार्यकर्त्यांचे ऐकावे, एवढाच सल्ला दिला जाऊ शकतो. तर, मुद्दा असा की, एकेकाळी संपूर्ण देशावर आणि देशातल्या जवळजवळ प्रत्येक राज्यावर काँग्रेसची सत्ता होती. आता ती केवळ तीन राज्यांपुरती उरलेली आहे. महाराष्ट्रातच नव्हे, तर संपूर्ण भारतात काँग्रेसचा पाडाव झालेला आहे. त्याला कारण आहे काँग्रेसची स्वतःची धोरणे, धरसोड वृत्ती, गांधी घराण्याचा सोस आणि संघटनात्मक ताकदीचा अभाव. हीच कारणे महाराष्ट्रातही काँग्रेसला घेऊन बुडाली. निवडणुकीतील प्रत्येक पराभवानंतर राहुल गांधी यांचे एक पालुपद असते. हा पराभव आमच्यासाठी अनपेक्षित आहे आणि आम्ही लवकरात लवकर या पराभवाचे विश्लेषण करून पुढील रणनीती ठरवू, असे ते म्हणतात. आजवर एकाही पराभवानंतर त्यांनी किंवा त्यांच्या पक्षाने विश्लेषण केले किंवा रणनीती ठरविली असे घडले नाही. तसे ऐकण्यात-वाचण्यात आले नाही. अजूनही काँग्रेसमध्ये दरबारी पद्धतीचे राजकारण सुरू आहे. गांधी घराण्याचा वरचष्मा आहे. जुन्या मुखंडांची भरती आहे. या पक्षाला ठोस धोरण नाही, चेहरा नाही आणि दिशाही नाही. असे असताना आपल्याला केवळ 'काँग्रेस' म्हणून लोकांनी मते द्यावीत आणि सत्तेत बसवावे, अशी अपेक्षा राहुल गांधी करीत असतील तर त्यांच्या विनोदी स्वभावाला तोड नाही, असेच म्हणावे लागेल. राहुल गांधी यांच्या लक्षात यायला हवे की, आपण विदेशात आपल्या देशाबद्दल बोलतो तेव्हा जबाबदारीने शब्द उच्चारायचे असतात. आपले वाद-मतभेद जे काही असतील, त्यावर तोडगे काढण्याची सोय देशात आहे. अमेरिका त्यात कोणतीही मदत किंवा हस्तक्षेप करू शकत नाही. राहुल गांधी हे विरोधी पक्षनेते असल्यामुळे त्यांनी सत्ताधीशांच्या विरोधात बोलणे ही नवलाई नाही. त्यावर आक्षेपही असण्याचे कारण नाही. परंतु, कुठे आणि काय बोलावे, याचे तारतम्य त्यांनी बाळगावे, अशी अपेक्षा ठेवली तर वावगे ठरू नये. लोकशाहीत विरोधाचे महत्त्व आहेच. त्यामुळेच राहुल गांधी यांच्याकडे लोकसभेतील विरोधी पक्ष नेत्याचे जबाबदारीचे व संवैधानिक पद आलेले आहे. पण, त्यांना लोकतांत्रिक प्रक्रियेतून आलेले निकाल मान्य नाहीत आणि संवैधानिक जबाबदारीचे भानही नाही, हे त्यांच्या वक्तव्यांमधून दिसून येते. ते वारंवार असेच बोलत असतात. ब्रिटनमध्येही तेच आणि अमेरिकेतही तेच. राहुल गांधी स्वत: संवैधानिक पदावर आहेत. निवडणूक आयोग ही संवैधानिक यंत्रणा आहे. निवडणूक ही संवैधानिक पद्धतीने नियुक्त केलेल्या आयोगाच्या मार्फत कायदेशीर पद्धतीने झाली आणि त्याच पद्धतीने तिचे निकाल लागले. भाजपाच्या नेतृत्वात महायुतीचे सरकार महाराष्ट्रात आले. त्याची कारणे आपल्याला ठावूक नाहीत, असे राहुल गांधी म्हणत असतील तर ते जबाबदारीपासून पळ काढत आहेत आणि निवडणूक आयोगाबद्दल संशय उत्पन्न करीत असतील तर ते देशाच्या संपूर्ण घटनात्मक व्यवस्थेची नाचक्की करीत आहेत, असेच म्हटले पाहिजे. भारत ही जगातील सर्वांत मोठी लोकशाही आहे. १४२ कोटी लोकसंख्या, शेकडो भाषा, अनेक धर्म-पंथ, असंख्य जाती-जमाती, अनेक प्रकारची संस्कृती, उपासना पद्धतीचे असंख्य प्रकार, खाद्य संस्कृतीतील विविधता, भौगोलिक व वातावरणातील वैविध्य अशी विविधतेची किती तरी उदाहरणे काढता येतील. एवढे वैविध्य असलेला देश एकसंध आहे तो संविधानामुळे आणि संवैधानिक व्यवस्था-यंत्रणांमुळे. भारताचे नागरिक ही आपल्या सर्वांची संवैधानिक ओळख. आता राहिला प्रश्न महाराष्ट्रातील भाजपाच्या विजयाचा. राहिला प्रश्न महाराष्ट्राच्या निकालांचा. त्याबद्दलचा प्रश्न राहुलजींनी अमेरिकेत जाऊन विचारला. त्यांनी महाराष्ट्रात आठ-पंधरा दिवस वेळ देऊन फेरफटका मारला असता तर त्यांनी असा प्रश्न आणि तोसुद्धा परक्या भूमीत विचारला नसता. गतवर्षी झालेल्या लोकसभा निवडणुकीतील महाविकास आघाडीच्या कामगिरीने काँग्रेसच्या आशा पल्लवित झाल्या होत्या. पण, त्याच विजयाने महाविकास आघाडीला आणि विशेषतः काँग्रेसला बेसावध ठेवले. याच निकालाने भाजपाला आणि मित्र पक्षांना मात्र सावध केले. एकीकडे भाजपाने विधानसभा निवडणूक कोणत्याही परिस्थितीत जिंकण्याचा प्रण केला होता. त्यासाठी लोकसभेच्या आधीच तयारी सुरू होती. तिला लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर अधिक वेग दिला गेला. महाविकास आघाडीच्या तंबूत मात्र लोकसभेतील भाजपाला आता यश मिळणे नाही, याची खात्री झाल्यागत माहोल होता. काँग्रेसमध्ये नेहमीचा अंतर्गत कलगीतुरा सुरू होता. महाविकास आघाडीत सुसंवादाचा अभाव सुरुवातीपासून आहेच. तो कायम होता. या पृष्ठभूमीवर महाराष्ट्राची विधानसभा निवडणूक झाली. बेसावध आणि गटबाजीने ग्रस्त पक्ष किंवा आघाडीच्या तुलनेत सावध आणि एकसंध पक्ष व आघाडीची कामगिरी चांगलीच राहणार. तशी कामगिरी महायुतीने दाखविली आणि विजय मिळविला. यात अमेरिकेत जाऊन प्रश्न विचारण्यासारखे अद्‌भुत काहीही नाही. भाजपा एकेक पाऊल पुढे जात असताना काँग्रेसकडे रणनीतीच नव्हती. काँग्रेसच्या उमेदवारांना वाऱ्यावर सोडून दिले गेले होते. २८८ जागांच्या विधानसभेच्या निवडणुकीत काँग्रेस पक्ष १०८ जागा लढला. महाराष्ट्रासारख्या महत्त्वाच्या राज्यात राहुल गांधी, मल्लिकार्जुन खडगे, प्रियांका गांधी यांनी अपेक्षित लक्ष टाकले नाही. ते यायला लागले तेव्हा उशीर झालेला होता. वातावरण महायुतीच्या बाजूने आधीच वळलेले होते. काँग्रेसकडे मुद्दा नव्हता, नॅरेटिव्ह नव्हते आणि नेतृत्वही नव्हते. भाजपाने मात्र मित्रपक्षांना सोबत घेतले, त्यांना विश्वास दिला. निवडणुकीच्या मुद्यांचा योग्य वापर केला आणि निवडणूक निवडणुकीच्या पद्धतीने लढविली. भाजपाच्या मुत्सद्देगिरीच्या व रणनीतीच्या पासंगात काँग्रेसची कोणतीच तयारी बसत नव्हती. त्यामुळे काँग्रेसचा व महाविकास आघाडीचा पराभव झाला. राहुल गांधींनी स्वपक्षीयांना विचारले पाहिजे की, आपल्या पक्षाचा, आघाडीचा पराभव झाला कसा? त्यांनी हे तपासले पाहिजे की, त्यांचे मित्रपक्ष खरे बोलतात काय, त्यांचे वरिष्ठ नेते आपल्या चुका मान्य करतात काय, आपल्या उमेदवारांना पक्षाने साथ दिली काय, आपल्या पक्षाची प्रचार यंत्रणा व्यवस्थित होती काय इत्यादी. या सर्व प्रश्नांची खरी उत्तरे राहुल गांधी यांनी मिळविली पाहिजे. त्यांना त्यासाठी महाराष्ट्रात यावे लागेल. काँग्रेसच्या कार्यकर्त्यांचे ऐकावे लागेल. नेते खरे बोलणार नाहीत. त्यांना पक्षापेक्षा गटबाजी महत्त्वाची आहे. महाराष्ट्रातला कोणताही जिल्हा घ्या. काँग्रेस एकसंध दिसणार नाही. गटबाजी आहेच व असतेच. त्यामुळे महाराष्ट्रातील काँग्रेसच्या तळागाळातील कार्यकर्त्यांशी राहुल गांधी, मल्लिकार्जुन खडगे आणि इतर देश पातळीवरील नेत्यांनी बोलावे. नेत्यांनी फक्त ऐकावे. राहुल गांधी यांना त्यांनी अमेरिकेत विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर तर मिळेलच. काँग्रेसचा व कार्यकर्त्यांचा आणि काँग्रेसचा व जनतेचा आता कोणताच संबंध उरलेला नाही. संपर्कही नाही. फक्त निवडणुकीत आपला पक्ष उभा असतो, हे पुरेसे नाही. तो सदासर्वकाळ आपला पक्ष वाटला पाहिजे. तसे आपल्या कार्यकर्त्यांना वाटते काय, एवढे तर राहुल गांधींनी महाराष्ट्रात येऊन विचारावे आणि कार्यकर्त्यांचे म्हणणे ऐकून घ्यावे. त्यांना सगळे कळेल. भाजपाचा विजय स्वाभाविक होता, हेही कळेल आणि आपल्या पराभवाचे मर्मही लक्षात येईल. एक नव्हे अनेक कारणे सापडतील. मग ते म्हणू शकतात की...

**एक साधा प्रश्न माझा, लाख येती उत्तरे!**
**हे खरे की ते खरे की ते खरे की ते खरे?**

## विशेष

# वाहन उद्योगाचा टॉप गिअर

**प्रा. सुखदेव बखळे**

ऑटोमोबाईल उद्योग हा भारताच्या अर्थव्यवस्थेचा एक महत्त्वाचा भाग आहे. देशाच्या जीडीपीमध्ये या क्षेत्राचा वाटा ७.१ टक्के असून, जीडीपीमध्ये ४९ टक्के योगदान आहे. भारत सध्या जगातील चौथा सर्वांत मोठा वाहन उत्पादक देश आहे. २०२३-२४ मध्ये भारतात २.८ कोटींहून अधिक वाहने तयार झाली. तथापि, जागतिक ऑटो पार्ट्सच्या व्यापारात भारताचा वाटा सध्या केवळ तीन टक्के (सुमारे २० अब्ज डॉलर) आहे. याचा अर्थ भारतीय उद्योगवाढीसाठी भरपूर वाव आहे. 'नीती' आयोगाच्या अहवालानुसार, २०३० पर्यंत उत्पादन १४५ अब्ज डॉलर्स, निर्यात ६० अब्ज आणि ऑटो पार्ट्सच्या व्यापाराचा हिस्सा आठ टक्क्यांपर्यंत वाढवण्याचे लक्ष्य आहे. अहवालात असेही म्हटले आहे की इलेक्ट्रिक वाहनांच्या वाढत्या वापरामुळे बॅटरी, सेमीकंडक्टर आणि प्रगत सामग्रीची मागणी झपाट्याने वाढत आहे. एकटा चीन या वर्षामध्ये आठ दशलक्षापेक्षा जास्त 'ईव्ही' तयार करेल, तर युरोपीय महासंघ आणि अमेरिकादेखील 'ईव्ही' वाहनांसाठी प्रोत्साहन योजना आखत आहेत. आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय), रोबोटिक्स, डिजिटल ट्विन्स, इंटरनेट ऑफ थिंग्ज (आयओटी आणि थ्री डी प्रिंटिंग यासारख्या नवीन तंत्रज्ञानाचा वापर वाहननिर्मिती प्रक्रिया स्मार्ट आणि कार्यक्षम बनवत आहे. जर्मनी आणि दक्षिण कोरियासारखे देश स्मार्ट फॅक्टरी स्पेसमध्ये आधीच आघाडीवर आहेत. आज अनेक जागतिक ऑटोमोबाईल कंपन्या भारतातील स्मार्ट कारखान्यांमध्ये गुंतवणूक करत आहेत. केंद्र सरकारच्या 'फेम', 'पीएम-ई ड्राईव्ह' आणि 'पीएलआय'सारख्या योजनांतर्गत आतापर्यंत ६६ हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक मदत देण्यात आली आहे. ती इलेक्ट्रिक वाहने आणि स्थानिक उत्पादनाला प्रोत्साहन देत आहे.

योग्य रणनीती अवलंबिल्यास भारत जगाला पुढील पिढीच्या 'मोबिलिटी सोल्यूशन्स'चा प्रमुख पुरवठादार बनवू शकतो, असे अहवालात म्हटले आहे. भारताचे ऑटोमोबाईल क्षेत्र आज खूप वेगाने वाढत आहे. तो देशाच्या अर्थव्यवस्थेचा एक मजबूत भाग बनला आहे. सरकारच्या 'मेक इन इंडिया' योजनेने त्याला नवी उंची दिली आहे. २०२३-२४ मध्ये भारताने २८ दशलक्ष वाहनांची निर्मिती केली. हा मोठा विक्रम आहे. आता भारत हे जगातील इलेक्ट्रिक वाहनांचे (ईव्ही) प्रमुख केंद्र बनत आहे. भारताच्या ऑटोमोटिव्ह आणि मोबिलिटी क्षेत्राने या वर्षी जानेवारी-मार्च तिमाहीमध्ये १.५ अब्ज डॉलर्स किमतीचे २९ सौदे नोंदवले. 'ग्रॅण्ट थॉर्नटन इंडिया'च्या अहवालानुसार 'आयपीओ' आणि 'क्यूआयपी' वगळता या क्षेत्राने खंडांमध्ये २७ टक्के वाढ नोंदवली. २०२४ च्या चौथ्या तिमाहीपासून हे मूल्य १९१ टक्क्यांनी वाढले आहे. ते ५०९ दशलक्ष डॉलरवरून १.४ अब्जपर्यंत वाढले आहे. ही वाढ धोरणात्मक आणि आर्थिक गुंतवणुकीद्वारे झाली. त्यात एक अब्ज खाजगी इक्विटी कराराचा समावेश आहे आणि इलेक्ट्रिक वाहने (ईव्ही), ऑटोटेक आणि सेवा (मास)सारख्या उदयोन्मुख क्षेत्रांमध्ये वाढते स्वारस्य पाहायला मिळत आहे.

भारताच्या ऑटोमोटिव्ह आणि मोबिलिटी सेक्टरमध्ये एक मोठे परिवर्तन घडत आहे. त्याद्वारे विद्युतीकरण, डिजिटल इंटिग्रेशन आणि टिकाऊपणावर भर दिला जात आहे. जागतिक व्यापार गतिशीलता आणि पुरवठा साखळीत अडचणी असूनही गुंतवणूकदारांचा आत्मविश्वास मजबूत राहिला आहे. गेल्या तिमाहीमधील 'डील व्हॉल्यूम' आणि मूल्यांमधील मजबूत वाढीवरून ते दिसून येते. भारतीय वाहन उद्योगाने स्पर्धात्मक राहण्यासाठी नवकल्पना, धोरणात्मक भागीदारी आणि मूल्यवर्धित ऑफर, विशेषतः 'ईव्ही', ऑटो घटक आणि पुढच्या पिढीतील 'मोबिलिटी सोल्यूशन्स' यासारख्या क्षेत्रात दुप्पट काम केले पाहिजे. २०२५ च्या पहिल्या तिमाहीमध्ये भारताच्या ऑटोमोटिव्ह आणि मोबिलिटी सेक्टरमध्ये वाढ होत राहिली आणि ३५९ दशलक्ष डॉलर्स किमतीचे ९ सौदे नोंदवले गेले. हे सलग तिसऱ्या तिमाहीमधील वाढ दर्शवते. इटलीतील फोंटाना ग्रुपने राईट टाईट फास्टनर्समध्ये ११५ दशलक्ष डॉलर्समध्ये ६० टक्के भागभांडवल विकत घेतले आहे. भारतातील ऑटोमोटिव्ह आणि मोबिलिटी क्षेत्रातील खाजगी इक्विटी आणि उद्यम भांडवल क्रियाकलापांनी २०२५ च्या पहिल्या तिमाहीमध्ये १.१२ अब्ज डॉलर्सच्या एकूण १९ सौद्यांसह जोरदार वाढ नोंदवली. हे मागील तिमाहीच्या तुलनेत 'डील व्हॅल्यू'मध्ये सहा पट (५०० टक्के) तर 'व्हॉल्यूम'मध्ये ३६ टक्के वाढ दर्शवते.

ऑटोमोबाईल क्षेत्र हा भारताच्या अर्थव्यवस्थेचा एक महत्त्वाचा भाग आहे. देशाच्या जीडीपीमध्ये ते सहा टक्के योगदान देते. याचा अर्थ भारताच्या एकूण कमाईत त्याचा मोठा वाटा आहे. या क्षेत्राचे उत्पन्न २४० अब्ज डॉलर्स म्हणजे अंदाजे २० लाख कोटी रुपये आहे. त्यातून तीन कोटी लोकांना रोजगार मिळतो. ४२ लाख लोक यात थेट काम करतात आणि २.६५ कोटी लोक इतर मार्गांनी, जसे की दुकाने किंवा वाहतुकीशी संबंधित आहेत. वाहनांचे सुटे भाग बनवण्याचे कामही खूप महत्त्वाचे आहे. हा उद्योग जीडीपीच्या २.३ टक्के योगदान देतो. त्यात १५ लाख लोक काम करतात. २०२३-२४ मध्ये सुट्या भागांचे उत्पन्न ६.१४ लाख कोटी रुपये होते. त्यापैकी ५४ टक्के भाग भारतातील वाहन उत्पादक कंपन्यांना देण्यात आले. १८ टक्के भाग परदेशात पाठवले गेले. यावरून भारताचे ऑटोमोबाईल क्षेत्र देशातच नव्हे, तर जगभरात मजबूत होत असल्याचे दिसून येते. यापूर्वी भारतात फार कमी वाहने तयार होत होती. १९९१-९२ मध्ये केवळ वीस लाख मोटारींचे उत्पादन झाले; मात्र १९९१ मध्ये सरकारने नियम बदलले. यापूर्वी कंपन्यांना परवाना घ्यावा लागत होता. आता तो नियम काढून टाकण्यात आला. विदेशी कंपन्यांना शंभर टक्के गुंतवणूक सूट मिळाली. यानंतर सुझुकी, ह्युंदाई आणि होंडासारख्या मोठ्या कंपन्या भारतात आल्या. त्यामुळे वाहनांचे उत्पादन मोठ्या प्रमाणात वाढले. २०२३-२४ मध्ये ते २८ दशलक्षवर पोहोचले आहे.

आता भारतात फक्त पेट्रोल आणि डिझेलची वाहने तयार होत नाहीत. इलेक्ट्रिक वाहनांवरही भर आहे. ऑगस्ट २०२४ पर्यंत ४४ लाखांहून अधिक इलेक्ट्रिक वाहनांची नोंदणी झाली आहे. त्याचा बाजार हिस्सा ६.६ टक्के आहे. यावरून लोक आता नवीन तंत्रज्ञान असलेल्या वाहनांना पसंती देत असल्याचे दिसून येते. भारतीय वाहने आणि त्यांचे पार्ट्स आता जगभर विकले जातात. २०२३-२४ मध्ये भारताने परदेशात ४५ लाख वाहनांची निर्यात केली. सुटे भाग विक्री २१.२ अब्ज रुपयांपर्यंत पोहोचली. हे क्षेत्र दर वर्षी ८.६३ टक्क्यांच्या आसपास वाढत आहे. तज्ज्ञांच्या मते २०२६ पर्यंत ते ३० अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचू शकते. वाहनांचे बहुतेक सुटे भाग युरोप, उत्तर अमेरिका आणि आशियामध्ये विकले जातात. 'पीएम इलेक्ट्रिक ड्राईव्ह'मुळे ईव्ही, ई-ट्रक, ई-बस आणि चार्जिंग स्टेशन्सच्या उभारणीला २०२४ ते २०२६ पर्यंत समर्थन मिळेल. 'पीएम ई-बस सेवा'योजनेंतर्गत २०२४-२९ पर्यंत ३८,००० इलेक्ट्रिक बस चालवण्याची योजना आहे. सरकारने इलेक्ट्रिक वाहनांवरील करही १२ टक्क्यांवरून पाच टक्के केला आहे. नवीन नियमांमुळे घरे आणि कार्यालयांमध्ये चार्जिंग स्टेशन बसवणे बंधनकारक करण्यात आले आहे. यामुळे लोकांसाठी गोष्टी सुलभ होतील. त्यांचा बाजारातील हिस्सा ६.६ टक्के आहे. जगात तो बारा टक्के तर चीनमध्ये ३० टक्के आहे. असे असले, तरी या क्षेत्रापुढे अनेक आव्हाने आहेत. इलेक्ट्रिक वाहनांसाठी बॅटरी आणि सेमीकंडक्टर परदेशातून येतात. यामुळे किंमत वाढते. जगात काही अडचण आली तर पुरवठा बंद होऊ शकतो. लहान शहरे आणि गावांमध्ये चार्जिंग सुविधा कमी आहेत. ऑटोमेशन आणि नवीन तंत्रज्ञानासाठी प्रशिक्षित लोक कमी आहेत.

(लेखक अर्थशास्त्राचे निवृत्त प्राध्यापक आहेत.)

## वेध

**गिरीश शेरेकर**

# उच्चांकी तापमानाने विदर्भ होरपळला!

उन्हाळ्यात तापमानात वाढ होणे अपेक्षितच आहे. पण, ते अपेक्षेपेक्षा जास्त नको इतकीच भावना प्रत्येकाची असते. निसर्गाचे चक्र भावनेवर चालत नाही. बदललेल्या स्थितीचा त्याच्यावर परिणाम होत असल्याने तीनही ऋतू आपले गुणधर्म विसरून बसले आहेत. याला मनुष्य नावाच्या प्राण्याइतका दुसरा कोणताच प्राणी जबाबदार नाही. आता उन्हाळ्यात जी उच्च तापमानाची स्थिती निर्माण झाली आहे, ती त्याचाच एक भाग आहे. त्याचे जे भोग आहे ते मनुष्यासह सर्वच सजीव घटकांना भोगावे लागणार आहेत. विदर्भातले तापमान दरवर्षी आपलेच विक्रम मोडत आहे. उच्चांकी तापमानाने विदर्भ होरपळत आहे. अशीच वाढ होत राहिली तर भविष्यातल्या दिवसांमध्ये काय होईल, याची कल्पना केली तरी अंगावर शहारे येतात.

यंदाचा एप्रिल महिना हा गत १२० वर्षांतील आजवरचे सर्व विक्रम मोडणारा ठरेल, असा अंदाज हवामानशास्त्रज्ञांनी वर्तवला आहे. उन्हाळ्यात पडणारा सरासरी पाऊस न पडल्याने यंदा तापमान दरवर्षी इतकेच असले तरी, एकूण उष्मा (टोटल हिट कंटेंट) प्रचंड वाढला आहे. सर्वत्र उष्णतेची लाट उसळल्याने घरात राहूनही लोकांना उष्णतेच्या विकारांनी ग्रासले आहे. विदर्भ, उर्वरित





महाराष्ट्रासह देशातील सर्वच राज्यांत एप्रिलमध्ये अतितीव्र स्वरूपाची लाट सक्रिय झाली असून, बाहेर पडणे सोडाच, घरातही पंखा आणि कूलर सुरू असला तरी बसवत नाही, इतका तीव्र उन्हाळा आहे, अशी सर्वसामान्यांची प्रतिक्रिया आहे. हवामान शास्त्रज्ञ म्हणतात, यंदा मुंबईसह राज्यात सर्वत्र फेब्रुवारीमध्येच पहिली उष्णतेची लाट जाणवली. आजवर २०२४ एप्रिल सर्वांत उष्ण ठरला होता. मात्र, २०२५ एप्रिल हा विक्रम मोडेल. कारण फेब्रुवारी ते एप्रिल अशा सलग तीन महिन्यांत उष्णतेच्या लाटांचे कालावधी सर्वाधिक ठरले आहेत. यंदा अतिउष्णतेमुळे पाण्याचे बाष्पीभवन वेगाने होत आहे. त्यामुळे कडक उन्ह आणि बाष्प यांच्या संगामातून हिट डिस्कंफर्टचा त्रास लोकांना होत असल्याचे मत हवामान शास्त्रज्ञांनी व्यक्त केले आहे. पूर्वी उन्हाळ्यात फक्त विदर्भ आणि कोकणात हा त्रास होत असे. आता त्यातही वाढ झाली असून, पुणे, नाशिक, छ. संभाजीनगर, सोलापूर, सातारा, सांगली, कोल्हापूर या शहरांतही असा त्रास होत आहे. प्रचंड उकाड्यामुळे कूलर, पंखे लावले तरी थंड न वाटता अस्वस्थ वाटते. अंगाची लाही लाही होते. येत्या काही दशकांत भारतातील ७० टक्क्यांपेक्षा जास्त लोकांना अतिउष्णतेचा परिणाम जाणवू शकतो. एप्रिल ते जून हे सर्वांत उष्ण महिने असतात. परंतु, सप्टेंबरपर्यंतही विजेची मागणी जास्त राहते. याचे कारण म्हणजे 'वेट बल्ब इफेक्ट' अशी शास्त्रज्ञांनी संज्ञा तयार केली आहे. त्याला उष्ण आणि दमट असे वातावरण म्हणतात. त्यामुळे मानवी शरीर थंड होणे कठीण होते तसेच शहरात कॉंक्रिटीकरणामुळे उष्मा बाहेर पडत नाही; तर ग्रामीण भागात काळी जमीन दिवसभर उष्मा शोषून घेते. त्यामुळे शहरांसह ग्रामीण भागही यंदा खूप जास्त तापला आहे.

मागील तीन दिवसांपासून विदर्भातले सर्वच जिल्हे अक्षरशः पेटत आहे. तापमानात कमालीची वाढ झाली असून, सोमवारी चंद्रपूरचे तापमान ४५.६ अंश सेल्सिअसवर पोहोचले. हे तापमान देशात सर्वाधिक असल्याची नोंद झाली. विशेष म्हणजे याच जिल्ह्यातील ब्रह्मपुरी शहरात ४५ अंश सेल्सिअस एवढे तापमान 'वर्ल्ड वेदर' या वेबसाईटने नोंदविले. तापमानाकडे नजर टाकली तर चंद्रपूरच जगात अग्रेसर असल्याचे दिसते. पुढचे दोन दिवस जिल्ह्याला 'येलो अलर्ट' देण्यात आला आहे. देशात चंद्रपूरनंतर ओडिशातील झरसुगुडा येथील तापमान ४५.४ एवढे होते. अमरावती ४४.६, अकोला ४४.१, नागपूर ४३.६, वर्धा ४३.४, यवतमाळ ४३.४, गडचिरोली ४३, वाशीम ४२.५, गोंदिया ४२.१, भंडारा ४१.४, तर बुलढाणा येथे ३९.८ अंश सेल्सिअस एवढ्या तापमानाची नोंद झाली. येणाऱ्या चार ते पाच दिवसांत कमी अधिक असेच तापमान राहण्याची शक्यता आहे. ही सुरुवात आहे. पुढचे किमान दोन महिने उष्णतेच्या लाटांचा असाच सामना करावा लागणार आहे. यातून कायमची सुटका करायची असेल तर अनेक उपाय आहेत. पण, ते शाश्वतपणे केल्याशिवाय आपल्याकडे आता दुसरा पर्याय उरलेला नाही.

९४२०७२१२२५

## धर्म-संस्कृती

# चरैवेती! लोक तर म्हणतच असतात!

**प्रा. दिलीप जोशी**

'लोक काय म्हणतील?' या एका विचाराने अनेक जण आपल्या कार्याचा वेग, आपल्यात असलेली ऊर्जा, आपले कौशल्य, आपली बुद्धी, आपली शक्ती आणि आपल्या पराक्रमाला विनाकारण लगाम घालत असतात. लोकांचे काय हो? त्यांना काहीच करायचे नसते! त्यांना फक्त प्रत्येक बाबीवर अकारण प्रतिक्रिया द्यायची असते. त्यांना तुमच्याशी काहीच घेणे-देणे नसते. फक्त तुमची प्रगती त्यांच्या डोळ्यात खुपते आणि ते प्रतिक्रियाळतात. त्यांच्या आगाऊ प्रतिक्रियेने आपण विचलित होतो. पण अशा दुर्जनांना आपण महत्त्व का द्यायचे ? म्हणू द्यात त्यांना काय म्हणायचे ते. आपण मात्र चालत राहायचे अविचल, अथक, निरंतर आणि परिश्रमाने.

आपलंही कसं असतं पाहा. लोकांनी चांगले म्हटले की आपण आनंदी, लोकांनी वाईट म्हटले की आपण लगेच दुःखी. म्हणजे आपला आनंद आणि दुःख लोकांच्या हातात आहे. माझा आनंद माझ्या हातात असावा. माझ्या आनंदाचा कासरा त्या कुचरांच्या हातात का म्हणून द्यायचा? लोकच ते! ते तर म्हणतच असतात.

भगवान रामचंद्र, भगवान कृष्णचंद्र, छत्रपती शिवराय, छत्रपती शंभुराजे, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, स्वातंत्र्यवीर सावरकरांना त्यांच्या त्यांच्या काळात लोक म्हणतच होते. स्वातंत्र्यवीर सावरकरांना तर आजही असे लायकी नसलेले वाचाळवीर बरळत असतात. पण या सर्व महापुरुषांनी 'लोक काय म्हणतील?' असा विचार न करता कार्यकर्तृत्व सुरूच ठेवले. आज ते अजरामर झालेत आणि त्यांना वाचाळ विरोध करणारे काळाच्या प्रवाहात गडप झालेत. हेच महात्मे आपला आदर्श हवेत.

अगदी आताच्या काळात पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, योगी आदित्यनाथ, ज्येष्ठ नेते शरद पवार, अण्णा हजारे असे असंख्य नेते आहेत; त्यांना लोक म्हणतच असतात. म्हणून ते थांबले असं नाही. कारण त्यांना माहीत आहे की, लोक म्हणतच असतात. बरं! आपल्यासारख्या सामान्य माणसांनाही हाच अनुभव असतो. फरक इतकाच की, आपल्याबाबत वाचाळणारे लोक आपल्या सभोवतालचे असतात. हे सभोवतालचे लोक पचवणे हीच खरी परीक्षा असते. सभोवतालचे लोक तुमच्यासारखे काहीच कार्य करीत नसतात. ते रिकामे असतात. रिकामे असल्याने ते फक्त तुमच्या प्रत्येक गोष्टीला विरोध करीत असतात किंवा विचलित करणाऱ्या प्रतिक्रिया देत राहतात. त्यांचा विरोध सकारात्मक घेतला पाहिजे. 'निंदकाचे घर असावे शेजारी' असे उगीच म्हटले नाही. त्यांचा विरोध तुम्हाला सजग राहण्यासाठी कारणीभूत ठरतो. म्हणून 'लोक काय म्हणतील?' हा विचार मनातच येऊ द्यायचा नाही. विचार आला तरी त्यातून चांगला अर्थ काढायचा. लोक तर म्हणतच असतात. उलट ती योग्य मार्गावर राहण्याची बाब आहे असे समजायचे. मी लहानपणापासून सामाजिक कार्यात आहे. लोकांचे पराकोटीचे चांगले आणि वाईट अनुभव मी अनुभवले आहेत. आनंद आणि दुःखाच्या चाव्या लोकांच्या हातात कधीच द्यायच्या नाहीत, हे मी अनुभवातून शिकलो. बरं, जे लोक तुमच्याशी तोंडावर चांगले वागतात ते पाठमोऱ्या स्थितीत तसेच असतील, याची अजिबात खात्री नाही. उलट तुमच्या तोंडावर स्पष्ट बोलणारे माघारी तुमचे समर्थक असू शकतात, हेही ध्यानात ठेवावे. लोकांचं काय हो! तुम्ही त्यांच्या मनासारखे वागलात की ते तुमचे समर्थक. त्यांच्या मनाविरुद्ध वागलात की लगेच विरोधक. अपवाद वगळले तर सभोवतालची माणसे अशीच असतात बहुधा. त्यामुळे आपल्या अंतःकरणाचा आवाज ऐकायचा आणि कार्य सुरूच ठेवायचे.

अजून एक लक्षात ठेवा, ज्यांच्या भेटण्याने आपली मनस्थितीच खराब होत असेल तर त्यांना का ठेवायचे आपल्या जीवनात? त्यांना हळूच दूर करा, त्यांच्याविषयी कोणताही आकस न ठेवता. ते आपल्या गृहास न यावे, आपण त्यांच्या सदनास न जावे. ते त्यजावे जीवेभावे. जगात अशी खूप चांगली माणसे आहेत की ज्यांच्यासोबत संगतीने आनंद आणि शांती मिळते. काही माणसे तुमच्याशी काहीच संबंध नसताना तुमच्यावर राळ उडवत असतील तर समजा तुमचे आभामंडल विस्तारित झाले आहे. तुमची कीर्ती दिगंताकडे वाटचाल करीत आहे. त्या राळीला उत्तर देऊ नका; उलट आपले आभामंडल विस्तारित झाल्याचा आनंद लुटा. खूपदा लोक बोलतात. कारण त्यांना तुमचा खरंच विरोध असतो असे नाही तर तुमच्या येण्याने ते शून्य होतात म्हणून ते विरोध करतात. असा गोड विरोध पचवता आला पाहिजे.

'लोक काय म्हणतील?' असा वारंवार विचार हे दुर्बल मन:स्थितीचे लक्षण आहे. म्हणू द्यात त्यांना काय म्हणायचे ते. आपण अविचल चालत राहा. 'चार शेंबड्या पोरांना घेऊन काही होत असते का?' असे लोक म्हणत होते म्हणून डॉ. हेडगेवार थांबले नाहीत. उलट त्यांनी अशा कुचराच्या दाण्यांना अनुल्लेखाने मारून जोमात कार्य केले आणि आज जगातील प्रचंड मोठे संघटन राष्ट्रीय स्वयंसेवक संघ उभे आहे. योगगुरू रामदेवबाबांना लोक वाटेल ते बोलले आणि बोलतात, पण म्हणून ते विचलित झाले नाहीत. परिणाम सर्वांसमोर आहे.

लोक नावाचा विशिष्ट समुदाय नसतो. लोक म्हणजे कुणीतरी व्यक्तिगत माणूस असतो. काही माणसे अशी असतात की, अठरा विसा म्हणजे तीनशेपासष्ट दिवस सतत त्यांच्या डोक्यात तुम्हीच असता. 'दळिता कांडिता तुज गाईन अनंता' अशीच स्थिती असते त्यांची. लक्षात ठेवा, प्रत्येक वेळी आपणच बरोबर असतो असेही नाही. आपली चूक असेल आणि त्यावर लोक बोलले तर आपण सुधारणा केलीच पाहिजे. पण काही माणसे तुम्ही काहीही करा, त्यांचा विरोध ठरलेला. उद्या तुम्ही म्हणालात की, 'शौचानंतर हात स्वच्छ धुवावेत' तर हे म्हणतील, 'नाही! आता तर आम्ही चाटणार!' ही त्यांची प्रतीक्षिप्त क्रिया म्हणजे मेंदूच्या आज्ञेशिवाय प्रतिक्रिया. मग अशा लोकांना कुढतकुढत जगू द्या. त्यांना अनुल्लेखाने मारा! तुमच्याबद्दल वाईटसाईट बोलणाऱ्या या लोकांबद्दल समाजातील इतर लोकांचे मत अजिबात चांगले नसते. ते वात्रट आहेत हे सर्वांना माहीत असते, फक्त 'दुर्जनं प्रथमम् वंदे' म्हणून इतर माणसे दुर्लक्ष करतात. इतरेजन तुमच्या कार्याचे प्रशंसकच असतात. त्यामुळे आपण आपल्या आनंदात आपली विधायक कामे करीत राहायची. लोकांचं काय हो? ते तर म्हणतच असतात. चला तर! कामात आहात तर अजून जोमात भिडा! दुर्जनांकडे दुर्लक्ष करा! लोक तर म्हणतच असतात.

सूर्यस्य पश्यश्रेमाणम्, यो न तंद्रयते चरन् ।

त्या सूर्याकडे पाहा तो कसा सतत चालत असतो म्हणजे कार्यरत असतो. त्याच्यावर कोणी थुंकले तर थुंकणाऱ्याचेच श्रीमुख भरते!

९८२२२६२७३५

## विरोधी पक्षात 'दे धक्का'; आत्मपरीक्षणाची गरज

सध्याच्या राजकारणाच्या पृष्ठभूमीवर विरोधी पक्षांमध्ये प्रचंड अस्थिरता आणि अंतर्गत अस्वस्थता जाणवत आहे. निवडणुकीचे वारे वाहू लागले की, अनेकजण 'दे धक्का' पद्धतीने पक्षांतर करत आहेत. विशेषतः निष्ठावंत कार्यकर्ते आणि जुन्या सहकाऱ्यांचाही पक्षावरचा विश्वास डळमळीत झाल्याचे चित्र अनेक राज्यांमध्ये दिसून येतो. विरोधी पक्षांमध्ये विश्वासू नेतृत्व आणि स्पष्टता नसल्यामुळे कार्यकर्त्यांची दिशाभूल होते. अनेकदा निर्णय प्रक्रिया अपारदर्शक असते. त्यामुळे जुने निष्ठावंत नाराज होतात. सत्तेपासून दूर असलेल्या पक्षांमध्ये कार्यकर्त्यांना स्वतःचे राजकीय भविष्य असुरक्षित वाटते. त्यामुळे सत्ताधारी पक्षाकडे वळण्याची प्रवृत्ती वाढते. अनेक जुने कार्यकर्ते वर्षानुवर्षे पक्षासाठी झटलेले असतात, पण त्यांना संधी न देता नवख्या, बाहेरून आलेल्या नेत्यांना प्राधान्य दिले जाते. ही स्थिती निष्ठेचा अवमान वाटू लागते. विरोधी पक्षांमध्ये अनेक ठिकाणी गटबाजी आणि 'मीच मोठा' वृत्तीमुळे पक्षसंघटना ढासळते. अशा वातावरणात निष्ठावंत कार्यकर्ते दडपले जाऊन बाहेर पडतात. विरोधी पक्ष हे लोकशाहीचा महत्त्वाचा घटक असतात. परंतु जर त्यांच्यातील निष्ठावंत हात सोडू लागले, तर हा पक्षाच्या अस्तित्वासाठी आणि व्यापक लोकहितासाठीही चिंतेचा विषय ठरत आहे.


**सागर पिंगळे**/७७५६८३६०९१

## वाचक पत्रे

## लग्न जुळणे एक समस्या

गेल्या काही वर्षांपासून मुलांचे लग्न जुळणे ही मोठी समस्या होऊन बसली आहे. त्यातल्या त्यात भिक्षुकी करणारे आणि शेतकरी मुलांना मुली मिळणे फार कठीण झाले आहे. शहरातील मुलींना गावातील मुलगा चालत नाही. मुलाला भरपूर पगाराची नोकरी मोठ्या शहरात असावी तसेच शेतीवाडी असावी अशा अपेक्षा असतात, पण मुलगा शेतकरी नको. याला काही अपवादही असतील.

आज मुलाची निवड करताना पहिले प्राधान्य त्याच्या पगाराला जाते. पालकांनी आणि मुला-मुलींनी हे लक्षात घेतले पाहिजे की, सर सलामत तो पगडी पचास, या उक्तीप्रमाणे



मुलगा चांगला असेल तर पुढील आयुष्यात प्रगती नक्की करेल, हळूहळू सुखसुविधा येतील. संसार हा दोघांचा असतो. त्यामुळे दोघांनीही स्वकष्टार्जित कमाईने घर उभे करावे. आज थोडे कमी असेल तरी उद्या चांगले दिवस येतील. गावातील मुले आज निराशेकडे झुकताना दिसून येताहेत. वयाची चाळिशी येते तरी लग्न जुळत नाहीत. शेवटी लग्न न करण्याचा निर्णय घेतात. मुलींच्या किंवा काही वेळा मुलांच्या अवास्तव अपेक्षांमुळे त्यांचेही लग्नाचे वय उलटून जाते आहे. योग्य वराची अथवा वधूची वाट बघताना मुला-मुलींची, पालकांची दमछाक होताना दिसते. ही एक सामाजिक समस्या होत चालली आहे. त्यामुळे सारासार विचार करून थोडा है थोडे की जरुरत है हे धोरण ठेवून लग्नास होकार द्यावा.

**स्नेहल प्रकाश खंडागळे**/नागपूर

## मानवाधिकाराचे ठेकेदार कोणत्या बिळात घुसले!

विरोधकांच्या टोकाच्या विरोधानंतरही वक्फ सुधारित कायदा संसदेच्या दोन्ही सभागृहांत बहुमताने पारित झाला आणि मुस्लिमधार्जिण्या पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी हा कायदा बंगालमध्ये लागू करणार नाही असे जाहीर केले. म्हणजे त्या केंद्र सरकारला आव्हान देत आहे. त्यामुळे मुस्लिमांना वाटते ''दीदी अपने साथ है, तो डरने की क्या बात है!'' ममतांच्या मुस्लिमांना अभय देण्यामुळेच बंगालच्या चार जिल्ह्यांत- त्यात मालदा, नादिया, दक्षिण परगणा आणि मुर्शिदाबादमध्ये धार्मिक हिंसाचार उफाळला आणि त्यात हिंदूंना लक्ष्य करण्यात आले मुर्शिदाबाद या मुस्लिमबहुल जिल्ह्यात, तर ५०० हिंदूंनी मालदा येथे एका शाळेत आश्रय घेतला आहे. यावरून तेथल्या हिंसाचाराची धग लक्षात यावी. आता ते मानवाधिकाराचे तथाकथित ठेकेदार कोणत्या बिळात घुसले आहेत? कुठे आहे ती काँग्रेसाध्यक्ष मल्लिकार्जुन खडगेंच्या काँग्रेसची सत्यशोधक समिती? हिंदूंची घरे पेटविली गेली आणि येथील खासदार युसूफ पठाण समाज माध्यमावर तेथील हिंसाचाराच्या संबंधाने 'अच्छी चाय' अशी निर्लज्ज पोस्ट टाकतो. किती निर्ढावलेली आहेत ही 'हिरवी पिलावळ.' कम्युनिस्टाच्या शासन काळापेक्षाही 'रानटी शासन व्यवस्था' असणाऱ्या बंगालमधील तृणमूलच्या अनियंत्रित सत्तेला लोकशाही मार्गाने उखडून फेकण्याची आज नितांत गरज आहे.

**गजेंद्र डोळके**/८०१०६०३७८९

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# अल्पवयीन विद्यार्थिनीवर अत्याचार करणाऱ्या नराधम शिक्षकाला १४ वर्षाची सक्त मजुरीची शिक्षा

**अंबाजोगाई सत्र न्यायालयाचा निकाल**

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२३ एप्रिल**

गुरु शिष्याच्या पवित्र नात्याला काळीमा फासत अल्पवयीन विद्यार्थिनीवर वारंवार अत्याचार करणाऱ्या श्याम दिगंबर वारकड या शिक्षकास अंबाजोगाई सत्र न्यायालयाने १४ वर्ष सश्रम कारावास आणि एकूण एक लाख २००० रुपये दंडाची शिक्षा ठोठावली आहे.




याबाबत अधिक माहिती अशी की,अंबाजोगाई शहरातील खोलेश्वर विद्यालयांमध्ये इयत्ता नववी मध्ये शिक्षण घेणारी अल्पवयीन विद्यार्थिनी क्रीडा स्पर्धेमध्ये भाग घेण्यासाठी क्रीडा शिक्षक श्याम दिगंबर वारकड याच्यासोबत जालना येथे गेली होती.स्पर्धेतून परतत असताना वाहनांमध्ये शिक्षकाने तिच्यासोबत छेडछाड केली. जालन्याहून परत आल्यानंतर अंबाजोगाई येथील क्रीडा संकुल परिसरात वाहनांमध्ये १७ ऑक्टोबर रोजी श्याम वारकड याने तिच्यावर अत्याचार केला. ही घटना कोणालाही सांगू नकोस असे शिक्षकाने विद्यार्थिनीला धमकावले होते. त्यानंतर त्या मुलीवर नराधम शिक्षकाने अनेक वेळा अत्याचार केल्याचेही समोर आले. पीडित मुलगी भयभीत अवस्थेमध्ये होती. तिची अवस्था शाळेमधील एका महिला शिक्षकाच्या लक्षात आल्यानंतर तिने विद्यार्थिनीला विश्वासात घेऊन विचारपूस केली. त्यानंतर या घटनेचे बिंग फुटले. त्या मुलीने अंबाजोगाई शहर पोलीसांमध्ये तक्रार दिल्यानंतर श्याम वारकड याच्यावर अंबाजोगाई पोलीस ठाण्यात पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. डीवायएसपी राहुल धस यांनी या प्रकरणाचा तपास करून न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

या प्रकरणाची सुनावणी जिल्हा व सत्र न्या.खोचे यांच्यासमोर झाली. न्यायालयासमोर एकूण १३ साक्षीदार तपासण्यात आले. त्यापैकी पिडीतेची आणि तिच्या आईची साक्ष अत्यंत महत्त्वाची ठरली. न्यायालयाने दोन्ही बाजूंचे युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने श्याम वारकड यास दोषी ठरवून १४ वर्ष फक्त मजुरी आणि एक लाख २ हजार रुपये दंडाची शिक्षा ठोठावली. या प्रकरणात सरकारी पक्षाच्या वतीने अभियोक्ता लक्ष्मण फड यांनी बाजू मांडली. त्यांना पैरवी म्हणून गोविंद कदम आणि बाबुराव सोडगीर यांनी सहकार्य केले.

**खटल्याकडे होते शहराचे लक्ष**

मराठवाड्यातील विद्येचे माहेरघर असणाऱ्या अंबाजोगाई सारख्या शहरात शिक्षकानेच असे घृणास्पद कृत्य केल्याने संतापाची लाट उसळली होती. अंबाजोगाईकरांनी मोर्चे काढून या घटनेचा निषेध व्यक्त करत आरोपीला कठोरात कठोर शिक्षा देण्याची मागणी केली होती. या खटल्याकडे संपूर्ण अंबाजोगाई तालुक्याचे लक्ष लागले होते.

# पाकधार्जिण्या अतिरेक्यांविरोधात बीड जिल्हा शिवसेना आक्रमक

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२३ एप्रिल**

जम्मू काश्मीर येथील पहलगाम येथे पाकधार्जिण्या अतिरेक्यांनी पर्यटकांवर केलेल्या गोळीबार भ्याड हल्ल्यामुळे असंख्य निष्पाप पर्यटकांचा मृत्यू झाला तसेच या घटनेमुळे देशभरात मोठ्या प्रमाणात दहशतीचे वातावरण निर्माण झाले. पाकधार्जिण्या अतिरेक्यांनी पर्यटकांवर केलेल्या भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ आज दुपारी १२.०० वाजताच्या दरम्यान धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, जिल्हाप्रमुख स्वप्नील गलधर यांच्या नेतृत्वाखाली बीड जिल्हा शिवसेनेच्या वतीने तीव्र निषेध आंदोलन करण्यात आले. दरम्यान संतप्त शिवसैनिकांनी अतिरेक्यांच्या फोटोला जोडे मारत मुडदाबाद मुडदाबाद पाकिस्तान मुडदाबाद अशा घोषणा दिल्या. भारत देश यशाची उंची गाठत असताना वारंवार पाकधार्जिन अतिरेकी दहशत पसरवण्यासाठी असे भ्याड हल्ले करतात. देशातील निष्पाप लोकांचे बळी घेतात. मात्र देशाची सुरक्षा यंत्रणा त्यांना शोधण्यासाठी कामाला लागलेली आहे. एक शिवसैनिक म्हणून माझी इच्छा आहे जिथे पाकधर्जिन अतिरेकी दिसतील तिथेच त्यांना गोळ्या घालव्यात ज्याने करून इथून पुढे कुणी आपल्या देशकडे डोळा वर करून पाहायची हिंम्मत करणार नाही. पाकधर्जिन अतिरेक्यांनी केलेल्या भ्याड हल्ल्याचा बीड जिल्हा शिवसेनेकडून तीव्र जाहीर निषेश व्यक्त करण्यासाठी आम्ही शिवसैनिकांनी रस्त्यावर उतरून हे निषेश आंदोलन केले आहे. अशी प्रतिक्रिया शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी प्रसार माध्यमांना दिली. याप्रसंगी शिवसेना शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, जिल्हाप्रमुख




स्वप्नील गलधर यांच्या समावेत बीड जिल्हा शिवसेना, युवासेना, शेतकरी सेना, ओबीसी सेना, अनुसूचित जाती-जमाती सेना, एसटी कामगारसेना तसेच सर्व अंगीकृत संघटनांचे आजी-माजी पदाधिकारी, लोकप्रतिनिधी शिवसैनिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित उपस्थित होते.


# अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय घनवन

## प्रकल्प संरक्षण भिंत करा अन्यथा आमरण उपोषण करणार

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२३ एप्रिल**

जिल्हाधिकारी कार्यालय अंबाजोगाई या ठिकाणी जवळपास पाच एकर जागेवर घनवन प्रकल्प राबवण्यात आलेला आहे. या प्रकल्पांतर्गत त्या ठिकाणी विविध प्रजातींच्या २०००० झाडांची लागवड करण्यात आलेली असून परिसराला ऑक्सीजन पुरवण्याचे काम हे झाडे करत आहेत. शासकीय कार्यालयामध्ये राबविण्यात आलेला हा एकमेव घनवन प्रकल्प आहे. या झाडांच्या संगोपनासाठी अनेकांनी परिश्रम घेतलेले आहेत. अक्षरशः पोटच्या लेकरासारखं या २०००० झाडांना सांभाळलेल आहे. परंतु मागील वर्षी पाऊस काळामध्ये या अपर जिल्हाधिकारी कार्यालयाची तालुका क्रीडा संकुलाच्या बाजूची संरक्षक भिंत पडल्यामुळे या वीस हजार झाडांचे भवितव्य धोक्यात आलेले आहे.





त्याचबरोबर अपर जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये कर्मचारी वर्ग कमी असल्यामुळे या झाडांची निगा राखण्यासाठी तात्कालीन अपर जिल्हाधिकारी श्रीमती मंजुषा मिसकर यांनी तहसील कार्यालय अंबाजोगाई येथील कोतवालांना वेळापत्रक आखून देऊन त्यानुसार झाडांची काळजी घेण्यासाठी आदेशित केलेले होते. परंतु मागील सहा महिन्यापासून अपर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या घनवन प्रकल्पाची देखभाल घेण्यासाठी कोणीही कोतवाल उपस्थित राहत नसल्याचे निदर्शनास आलेले आहे. एकतर वृक्ष लागवड होत नाही आणि केली तरीही गांभीर्याने त्याचे संगोपन कोणी करत नाही. या अपर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरामध्ये तात्कालीन अपर जिल्हाधिकारी श्रीमती मंजुषा मिसकर यांनी अत्यंत परिश्रमाने वृक्ष लागवड ही केली आणि संगोपनही केले. केवळ प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे या झाडांचे भवितव्य धोक्यात आलेले आहे. यापूर्वी आम्ही सार्वजनिक बांधकाम विभागाला अनेक वेळा विनंत्या केलेल्या आहेत त्याचबरोबर सन्माननीय जिल्हाधिकारी महोदय बीड यांनाही अनेक वेळा विनंत्या केल्या परंतु या गोष्टीकडे कोणीही गांभीर्याने घ्यायला तयार नाही. त्यामुळे नाईलाज असतो वीस हजार झाडांचं भवितव्य अबाधित ठेवण्यासाठी नाईलाजाने आंदोलनाशिवाय आमच्या पुढे आता पर्याय उरलेला नाही. *महाराष्ट्र दिन दि.०१ मे २०२५ पर्यंत या संरक्षक भिंतीच्या संदर्भात सार्वजनिक बांधकाम विभाग तथा तात्काळ निर्णय अन्यथा एक मे २०२५ रोजी मी स्वतः प्रकाश विलासराव बोरगावकर व शशिकांत गायकवाड दोघेही अपर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या घनवन प्रकल्पासमोर आमरण उपोषणासाठी बसत आहोत. त्यानंतर सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची असेल. असे तालमार्तंड प्रकाश बोरगावकर, शशिकांत गायकवाड यांनी कळविले आहे

# माजलगावत इसमाच्या डोक्यात दगड घातला

## शहरात पसरली खुनाची अफवा

## घटनेचे सीसीटीव्ही फुटेज वायरल झाल्याने खळबळ

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२३ एप्रिल**

शहरालगत असलेल्या परभणी चौकातील ट्रॅक्टर शोरुमच्या बाजूला मुख्य रस्त्यावर उत्तम बाबुराव विघ्ने रा. लऊळ क्र.१ हा ऊभा होता.त्याचे कुणाशी तरी भांडण चालू होते. त्या वेळी समोरील इसमाने त्याच्या डोक्यात दगड मारून त्याला जखमी केले. त्याच बरोबर उत्तम विघ्ने हा जखमी अवस्थेत खाली पडून बेशुद्ध झाला. ही वार्ता आणि त्या घटनेच्या सीसीटीव्ही फुटेज सह. काही काळ शहरात आणखीन एक खून झाला म्हणून अफवा पसरली होती. सदरील जखमी इसम या दवाखान्यात हलवल्यानंतर सदरील इसम जिवंत आहे असे समजले.

जखमी उत्तम विघ्ने यास उपचारासाठी शहरातील संजीवनी हॉस्पिटलमध्ये केले असून त्याच्यावर पुढील उपचार चालू आहेत. अद्याप पोलिसात या घटनेची नोंद झाली नाही. तसेच विघ्ने यास जखमी करणाऱ्या इसमाचे नाव ही समोर आले नाही.

उत्तम विघ्ने यास आम्ही उपचार चालू केले असून त्याच्या डोक्याला टाके पडले आहेत. सध्या त्यांचा सिटीस्कॅन करून पाहणार आहोत. सध्या तरी रुग्ण हा स्थिर आहे.
डॉ. ज्ञानेश्वर गिलबिले
संजीवनी रुग्णालय माजलगाव.

आम्ही तत्काळ या घटनेची माहिती घेतली आहे. दवाखान्यात जाऊन डॉक्टरशी पण चर्चा केली आहे.
जखमी इसम सध्या जवाब देण्याचे स्थितीत नाही.
आम्ही तो इसम कोण आहे याची माहिती घेत आहोत.
बालक कोळी
पोलीस निरीक्षक
माजलगाव ग्रामीण पोलीस स्टेशन

# पिंपरवाडा व कोटरबन च्या शेतकऱ्यांना गांजा अफूची शेती केल्याप्रकरणी अतिरिक्त सत्र न्यायालयाने केला जामीन मंजूर

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२३ एप्रिल**

संपुर्ण राज्यात गाजलेल्या धारूर तालुक्यातील पिंपरवाडा शिवारात गांजा अपूची शेती केली त्या शेतात ४ कोटी रू. पेक्षा जास्त रक्कमेचे गांजाची झाडे जप्त करून पो.स्ट.धारूर येथे गुन्हा नोंद झालेल्या आरोपीला अटकपूर्व जामीन मंजुर झाला आहे.

या घटनेबाबत अधिक माहिती अशी की, फिर्यादी विजयसिंह जोनवाल स.पो. नि स्था.गु शाखा बीड यांनी पो. स्टे धारूर येथे तक्रार दिली होती की, आरोपी यांनी शेत गट क. ३३ शिवार मौजा पिंपरवाडा येथे शेतामध्ये गांजा/अफुची शेती केली होती व त्याठिकाणी रेड मारून ५४० किलो ७५९ ग्राम ज्याची किंवा ४, ३२, ६०,७२०/- ( चार कोटी बत्तीस लाख साठ हजार सातशे वीस रू.) होते अशी रेड मारून सर्व गांजा/अफु जप्त केला व आरोपी रामहारी तिडके रा. पिंपरवाडा ता. धारूर व बळीराम उर्फ सुर्यकांत मुडे रा.कोठरबन ता. वडवणी, जि. बीड यांचे विरूध्द तक्रार दिली होती की. सदर तकाराचे अनुषंगाने पो. स्टे. धारूर येथे गु.र.न. ५७/२०२५ कलम ८ बी, १५,१७ क, १८ एन. डी.पी.एस कायदा १९८५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यामध्ये आरोपी

सुर्यकांत वसंत मुंडे यांनी त्यांना सदर गुन्हयात अटक होवु नये म्हणुन त्यांनी केज येथीत अतिरिक्त सत्र न्यायालयात अटक पुर्व जामीन मिळणेकामी अर्ज दाखल केला होता. सदर जामीन आर्जात आरोपीचे वतीने माजलगांव येथील सुप्रसिध्द विधिज्ञ ॲड संजय एस. राठोड यांनी मांडलेली प्रभावी बाजु व युक्तीवाद केला यावरून मा. अतिरिक्त सत्र न्यायाधीश के. डी. जाधव यांनी आरोपी सुर्यकांत मुंडे याला अटकपूर्व जामीन मंजुर केला. आरोपीचे वतीने त्यांनी बाजु ॲड. संजय एस. राठोड यांनी मांडली. त्यांना ॲड. यु.डी मोरे, ॲड राहुल राठोड, ॲड .नितीन राठोड व ॲड दत्तात्रय बंडगर यांनी सहकार्य केले.

# राज्यस्तरीय खुल्या कराटे स्पर्धेत हितांशी मुगदिया ला 'सुवर्ण' तर रिदम मुगदिया हिला 'रौप्य पदक'

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२३ एप्रिल**



डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित केलेल्या राज्यस्तरीय खुल्या कराटे स्पर्धेत माजलगाव येथील 'के.टी.ब्रुसली सेल्फ डिफेन्स कराटे अकॅडमी' च्या विद्यार्थिनी असलेल्या दोघी बहिणी हितांशी रितेश मुगदिया (वय ६ वर्ष) हिने सुवर्ण पदक तर रिदम रितेश मुगदिया (वय १० वर्ष) हिने रौप्य पदक पटकाविले. ही स्पर्धा दि.१८ एप्रिल २०२५, शुक्रवार रोजी गजानन हॉल, हरसूल पोलीस स्टेशन, छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित करण्यात आली होती. या दोघींबरोबर याच अकॅडमीच्या १२ खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत एकूण १२ पदकांची लयलूट केली. अकॅडमीचे सुवर्ण पदक विजेते खेळाडू हितांशी मुगदिया, अन्वी सारडा, रेणू पंडित, संध्या कुटे, जान्हवी होके, आदर्श पवार, हर्षवर्धन जाधवर तर अकॅडमीचे रौप्य पदक विजेते खेळाडू रिदम मुगदिया, आरव सारडा, श्रीपदम भावसार, प्रज्वल उजगरे, नंदनी राठोड हे आहेत. या यशामुळे माजलगावच्या के.टी.ब्रुसली सेल्फ डिफेन्स कराटे अकॅडमीचे नाव उज्वल झाले असून प्रशिक्षकांचे आणि पालकांचे अभिनंदन होत आहे. या यशाबद्दल सर्व विद्यार्थ्यांचे गावभर कौतुक होत आहे.

# व्यायम शिबीर व संस्कार वर्ग चे आयोजन केल्यामुळे देशाचे भविष्य घडविणारे शिबीर-प्रा.बाबासाहेब देशमुख

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२३ एप्रिल**



गेल्या ३५ वर्षापासून श्री हनुमान व्यायम शाळा व वैद्यनाथ बँक यांच्या संयुक्त विद्यमाने व श्री वैद्यनाथ देवळ कमिटीच्या सहकार्याने आयोजित केलेल्या उन्हाळी व्यायम शिबीर व संस्कार वर्ग शिबीराचे आयोजिन केल्यामुळे देशाचे भविष्य घडविणारे शिबीर म्हणे वावगे ठरणार नाही असे प्रतिपादन श्री वैद्यनाथ देवळ कमिटीचे सचिव प्रा.बाबासाहेब देशमुख यांनी केले.

व्यायम शिबीर व संस्कार वर्गाचे आज मान्यवरांच्याहस्ते उद्घाटन हनुमान व्यायम शाळा येथे झाले या प्रसंगी प्रा.बाबासाहेब देशमुख बोलत होते. या प्रसंगी ते म्हणाले की, आजचा विद्यार्थी हा देशाचे भविष्य घडविणार आहे. त्यासाठी तंदुरस्त व संस्कार होणे गरजेचे आहे. त्या दुष्टिकोणातूनच उन्हाळी व्यायम शिबीर व संस्कार वर्गाचे आयोजन केले जात आहे.

या शिबीराचे उद्घाटनाचे अध्यक्षस्थानी वैद्यनाथ बँकेचे संचालक प्राध्यापक महेश्वर निर्मळे, प्रमुख पाहुणे प्रा.डी.जे.वाघमारे, वैद्यनाथ देवळ कमिटीचे विश्वस्थ नागनाथराव देशमुख, रघुवीर देशमुख माजी नगराध्यक्ष बाजीराव भैया धर्माधिकारी माजी नगराध्यक्ष वैजनाथराव जगतकर सामाजिक कार्यकर्ते विलासराव ताटे या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते याप्रसंगी बाजीराव धर्माधिकारी यांनी हनुमान व्यायाम शाळा शिबिरासाठी सहकार्य करण्याचे कबूल केले हनुमान व्यायम शाळेचे प्रमुख मार्गदर्शक दत्ताप्पा ईटके गुरूजी, यांनी बोलताना म्हणाले की योगासन,कुस्ती,मल्लखांब,लाठी काठी,जलतरण,सूर्यनमस्कार, दंड-बैठका यासह एकूण २५ भारतीय व्यायामाचे प्रकार व्यायाम शिबीर आणि संस्कार वर्गात विद्यार्थ्यांना शिकवले जातील.परळीतील एकूण ५० गुरुजन आणि असंख्य स्वयंसेवक संपूर्ण शिबीर कालावधीमध्ये अक्षरशः वाहून घेतात उन्हाळी शिबिर २२ एप्रिल ते २५ मे पर्यंत पहाटे पाच ते आठ सायंकाळी पाच ते आठ असे चालेल ,या वेळी माजी उपनगराध्यक्ष सुरेश टाक, हनुमान व्यायम शाळेचे सचिव सुभाष नाणेकर ज्येष्ठ शिक्षक प्रसारक मंडळाचे सचिव प्रभाकर इटके हनुमान व्यायाम शाळेचे अध्यक्ष वैजनाथ इटके संचालक चंद्रकातअप्पा समशेटे, महादेवअप्पा फडकरी, माजी संचालक देविदास कावरे, नारायणआप्पा गोपनपाळे समर्थ मुख्याध्यापक अमर देशमुख सर नरसिंग देशमुख ज्येष्ठ पत्रकार आनंत भातगळे सर प्रभूआप्पा साखरे , पत्रकार बालाजी ढगे उपस्थितीत होते. या प्रसंगी मान्यवरांचे स्वागत क्रिडा शिक्षक विजय मुंडे, विलास आरगडे सर योग शिक्षक बाळासाहेब कराड, , सूर्यकांत टेकाळे, गडदे सर ॲड सायस मुंडे माजी सरंपच शिवशंकर कराड, मुद्रा लोन बीड जिल्हा समिती सदस्य सुशील हरंगुळे विकास प्रतिष्ठान सहसचिव विकास हालगे, अमोल बुरकुल महात्मा हत्ते गुरुजी, दिंगाबर नागराळे, विक्रम स्वामी, अनिकेत तीळकरी, गोल्ड मेडलिस्ट सोमेंद्र शास्त्री, मुकुंद कुलकर्णी आदित्य नागराळे बाळू भातांगळे शैलेश पांडे आधी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्राध्यापक उमाकांत कुरे तर आभार माजी नगरसेवक महादेव ईटके यांनी केले.

# धम्माचरणातून संस्कारित झालेला समाजच, संविधानसंमत आचरण करून राष्ट्र उभारणी करू शकतो-ॲड.शाम तांगडे

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२३ एप्रिल**




राष्ट्रनिर्माता डॉ बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक आदर्श जयंती उत्सव समिती परळी आयोजित परळीभिमजयंती महोत्सव २०२५ च्या पाचव्या दिवशी बुद्ध-फुले- आंबेडकर चळवळीचे विश्लेषक ड.शाम तांगडे यांचे आंबेडकरवाद्यांची बलस्थानं : संविधान व धम्म या विषयावर आज दि२२ एप्रील रोजी परळीच्या रेल्वे स्टेशन मैदानावर जाहिर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य कमलाकर कांबळे हे उपस्थित होते.

प्रमुख व्याख्याते ॲड शाम [illegible] चळवळ ही स्वाभिमानी आहे, ती सर्वांना शहाणे करण्याचे काम करते. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधान निर्मितीचे काम केले व या संविधानातील तत्वे फ्रेंच क्रांतीतून नाही तर प्राचीन भारतातील बौद्ध धम्मातून घेतली आहेत, असे डॉ आंबेडकरांनी सांगितले. पुढे बोलतांना ॲड तांगडे म्हणाले की, संविधानात समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय यांचा समावेश आहे व धम्मात हीच शिकवण आहे.

धम्माचरण केल्याने मानवी मूल्य आत्मसात होतात व संविधान याच [illegible]यावर आधारित आहे. जो [illegible]ज बौद्ध तत्वज्ञान आत्मसात करतो, तो संविधानसंमत आचरण करतो, म्हणून संविधान व धम्म भारताची बलस्थानं आहेतकार्यकमाचे सूत्रसंचलन प्रा विलास रोडे यांनी केले तर प्रस्तावना प्रा दासू वाघमारे यांनी केले व शेवटी पाहुण्यांचे व उपस्थित जनसमुदायाचेआभार भास्कर( नाना) रोडे यांनी मानले

# ५ जणांची टीम,दररोज १२० लिटर पाणी,२५ किलो खाद्य

## मेरुगिरी मॉर्निंग वॉक ग्रुपचा उपक्रम ठरतोय वन्य प्राणी,पक्षांना जीवदान

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२३ एप्रिल**



शरीर निरोगी ठेवण्यासाठी परळी शहराच्या दक्षिणेकडील डोंगरमाथ्यावर मॉर्निंग वॉक करणारी २५ जणांची टीम वनविभागाच्या झाडीमध्ये असलेल्या हरिण,मोर,तडस,कोल्हे आदी पशुपक्षांसाठी जीवदान ठरत आहे.जवळपास पाण्याची कुठलीच सुविधा नसल्याने मेरुगिरी मॉर्निंग वॉक ग्रुपचे हे सदस्य आपल्या खांद्यावरुन दररोज १२० लिटर पाणी व २५ किलो खाद्य आणत आहेत.पाणी व अन्नामुळे अनेक पक्षी व प्राणी हे आनंदाने बागडत आहेत.

परळीच्या दक्षिणेला असलेल्या मेरुच्या डोंगरमाथ्यावर वनविभागाचे जंगल आहे.या जंगलात हरिण,कोल्हा,तडस,ससे या प्राण्यांसह मोर,चिमण्या आदी पक्षांचा मुक्त वावर असतो.हे जंगल परळी शहरापासून सहा किलोमीटर लांब असुन उन्हाळ्यात या प्राणी,पक्षांना अन्न- पाण्याची सोय नसल्याने हे प्राणी शहराच्या जवळ येत असत.शेजारीच नगरपालिकेचा कचरा डेपो असुन या ठिकाणी असलेल्या मोकाट कुत्र्यांचे शिकार होत असत.परळी शहरातील वेगवेगळ्या भागातुन या डोंगरमाथ्यावर पहाटेची मोकळी हवा घेण्यासाठी व व्यायामासाठी अनेकजण येत असतात.जंगलातील या पक्षी,प्राण्यांची अन्न-पाण्यासाठी असलेली तडफड बघुन २५ जणांनी मेरुगिरी मॉर्निंग वॉक नावाचा ग्रुप बनवत जिथे कोणतेच वाहन जात नाही तिथे हे सर्व जण मिळून घरुन येतेवेळी दररोज १२० लिटर पाणी तसेच घरातील टाकाऊ पदार्थासह गहु,तांदूळ,ज्वारी,टमाटे,काकडी,गाजर असा भाजीपाला आणत आहेत.झाडीमध्ये ठेवलेल्या कुंडामध्ये पाणी व भोवताली चारा टाकल्यानंतर असंख्य पशु-पक्षी या चारा,पाण्यावर जगत आहेत.२५ जणांच्या या टीमचा गत दिड महिन्यांपासून हा नित्यक्रम सुरु असुन तो पशु पक्ष्यांना जीवनदायी ठरत आहे.

**२५ जणांची टीम,५ का.मी.चा प्रवास**

मेरुगिरी मॉर्निंग वॉक चे सदस्य असलेले रमेश कोम्मावार,महावीर महालिंगे,वैजनाथ सोळंके ,नितीन कुलकर्णी,डांगे साहेब,प्रभाकर देशमुख,डॉ.श्रीपाद बुरकुले,सचिन स्वामी,वैजनाथ माने,अनंत देशमुख,साईनाथ शिंदे,विनायक भागवत,वैभव अंबेकर, काशिनाथ देशमुख,प्रकाश ईटके,श्रीराम लांडगे,वेदपाठक,गुजर अप्पा,आदी २५ जण हे घरापासुन निघताना जमेल तसे चारा पाणी हातात घेवून पाच कि.मी.पायी चालत पशु पक्ष्याना भरवत आहेत.

**प्राण्यांचे संरक्षण**

वनविभागाच्या या जंगलालगत तीन वर्षांपूर्वी नगरपालिकेने कचरा डेपो उभारला आहे.या कचर्याभोवती जमलेली मोकाट कुत्री हरिण,मोर,ससे प्राण्यांची शिकार करत आहेत.हा ग्रुप या मोकाट कुत्र्यापासुन प्राणी,पक्षांचे संरक्षण करण्याबरोबरच कुत्र्यांच्या हल्यात जखमी झालेल्या प्राण्यांवर उपचार करुन जीवनदान देत आहेत.

## आनंदाचे डोही

अपर्णा कुळकर्णी / ९४२१२१२४४८

# ‘उन्हाळा... रसाचा सोहळा’



**बाटलीबंद पेय उपलब्ध होण्याच्या आधीपासून आतापर्यंत उन्हाळ्यात सुखद गारवा देत मैत्र निभावणारा हा एक खास साथी आहे. हल्ली तर गल्लोगल्ली ठेल्यावर, हातगाड्यांवर अगदी आपल्या दारात आपल्या आनंदासाठी हा ऊसाचा रस हजर असतो. मला तर वाटतं, अगदी पुरातन काळापासून ऊसाच्या रसाचा गोडवा मानवी शरीर मनाला आल्हाददायी थंडावा देत आहे. त्याची सर कोणालाच नाही.**

उन्हाळा आला की, पहिले आठवतो तो थंडगार ऊसाचा रस ! जिभेवर रेंगाळणारा तो गोडवा आणि मनाला तजेला देणारा प्रसन्न गारवा ! मग मुखातून येणारी वाह...ची दाद तर त्या आनंदाला ‘चार चांद’ लावणारी ठरते. या अमृतमयी पेयाने कितीतरी पिढ्यांना उन्हाळ्यात गोडवा आणि गारवा देऊन ताजेतवाने ठेवले आहे. ‘उन्हाळा...रसाचा सोहळा’ असे सांगून शीतल मधुरानंद देत आला आहे. उन्हाच्या तप्त झळा झेलत प्रवासाला निघाले असताना, उसाच्या रसाच्या चरख्याचा तो घुंगरांचा नाद आपल्या मनाला नकळत साद घालतो. बालगोपालांच्या चेहऱ्यावरील बोलका आनंद थंडाव्याशी हस्तांदोलन करण्यास उत्सुक असतो. ओठांवर त्या फेसांच्या मिशा उमटल्या की, मग ‘ठंडा ठंडा कुल कुल’ची अनुभूती घेतल्यावर एकमेकांना त्या मिशीसाठी चिडविण्याची मौज भारीच असते ना! हळूहळू तनमन त्या गारेगार गोडव्याशी एकरूप होत, शीतल सुखद लहरींवर तरंगू लागतं. भर उन्हाळ्यात आपण या पेयाच्या शीतल छायेत विसावल्याचा आनंद घेत, पुढील प्रवासास नव्या जोमाने निघू शकतो. उन्हाळा सुसह्य होतो याचे श्रेय या ऊसाच्या रसाला द्यायलाच हवे.

बाटलीबंद पेय उपलब्ध होण्याच्या आधीपासून आतापर्यंत उन्हाळ्यात सुखद गारवा देत मैत्र निभावणारा हा एक खास साथी आहे. हल्ली तर गल्लोगल्ली ठेल्यावर, हातगाड्यांवर अगदी आपल्या दारात आपल्या आनंदासाठी हा ऊसाचा रस हजर असतो. मला तर वाटतं, अगदी पुरातन काळापासून ऊसाच्या रसाचा गोडवा मानवी शरीर मनाला आल्हाददायी थंडावा देत आहे. त्याची सर कोणालाच नाही.

फळांच्या राजाचे तारुण्यातले हिरवे घोस रसना तृप्ती आणि शांतीसाठी आवतणच धाडतात. पूर्वी अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर किंवा त्याआधी चैत्रगौरीला नैवेद्य दाखवूनच हे प्रासादिक पेय पिण्यास प्रारंभ केल्या जायचा. अशा या आंबटगोड कैरीच्या पन्ह्याला तर तोडच नाही ! पन्हं एकच तरी त्याचे किती प्रकार गृहिणी आपापल्या वेळेनुसार अन् कौशल्यानुसार करतात. कच्च्या कैरीचे किसून, उकडून, भाजून त्यातील गर काढून, साखर/गूळ घालून, वेलदोडे, सुंठ, केशर, काहीतरी घालून विशेष फ्लेवरचे किंवा साधे थंडगार माठातल्या पाण्यात घालून केलेले असले तरी पन्हे हे मात्र राजस पेय ठरते. उन्हाळ्याची शान वाढवत गारेगार अनुभूतीच्या हिंदोळ्यावर झुलवत राहते. भर दुपारी पेपर सोडवून आलेल्या मुलांच्या हातात थंडगार पन्ह्याचा मायेने ओथंबलेलेला पेला ठेवला की, क्षणात शीण दूर होऊन उत्साहाची कारंजी थुईथुई नाचू लागतात. येणाऱ्या पाहुण्यांची सरबराई करायला पन्हं करून ठेवले की, सुगरणींना तापमानाच्या उच्चांकात स्वयंपाकघरात फार वेळ न घालवता, गारव्याचा आनंद घेता येतो.

या दिवसांत माठात वाळा किंवा हसरा मोगरा घालून प्यायलेले थंडगार पाणी म्हणजे जणू अमृतच ! कालबाह्य झालेले भलेमोठे रांजण मग नकळत नजरेसमोर तरळून जातात. लिंबाचे, कोकमचे सरबत यांनी तर रसना तृप्तीचे पेटंटच घेतले आहे. घरात कोणी पाहुणे मंडळी आली की, त्यांच्यासाठी केल्या जाणाऱ्या पेयाचा आस्वाद घेण्यासाठी बच्चेमंडळी आतुर असायची आणि असतातही. ते ही मग एखादे चवदार पेय स्वतः बनवून पेश करतात. तेव्हा तर त्याची गोडी अवर्णनीय असते.

ताज्या लिंबाचे सरबत उन्हाळ्यात शाही थाट वाटायचा. उन्हाळ्यात लिंबू महाग किंवा मिळायचीच नाहीत म्हणून हिवाळ्यातच खास तजवीज करून ठेवल्या जायची. बाटल्या भरभरून लिंबाचे सरबत, साखर घालून तयार ठेवले जाते. उन्हाळ्यात त्याला एक विशेष स्वाद आलेला असतो आणि तो त्या पेयाची लज्जत वाढवतोच. आता बारमाही उपलब्ध असलेले कोकमचे सरबत, आम्हा वैदर्भियांना पूर्वी विशेष आतिथ्य दर्शवत सुखद अनुभूती देऊन जायचे. साधे गूळपाणी ही आतिथ्यशील गारवा देत, तृष्णा सौख्य बहाल करतं. आरोग्यदायी बेलाचे सरबत अडीअडचणीला धावून येतं आणि पोटोबाला गारवा देऊन कार्यक्षम ठेवते.

कितीतरी फळांचे रस, शेक आता अगदी रसना पूर्तीसाठी रांगा लावून उभे असतात. तरी ताकाइतके शीतल दुसरे काही नाही. ताक, मठ्ठा ही पेय पूर्वापार जेवणावळींची रंगत वाढवत मनभर प्रसन्नता पसरवत, शीतलता प्रदान करतात. ताक शरीराला थंडावा देत असल्याने उन्हाळ्यात दाह कमी करण्यासाठी ते उपयुक्त असते. आयुर्वेदात ताकाला अमृत म्हटले आहे. ‘भूलोकस्य अमृतम् इति प्रसिद्धम् अस्ति तक्रम्’ ताकातसुद्धा चव व गुण वाढविण्यासाठी सुंठ, जिरं, धणे पावडर, सैंधव मीठ, साखर हवे ते आवडीप्रमाणे घालून त्याचा आस्वाद घेता येतो. बर्फयुक्त मठ्ठा तर कोथिंबीर, आलंमिरचीने सजून मोहित करतो. किती वाट्या रिचव्याव्यात आणि मोह कसा आवरावा? हा प्रश्न पडावा अशी जबर मोहिनी या पारंपरिक पेयाची असते.

खास वैदर्भीय अशी अक्षय्य तृतीयेची बहुगुणी चिंचवणी प्यायला मिळणं म्हणजे भाग्यच! सुगरीणीने अतिशय निगुतीने आपले पाककौशल्य पणाला लावून केलेली ही चिंचेची नाना पदार्थांनीयुक्त चिंचवणीच पित रहावी की जेवावं, हे कळतच नाही. पूर्वी शहाळं फक्त उन्हाळ्यात मिळत असत, आतासारखी बारमाही नाही. त्यामुळे, त्याची अपूर्वाई तर विचारायलाच नको. आता नारळ पाणी हे उन्हाळ्यातील सगळ्यांचे आवडते आणि सहज उपलब्ध, भेसळमुक्त पेय आहे.

उष्णतेवर मात करण्याचा एक उत्तम मार्ग म्हणजे थंडगार ताजेतवाने करणारे कोणतेही आरोग्यदायी पेय! उन्हाळ्यात ऊन बाधू नये यासाठीसुद्धा ही अस्सल भारतीय थंडगार पेय उपयुक्त ठरतात. शिवाय, त्यांचे पोषण मूल्यही उत्तम असल्याने रोगप्रतिकारशक्ती वाढवत तजेला प्रदान करतात. पचनास सुलभ आरोग्यदायक ही पेय यकृताचे आरोग्यही उत्तम ठेवण्यास सहाय्यक ठरतात. आज जागतिक यकृत दिवस आहे. त्यामुळे यकृताला उपयुक्त पेय प्राशन करून तनामनाला उल्हासित करू या. इस बात पे मठ्ठा तो बनता हैं बॉस !

## संगीतिका

संगीता तांबोळी/ ९८२२७३९४९३



# काही बोलायाचे आहे...

**प्रेम म्हणजे ईश्वरीय वरदानच जणू ! म्हणूनच मग हे साऱ्यांनाच थोडी लाभतं? नि:शब्दपणे प्रेम करता येणं, ही तर प्रेमाची परिसीमा ! मग हे प्रेम शब्दात मोजून-मापून कसे व्यक्त करणार? देवळात गेल्यावर ,परमेश्वरावर मोजून-मापून, तोलून भक्ती करते का हो कोणी? नाही ना ! मग प्रेम पण असं, मोजून-मापून कसं करणार ? किती उदात्त कल्पना आहे ही! प्रेम हे शब्दातीत असतं. ते शब्दातही व्यक्त करता न येणारं आहे. मग मनातच या भावनेला, कल्पनेला, कल्प कुसुमांचे कोवळे धुमारे फुटतात. रोमांचित होतं अंतरंग, एका नव्या जाणिवेनं! अलवार भावनेने भारावून जातो आपण!**

मंडळी, सगळ्या भावभावनांमध्ये प्रेमभावना ही सगळ्यात उच्च मानली जाते. दोन मनांमध्ये असलेले प्रेम आणि हे प्रेम जेव्हा व्यक्त करायचं असतं, ती मजा-खुमारी वेगळीच असते. पण मंडळी, या प्रेमाची उच्च पातळी केव्हा गाठली जाते, सांगू?

जेव्हा हे सारं सारं सांगताना शब्दांची गरज भासत नाही. नेमक्या अशाच एका गाण्यावर आज बोलू या. ‘काही बोलायाचे आहे पण, बोलणार नाही...’ मनावर गारूड घालणाऱ्या अरुण दाते यांच्या खणखणीत आवाजात ‘आकाशगंगा’ या गीतसंग्रहातील हे सुमधुर गीत ! वर्ष १९९४, कुसुमाग्रजांची सिद्धहस्त लेखणी आणि रचना यशवंत देवांची! हे भावगीत श्रीधर फडके यांच्या आवाजातही प्रचंड गाजले आहे. खूप सुंदर शब्दरचना आहे या गीताची!

**काही बोलायाचे आहे, पण बोलणार नाही...**
**देवळाच्या दारामध्ये, भक्ती तोलणार नाही...**

किती मनस्वी आहे शब्दरचना ! मनातून खूप काही सांगायचे आहे, बोलायचे आहे. पण, हे न सांगायचं ठरवलं जातं कधीकधी ! हे प्रेम म्हणजे ईश्वरीय वरदानच जणू ! म्हणूनच मग हे साऱ्यांनाच थोडी लाभतं? नि:शब्दपणे प्रेम करता येणं, ही तर प्रेमाची परिसीमा !

मग हे प्रेम शब्दात मोजून-मापून कसे व्यक्त करणार? देवळात गेल्यावर ,परमेश्वरावर मोजून-मापून, तोलून भक्ती करते का हो कोणी? नाही ना ! मग प्रेम पण असं, मोजून-मापून कसं करणार ?

किती उदात्त कल्पना आहे ही! प्रेम हे शब्दातीत असतं. ते शब्दातही व्यक्त करता न येणारं आहे. मग मनातच या भावनेला, कल्पनेला, कल्प कुसुमांचे कोवळे धुमारे फुटतात. रोमांचित होतं अंतरंग, एका नव्या जाणिवेनं! अलवार भावनेने भारावून जातो आपण!

ही स्वप्न फुले, मनाच्या सरोवरांमध्ये उमलायला लागतात. पण हे अनुभवायचं फक्त! शब्दांमध्ये ते व्यक्त करता येण्यासारखं नसतंच मुळी!

**‘माझ्या अंतरात गंध, कल्प कुसुमांचा दाटे...**
**पण पाकळी तयाची, कधी फुलणार नाही...’**

कधीकधी हे प्रेम नाकारले जाण्याची अनामिक भीती मनात घर करते. म्हणून मग ही कोमल भावना, मनातच हळूवार जपली जाते. तिचं तेच रूप अंतरंगात घर करतं. या कल्पकुसुमांच्या कळ्या उमलू न देण्याचाच प्रयत्न मनात आणि अंतरंगात होतो. कळी आणि तिचं फूल होण्याचा हा प्रवास यापेक्षा अधिक सुंदर काय असू शकणार मंडळी? हे गुज मनात सांभाळलं जातं, जपलं जातं.

**‘नक्षत्रांच्या गावातले, मला गवसले गुज...**
**परि अक्षरांचा संग, त्याला मिळणार नाही...’**

काय भन्नाट वर्णन ! खरंच हे गुज मनातच कायम जपले जाणार आहे. त्याला अक्षरांची साथ कधी लाभणार नाही. ते कधीच व्यक्तही होणार नाही. मनात भावनांचा हलकल्लोळ उठतो आहे. मनाच्या या अवकाशात हा प्रेमाचा मेघ शांतपणे जणू विसावला आहे.

**‘मेघ जांभळा एकला, राहे नभाच्या कडेला...**
**त्याचे रहस्य कोणाला, कधी कळणार नाही...**

सख्यांनो, पाऊस बरसताना आपण नेहमीच बघत आलोय. पाऊस येतो, मेघांच्या रूपात! कोसळतो! पण, सारेच मेघ रिते होत असतील का? एक नवाच विचार मनात चमकून जातो, नाही का? काही व्यक्त होता न येणारे, बरसू न शकणारे, मनातच सारं सांभाळणारे असे काही जांभळे मेघही अवकाशात राहत असतील ना? अगदीच अशीच अवस्था असते.

दूर सरोवरात एखादे गलबत संथपणे विहार करते. पण ते किनाऱ्यापर्यंत कधी पोहचत नाही. कदाचित किनाऱ्यापर्यंत आल्यावर, त्या गलबताचा हा प्रवास संपला तर? थांबला तर? मग कुठे किनाऱ्यावर पोहचण्यापेक्षा यापेक्षा हा प्रवासच अधिक सुंदर वाटतो त्या गलबताला!

**‘दूर बंदरात उभे, एक गलबत रूपेरी...**
**त्याचा दोष किनाऱ्यास, कधी लाभणार नाही...**

आणि, हे गलबत जर किनाऱ्यापर्यंत आलेच नाही आणि भरकटले त्या सरोवरात तर? तर त्याचा दोष किनाऱ्याला नसतोच मुळी! शब्दातीत आहे हे ! प्रेम आहे पण, व्यक्त न करता, मनात ते अलवार जपत रहायचं. ज्याच्यावर जीव जडला आहे, त्याला कळूही न देता! त्याला कुठलाही दोष न लावता ! उच्चांक आहे हा प्रीतीचा! अर्थात हे सारं घडलं, ते एका नजरेने...काही क्षणांतच! पण, ते तसंच कायम सांभाळलं जाण्याचा आश्वासकपणा जाणवतो आणि तो देखील शब्दात व्यक्त न करता! त्याला कुठलंही मोजमाप न लावता, ते कायम जपण्याचा निर्धार मला यात जाणवला.

**‘तुझ्या कृपाकटाक्षाने, झालो वणव्याचा धनी...**
**त्याच्या निखाऱ्यात कधी, तुला जाळणार नाही...’**

प्रेमाची उदात्त भावना! एक एक शब्द जणू, मनात घर करणारा! भावना फक्त जाणवून देणारा! खरंच शब्दातीत, निस्सीम प्रेम ज्यांना सहज करता येतं आणि मुख्य म्हणजे ते जपता येतं, सांभाळता येतं, ते खरंच एखाद्या ईश्वरीय प्रतिभेचे धनी असतात, नाही का?

## अभिजात अमृत

प्रा. सुनंदा पाटील/ ८४२२०८९६६६

# आर्या मयूरपंतांची !

गेले दोन भाग आपण मराठी भाषेतील आख्यान काव्य समजून घेण्याचा प्रयत्न करतोय. थोडक्यात ‘आख्यान काव्य म्हणजे, देवदेवता, संत किंवा ऐतिहासिक व्यक्ती यांच्या कथा किंवा चारित्र्यावर आधारीत काव्य, जे कथा किंवा गोष्टी स्वरूपात मांडले जाते. मराठी साहित्यात संत साहित्य आणि पंडिती साहित्य-काव्य यामध्ये आख्यान काव्याचा उदय झाला आहे. आख्यान काव्य लोकांना ज्ञान, बोध आणि प्रेरणा देण्याचे काम करते.

आख्यान म्हणजे वर्णन, वृत्तांत सांगणे, सूचित करणे! आख्यान या शब्दाचा वापर संस्कृतमध्ये पौराणिक कथा सांगताना होतो. ‘आख्यायते अनेनेती आख्यानम्’ आख्यात म्हणजे सांगितलेले, प्रसिद्धीस आलेले, बोलबाला झालेले असा अर्थ घेतला जातो. आख्यान काव्यात कवी स्वतः कथा सांगतो. यात पात्रांमधील संवाद कमी असतात आणि कथा एकाच धाग्यात गुंफलेली असते. एखादे पात्र बोलत असेलच तर ते संवाद लांबलचक नसतात. कथा शक्यतो भूतकाळाचा वापर करून सांगितली जाते. मात्र, प्रसंगानुरूप तिथे वर्तमानकाळाचाही वापर केला जातो.

प्राचीन मराठी संत कविता आणि पंडिती काव्य या दोहोंच्या परंपरेत वाढलेला आख्यान हा कथा काव्यप्रकार आहे. देवदेवता, अवतारी महापुरुष, संत अशांची गोष्टीरूप चरित्रे, पौराणिक आणि धार्मिक स्वरूपाच्या किंवा उद्बोधक कथा, स्वतंत्र किंवा काल्पनिक कथा यांना उद्देशूनही आख्यान असा शब्द वापरला जातो. आख्यानाचे मूळ ऋग्वेदातील पुरुवा-उर्वशी संवादासारख्या अतिप्राचीन कथांमध्ये आढळते. संत एकनाथ महाराजांच्या ‘रुक्मिणी स्वयंवर’ या आख्यानाला सोळाव्या शतकात म्हणजे बऱ्याच वर्षांनी विशेष लोकप्रियता आणि चालना मिळाली. नंतरच्या धार्मिक आणि पंडिती रचनांमधून अठराव्या शतकाच्या अखेरपर्यंत ते वाढत आणि विकसित होत गेले. महाराष्ट?ातील कीर्तन संस्थेमुळे, आख्यान काव्यास विशेष लोकप्रियता मिळाली. आधुनिक काळात आख्यान काव्याची जागा खंड काव्याने घेतली आहे, असे जाणवते.

आख्यानासंबंधी एक विशेष माहिती म्हणजे,‘रुक्मिणी स्वयंवर’ हे एकच आख्यान कवी नरेंद्र, संत एकनाथ महाराज आणि पंडित सामराज या तिघांनीही हाताळलेले आहे. पण, प्रत्येकाच्या रचनेचा घाट आणि थाट वेगळा आहे.

महाभारतावर आधारीत रचना मुक्तेश्वर आणि मोरोपंत यांनी केली आहे. रुक्मिणी स्वयंवराबाबत एक वैशिष्ट्य आणखी आढळते. सामराज आणि रघुनाथपंडित, दोघेही पंडित कवी! पण, सामराज यांचे रुक्मिणीस्वयंवर हे महाकाव्याच्या आखणीचे आढळते तर, रघुनाथ पंडितांचे नलदमयंती स्वयंवर म्हणजे सुसूत्र खंड काव्य आहे, असे वाटते.

थोडक्यात म्हणजे काव्य प्रयोजन, काव्याचा अभिप्रेत वाचकवर्ग किंवा रसिकवर्ग, आख्यानाचा घाट आणि घडण, विस्तार आणि व्याप्ती, स्वभावचित्रण, वर्णन शैली आणि शब्दकळा यासारख्या कितीतरी बाबतीत मराठी आख्यान काव्यात बहुजिनसीपणा दिसून येतो.

स्त्रियांमध्ये महदंबा, वेणाबाई आणि पुरुष संतांमध्ये, साधक आणि सत्पुरूष, संस्कृतज्ञ पंडित यांच्यासारख्या वेगवेगळ्या प्रकृतीच्या व प्रकारच्या कवींनी मराठीत आख्यानकाव्ये लिहिली आहेत. कदाचित कथा किंवा आख्यान प्रकृतीनेच विविधाकारक्षम असल्याने मराठी आख्यान काव्य



वैशिष्ट्यपूर्ण झाले असावे.

सामान्यपणे मराठी आख्यान काव्यात जे दोन ठळक प्रवाह दिसून येतात. त्यात, प्राधान्याने धार्मिक स्वरूपाची आख्याने आणि पंडिती स्वरूपाची आख्याने ! सोयीसाठी केलेले हे वर्गिकरण स्वीकारून, मराठी आख्यान काव्याची काही वैशिष्टे सांगता येतील.

धार्मिक स्वरूपाच्या आख्यान काव्यात महदंबेचे धवळे, संत एकनाथ महाराजांचे रुक्मिणी स्वयंवर, श्रीधराची आख्याने वगैरे रचनांचा समावेश होतो. धार्मिक आख्यान कवी एकतर संत तरी असत किंवा विशिष्ट धार्मिक संप्रदायाचे एकनिष्ठ उपासक असत. धार्मिक आख्यानकाव्ये म्हणजे भाविकांनी, भाविकांसाठी, भाविकांची लिहिलेली आख्याने होत. त्यांचे मुख्य उद्दीष्ट कथारुपाने आणि सोप्या भाषेत आध्यत्मिक शिक्षण देणे हेच दिसते.

ही आख्याने कीर्तन परंपरेत आलेली आहेत आणि त्यातील आर्या या काव्य प्रकाराने कीर्तनात महत्वाचे स्थान प्राप्त केले आहे. रसाळ, ओघवती मात्र, संस्कृतप्रचुर भाषा, साधलेले अनुप्रास आणि यमक यामुळे श्रोते कीर्तनात दंग होतात, मंत्रमुग्ध होतात. याचे रचयिता पंडित कवी मोरोपंत! त्यांचे पूर्ण नाव मोरोपंत रामचंद्र पराडकर! मोरोपंतांचा काळ फार जुना आहे. वर्ष १७२९ ते १७९४ असा! पण, यांची भाषा सरळ आणि सुलभ आहे. त्यांना पंडित ही उपाधी मिळाली असून, त्यांचा ‘केकावली’ हा काव्यसंग्रह सर्वाधिक प्रसिद्ध आहे. मोरोपंत हे मुक्तेश्वर, वामन पंडित, रघुनाथ पंडित आणि श्रीधर यांचे समकालीन कवी आहेत.

मोरोपंतांच्या आर्या प्रसिद्ध आहेत. आर्या हे मात्रावृत्त आहे. ज्या कवितेच्या चरणात अक्षरांचे किंवा गणांचे बंधन नसून, केवळ मात्रांचे बंधन असते त्याला मात्रावृत्त किंवा जाती असं म्हणतात. यात अनेक काव्यप्रकार येतात. प्रसंगानुरूप आणि लेखाच्या स्वरूपानुसार ते काव्यप्रकार पुढे येतीलच. मात्र, आर्या हे एक मात्रावृत्त आहे. या वृत्ताचे मूळनाव ‘गीति’ असे होते. परंतु, मोरोपंतांनी ‘आर्याभारत’ हा संपूर्ण ग्रंथ याच वृत्तात रचल्याने पुढे हे वृत्त आर्या याच नावाने ओळखले जाऊ लागले. उदाहरण बघा .

**की मागे गुप्त उभा । अससि प्रेमे उभारूनी बाहे**
**तरि काय बाळकाचे । तू सादर बोल ऐकशी बा** हे

यात चार चरण असतात. प्रत्येक चरणाचे पूर्वार्ध आणि उत्तरार्ध असे दोन भाग पडतात. पहिल्या व तिसऱ्या चरणात १२ मात्रा असून, चौथ्या चरणात १८ मात्रा असतात.

या वृत्ताच्या गेयतेमुळे कीर्तनात जागोजागी कीर्तनकार आर्या वृत्तातील कवितांचा वापर करतात. काही आर्या पुढीलप्रमाणे...

सुसंगती सदा घडो, सुजन वाक्य कानी पडो ॥
कलंक मतिचा झडो, विषय सर्वथा नावडो ॥
सदन्घ्री कमळी दडो, मुरडिता हटाने अडो ॥
वियोग घडता रडो, मन भवच्चरित्री जडो ॥

**किंवा**

न निश्चय कधी ढळो, कुजन विघ्न बाधा ढळो ॥
न चित्त भजनी चळो, मति सदुक्त मार्गी वळो ॥
स्वतत्व हृदया कळो, दुरभिमान सारा गळो ॥
न मन हे मळो, दुरित आत्मबोधे जळो ॥

यातले यमक आणि अनुप्रास ऐकताना आधी मजा वाटायची म्हणून, सारखं सारखं म्हणताना हे सारं पाठ झालं. पुढे पाठराखण करणारं झालं.
‘कर्णार्जुनयुद्ध’ यातील एक आर्या बघा. ही आर्या मी दहावीला असताना अभ्यासिलेली आहे.
तो शर गरधर रविधर पविधर स्मरारी सायकसा ॥
पार्थ भुजांतरी शिरला वल्मिका माजी नाग
नायकसा॥

ही आर्या ऐकली की, हुंदका यायचा. आता अर्जुन काय करेल? असा प्रश्न पडायचा आणि आमचे सुस्कारे ऐकताच कीर्तनकार गजर करायचे, ‘देवकीनंदन श्रीकृष्ण भगवानकी जय!’ जरा मन हलकं व्हायचं. त्या संस्कारक्षम वयात नवरसांची ओळख झाली.

अशा प्रकारच्या आर्या, श्लोक आणि दिंडी यांनी परिपूर्ण असलेले किर्तनातील आख्यान ऐकताना खूप छान वाटायचं ! त्यामुळे आमचं पाठांतर झालं, गोष्टी कळल्या. स्वर, ताल, लयीचं भान आलं आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे उत्तम ऐकण्याचे संस्कार झाले. आजही कीर्तन ऐकताना देहभान हरपतं. उगाचच संस्कारवर्ग किंवा आवश्यक नसणाऱ्या छंदवर्गात मुलांना पाठवण्यापेक्षा दुपारच्या वेळी घरीच टी.व्ही.च्या माध्यमातून मुलांना हे संस्कार आपण देऊ शकतो.

**तुझे आहे तुजपाशी । परी जागा भुललासी ॥**

असं काहीसं आपलं झालेलं आहे. किर्तनात अध्येमध्ये ‘रामारामा रघुत्तमा रामा’ किंवा ‘पंढरीनाथ महाराजकी जय’ म्हणून जयघोष व्हायचा. हे जयघोष आयुष्याचे घोषवाक्य कधी बनले कळलंच नाही. आज इथेच थांबते. पुन्हा भेटूच!

# माता भाग कौर !

शुभांगी गान/८६५७४२४०७१

**महान सिंग रतौलाच्या नेतृत्वात ४० शिखांनी गुरुगोविंद सिंह यांना सोडण्याचा निर्णय घेतला आणि गुरूंनीही त्यांच्याकडून ‘हम आपके सीख नही हैं’ या संदेशावर स्वाक्षरी घेतली. चाळीस शिखांनी गुरुगोविंद सिंह यांची प्रतिकूल परिस्थितीत साथ सोडली, हे ऐकून माई भागो अत्यंत दुःखी झाल्या आणि त्यांनी उघड टीका केली. त्यांच्या बोलण्याने या चाळीस शिखांना स्वतः केलेल्या विश्वासघाताची लाज वाटली. माई भागोने त्या सर्वांना पुन्हा एकदा एकत्र करून, त्यांना माफी मागण्यास सांगितलं व ती सर्वांना एकत्र करून गुरुगोविंद सिंह यांना शोधण्यास निघाली.**



आपल्या देशाचा इतिहास बघितला तर एक गोष्ट लक्षात येते की, पराक्रमी पुरुषांबरोबर स्त्रिया ही तेवढ्याच कर्तृत्ववान होत्या. आपल्या पराक्रमाने, शौर्याने आणि धाडसी वृत्तीचा दाखला देत त्यांनी आपापली राज्यं कुशलतेने सांभाळलीच पण, त्याचबरोबर रणभूमीवर अद्भुत पराक्रमही गाजवला होता. कधी तर ती एक सामान्य स्त्री ही होती पण, तिने गाजवलेलं कर्तृत्व इतिहासाच्या पानावर अंकित झालं होतं. अशाच एका वीर कन्येची ही कहाणी!

माई भागो अर्थात माता भाग कौर एक असाधारण शीख वीरांगना! पण, त्याच वेळेस शिखधर्मात ती ‘योद्धा संत’ म्हणूनही ही पूजनीय आहे. पंजाबमधील तरणतारण जिल्ह्यातील झबल कलान येथे एका धार्मिक शिख कुटुंबात तिचा जन्म झाला. वडील मालो शाह हे गुरुगोविंद सिंह यांच्या सैन्यात होते. पित्याचा शौर्य ती बघत होती आणि आपण ही शस्त्र-अस्त्र कला यात निपुण असावं. या ध्येयाने ती पछाडली होती. गुरू गोविंद सिंहांचं आदर्श तिच्यासमोर होतं. ती पित्याबरोबर लहानपणीच आनंदपूर येथे जाऊन त्यांना भेटली होती आणि ही भेट तिच्या आयुष्यात एक वेगळी क्रांती घेऊन आलेली होती. सव्वा सहा फूट उंच असणाऱ्या या युवतीने शस्त्रकला आणि युद्धनिती शिकून पराक्रमाचा ध्वज हाती घेतला.

तिचा विवाह शूरवीर भाई निधान सिंह यांच्याशी झाला. भाऊ दिलबाग सिंह व भागसिंह हे तिघेही पराक्रमी होते. स्वातंत्र्यासाठी लढा देणं त्या प्रत्येकाच्या रक्तात होतं. संपूर्ण देश यावेळी मुस्लिम राज्यकर्त्यांच्या हाती होता. औरंगजेबाची एकानंतर एक प्रदेश घेण्याची लालसा प्रत्येक प्रांत अनुभवत होता. वर्ष १७०४ औरंगजेबाचा सरदार वजीर खान मोठी मुघल सेना, लाहोर आणि काश्मीरच्या मुघल सेनेसह आनंद साहिबकडे चालून आला. आनंद साहिब हे शिखांच्या धर्मगुरूंचे स्थान आणि डोंगरावर वसलेला किल्ला! गुरुगोविंद सिंहांनी खालसा पंथाची स्थापना करून, आपलं सशस्त्र सैन्य तयार केलं. त्यांनी आजूबाजूच्या हिंदू राजांना एकत्रित केलं. त्यांची ही वाढती ताकद बघून औरंगजेबाने बैसाखीच्या उत्सवावर बंदी घातली कारण एकच, शिखांचं वाढतं प्राबल्य! मुघल साम्राज्यातील डोंगराळ भागातील जमीनदार राजे यांना खटकत होतं. औरंगजेबाने त्यांच्या उत्सवावर बंदी घातली पण, तरीसुद्धा शीख प्रचंड संख्येने एकत्र आले आणि ही बाब युद्धाला आमंत्रण देऊन गेली. वर्ष १७०४ च्या युद्धात सय्यद खान आणि रमजान खान दोघे सरदार भयंकर जखमी झाले. त्यांची जागा वजीर खान आणि जबरदस्त खान यांनी घेतली आनंदपूरची घेराबंदी करण्यात आली आणि त्यांना अन्नधान्य पुरवठा होणार नाही, याची तजवीज झाली. त्याच वेळेस आनंदपूर साहिब रिकामा करण्याचा आदेशही देण्यात आला. जो कोणी गुरुगोविंद सिंहांचा शीख नाही, असं जाहीर करेल त्याला स्पर्श केला जाणार नाही, अशी घोषणाही केली. अन्यथा मृत्यूला सामोरे जावं लागेल, ही धमकीही देण्यात आली.

आणि, महान सिंग रतौलाच्या नेतृत्वात ४० शिखांनी गुरुगोविंद सिंह यांना सोडण्याचा निर्णय घेतला आणि गुरूंनीही त्यांच्याकडून ‘हम आपके सीख नही हैं’ या संदेशावर स्वाक्षरी घेतली. चाळीस शिखांनी गुरुगोविंद सिंह यांची प्रतिकूल परिस्थितीत साथ सोडली, हे ऐकून माई भागो अत्यंत दुःखी झाल्या आणि त्यांनी उघड टीका केली. त्यांच्या बोलण्याने या चाळीस शिखांना स्वतः केलेल्या विश्वासघाताची लाज वाटली. माई भागोने त्या सर्वांना पुन्हा एकदा एकत्र करून, त्यांना माफी मागण्यास सांगितलं व ती सर्वांना एकत्र करून गुरुगोविंद सिंह यांना शोधण्यास निघाली.

याच दरम्यान औरंगजेबाने गुरूंकडे एक संदेश रवाना केला. ‘जर किल्ल्यातून तुम्ही बाहेर पडाल तर एक सन्माननीय शांतता करार प्रस्थापित करण्यात येईल.’ यावर अनेक सरदारांच्या स्वाक्षरीचं पत्र होतं. पण, गुरू गोविंद सिंह जाणून होते की, ही फक्त भुलावण आहे. पण, तरीही मुघलांचा खरा चेहरा दाखवण्यासाठी त्यांनी किल्ला सोडला. किल्ला सोडताना गुरूंची दोन मुलं आईसोबत व दोन मुलं त्यांच्यासोबत रवाना झाली. गुरुगोविंद सिंह यांची सेना औरंगजेबाच्या शाही सेनेचा पाठलाग करीत माळवा क्षेत्राच्या जंगलात दिवसरात्र भटकत होती. खिद्राना गावातील तलावाजवळ, जो मुघलांच्या ताब्यात होता, तिथे पोहोचल्यानंतर माई भागो यांनी आपल्या साथीदारांसमवेत ठरवलेल्या नीतीनुसार दहा हजार मुघल सेनेवर अचानक आक्रमण केलं. केवळ ४० लोकांनी मुघल सेनेला पलायन करण्यास भाग पाडलं. त्याचवेळी उंच डोंगरावरून गुरुगोविंद सिंह यांच्या सैन्यांनी बाणांचा वर्षाव केला. या युद्धात सगळे चाळीस शिख मारले गेले. माई भागोंची दोन्ही मुलं आणि पतीला विरमरण आलं आणि माई भागो गंभीररित्या घायाळ झाली. पण शिख विजयी झाले. गुरुगोविंद सिंग यांनी तिचा हा पराक्रम बघितला आणि तिला आपला अंगरक्षक म्हणून त्यांनी तिचा सन्मान केला.

एक प्रचंड मोठा भाला, खांद्यावर बंदूक, अंगावर चिलखत आणि पुरुषवेश धारण करणारी माई भागो गुरुगोविंद सिंग च्या मृत्यूनंतर कर्नाटकातील जन वाडा येथे स्थायिक झाली. तिथे गुरूपदेश सर्वांपर्यंत पोहोचवण्याचं अतिशय महत्त्वाचं कार्य तिने केलं. पराक्रम आणि उपदेशक या रूपातलं तिचं कार्य श्रेष्ठ असंच होतं, म्हणूनच तिला योद्धा संत असं म्हणतात. माई भागोंची शस्त्रास्त्रं आजही नांदेडच्या गुरुद्वारा परिसरात जतन करून ठेवली आहेत.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com




नांदेड - कश्मीर मधील पर्यटकांवर दहशतवाद्यांनी केलेल्या भ्याड हल्ल्याचा शिवसेना (उबाठा) च्या वतीने निषेध करत पाकीस्तानी ध्वजाचे दहन करध्यात आले.

# परिवर्तन पॅनलचा वचननामा ठरतोय सभासदांचे आकर्षण

## आरोग्य पतसंस्था निवडणूकीत

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि.२३ एप्रिल-**

नांदेड जिल्हा परिषद आरोग्य कर्मचारी पतसंस्था निवडणूकीचा प्रचार जवळ जवळ अंतिम टप्प्यात आला असल्याने या वेळच्या निवडणुकीत चांगलीच चुरस निर्माण झालेली दिसून येत आहे. परिवर्तन पँनलने अतिशय शिस्तबद्ध ,सभसदांच्या हितासाठी पतसंस्थेच्या कारभारात दहा बदल घडविण्याची हमी देणारा वचननामा हिताचा जाहीर केल्याने तो आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला आहे. तर दुसरीकडे ३४ वर्षे सत्ता उपभोगणाऱ्यांना सभासदाच्या हितासाठी काय करतोय हेच सांगता येत नसल्याने ही परिवर्तन पँनलसाठी खूप मोठी जमेची बाजू ठरत आहे.

नांदेड जिल्हा परिषद आरोग्य कर्मचारी पतसंस्थेची निवडणूक यंदा अटीतटीची व चुरशीची होत आहे. काल जे सत्ताधारी मागच्या ३४ वर्षांपासून सत्तेत आहेत त्यांना सभासदाच्या हिताचा निर्णयच घेता आला नाही. केवळ विविध कामाच्या नावाखाली जमा रक्कमेचा घोळ घातला असल्याने पतसंस्थेच्या सभासदा मध्ये नाराजीचा सूर वाढतांना दिसून येत आहे . त्यामुळे यंदा परिवर्तन पँनल निवडणुकीच्या मैदानात उतरले आहे.त्यामुळे रणधुमाळी ने चांगला च वेग घेतला आहे या निवडणुकीत सहभागी दोन पॅनलपैकी परिवर्तनपॅनलने नव्यानेच आपला वचन नामा प्रकाशित केला. पतसंस्थेचा कारभार ऑँन लाईन व डिजिटल करून पारदर्शक करणे, इमारत निधीची कपात बंद करणे, विम्याच्या नावाने कपात केलेली रक्कम विमा उतरवण्यासाठी वापर करून सभासदांना विम्याचे बाँड सभासदांना देण्याचे वचन परिवर्तन पॅनलने दिलं आहे. सभसदांच्या हितासाठी पतसंस्थेच्या कारभारात दहा बदल घडविण्याची हमी देणारा परिवर्तनचा वचननामा आहे.

परिवर्तन पँनलने प्रचारात आघाडी घेण्याबरोबरच सभासदाच्या हिताचा जाहीरनामा प्रसिद्ध केला असताना दुसरीकडे सत्ताधारी पॅनलने तर आपला जाहीरनामाच प्रसिद्ध केला नाही. सत्ताधारी पॅनलने फक्त आपल्या उमेदवारांची नावे व निशानी असलेले बॅनर व भिंतीपत्रक प्रसिद्ध केले. त्यामुळे सत्ताधारी पॅनलचा जाहिरनामा कोराच असल्याची चर्चा सभासदांमध्ये दिसून येत आहे. चौतीस वर्षे पतसंस्थेच्या सत्तेवर असलेल्या सत्ताधारी पॅनलला सभासदांना देण्यासाठी कोणतेही आश्वासन शिल्लक दिसून येत नाही. सत्ताधारी पॅनलने नविन आश्वासन दिल्यास चौतीस वर्षांपासून सत्तेवर राहुन आपण काय केले हा प्रश्न सभासदांकडून विचारला जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. पतसंस्थेचा मतदार परिवर्तन पॅनलने दिलेल्या वचननाम्यावर विश्वास ठेवतो कि सत्ताधाऱ्यांच्या कोऱ्या जाहिरनाम्यावर विश्वास ठेवतो हे पाहणं औत्सुक्याचे ठरेल.

## संक्षिप्त वृत्त



### जम्मू काश्मीर येथे झालेल्या भ्याड हाल्लूयात मृत्युमुखी पडलेल्यांना श्रद्धांजली अर्पण

**नवीन नांदेड-** जम्मू-काश्मीर मधील पहलगाम येथे झालेला अतिरेक्यांच्या भ्याड हल्ला हा अत्यंत निंदनीय आणि वेदनादायी आहे या भ्याड हल्लूयात अनेक निष्पाप पर्यटकांना आपला जीव गमवावा लागला. दुर्दैवी मृत पर्यटकांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली आणि हाल्लूयेखोरांचा निषेध सिडको करांच्या वतीने व्यक्त करण्यात आला. हाडको येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्या समोर दिनांक २३ एप्रिल रोजी सिडको हाडकोतील सामाजिक, राजकीय , माध्यम प्रतिनिधी व नागरीक यांच्या वतीने जम्मू काश्मीर मधील पहलगाम येथे झालेल्या पर्यटकांवर भ्याड दहशदवादी हल्ला झाला.या अमानवी कृत्यात जवळपास २७ पेक्षा जास्त निष्पाप पर्यटक नागरिकांनी आपला जीव गमावला.हा दहशदवादी हल्ला अतिशय निंदनीय तसेच हृदय पिळवटून टाकणारा आहे. या हल्लूयात दुर्दैवाने मृत्युमुखी पडलेल्यांना भावपुर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली.व सदरील भ्याड हल्ला करणाऱ्या हल्लेखोरांचा निषेध करण्यात आला.यावेळी भाजपाचे मंडळाध्यक्ष सचिन रावका, संजय पाटील घोगरे, धीरज स्वामी, विनोद कांचनगिरे, वैजनाथ देशमुख, डॉ. नरेश रायवार, डॉ. अशोक कलंत्री, चंचलसिंघ जट, राजू लांडगे, भि. ना. गायकवाड, विठ्ठल गायकवाड, मोनू जोशी, गौतम पवार, सम्राट आढाव, प्रदीप हानवते, गौतम डुमणे, भुजंग पाटील, राजन जोजारे, व्हॉईस ऑफ मीडिया पत्रकार संघाचे संभाजी सोनकांबळे, सूर्यकुमार यांन्नावार , शिवाजी राजुरकर, दिगंबर शिंदे यांच्यासह सिडको हडको येथील सामाजिक, राजकीय व पत्रकार बांधवतसेच नागरीक यांच्या वतीने हल्लूयातील जखमींची प्रकृती लवकरात लवकर स्थिर व्हावी अशी प्रार्थना करण्यात आली.आणि मानवतेवर हा क्रूर हल्ला करणाऱ्या दहशतवाद्यांचा निषेध व्यक्त करण्यात आला.यावेळी ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक ओमकांत चिंचोळकर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस बंदोबस्त तैनात केला होता.

### इस्लापूर येथे जम्मू- काश्मीरमधील पहलगाम येथील आतंकवादी हल्लूयाचा निषेध

**इस्लापूर** -काश्मीर येथील पहलगाम येथे पर्यटकांवर झालेल्या भ्याड हल्लूयाच्या निषेधार्थ व मृत पर्यटकांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी भाजपा महायुतीच्या पदाधिकाऱ्यांनी इस्लापूर शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे एकत्र येत निषेध व्यक्त केला व श्रद्धांजली अर्पण केली व पोलीस स्टेशन इस्लापूर येथे निवेदन देत जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे हिंदू धर्मीय पर्यटकावर गोळ्या झाडून अमानुषपणे हत्या करणाऱ्या आतंकवाद्यांना योग्य तो धडा शिकवा अशी मागणी किनवट दक्षिण विभागाचे तालुकाध्यक्ष सूर्यकांत आरंडकर, जिल्हा सचिव काशिनाथ शिंदे, कपिल करेवाड, राजेंद्र घोगरे, रमेश बोड्डेवाड, युवा मोर्चा जिल्हा महामंत्री विकास माहूरकर, सूर्यकांत बोधनकर, सुरज लासीनकर, शेख लतीफ, रवी कसबे, बालाजी काळे, शिवाजी माने, शिव शंकर मेळेगावकर यांच्यासह भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी, कार्यकर्ते,नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्री क्षेत्र बारुळ येथे लाखोंच्या जनसमुदायांच्या साक्षीने सर्वधर्मिय सामुहीक विवाह सोहळा

**तभा वृतसेवा**
**कंधार, दि.२२ एप्रिल-**

तालुक्यातील प्रसिध्द आसणारे संत श्री नामदेव महाराज मठ संस्थान श्री क्षेत्र बारुळ चे मठाधीपती महंत नामदेव महाराज यांच्यावतीने अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता रक्तदान शिबिरात १५० रक्तदात्यांनी रक्तदान केले व २५ जोडप्यांच्या सर्व धर्मीय सामूहिक विवाह सोहळ्याने थाटामाटात लाखोंच्या जनसमुदायांच्या साक्षीने संपन्न झाला

अध्यात्मिक कार्या सोबतच गोरगरीब सर्वधर्मिय जनतेंची जानीव ठेवत सामाजीक कार्यात सतत आग्रेसर आसणारे श्री संत नामदेव महाराज मठ संस्थान श्री क्षेत्र बारुळ चे मठाधीपती महंत नामदेव महाराज यांच्या वतीने दरवर्षी अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता काल्याच्या कीर्तनासह सर्वधर्मिय सामुहीक विवाह सोहळ्याने होते . हि परंपरा गेल्या तेरा वर्षापासून अखंड



पणे चालु आहे . दिनांक २२ एप्रिल रोजी बारूळ येथे या काल्याच्या किर्तनाच्या दिवशी १५० रक्तदात्यांनी रक्तदान केले व २५ सर्वधर्मीय जोडप्यांचा विवाह सोहळा येथील अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता झाली या सामूहिक विवाह सोहळ्याला माजी खासदार व आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर , तेंलगणाचे माजी खासदार डी. बी पाटील , माजी जिल्हा परिषद सदस्य विजय पाटील धोंडगे, बालाजी बंडे, दिलीप दादा धोंडगे, माजी नगराध्यक्ष मुखेड बाबू सावकार देबडवार, सतीश पाटील उमरेकर, संतोष पांडागळे,प्रा. मनोहर धोंडे, बालाजी पाटील खतगावकर, बालाजी जाधव,मारोती पंढरे,सौ. सविता करेवाड , सुरेश सावकार इटकापल्ले, परमेश्वर पाटील जाधव , विनोद पाटिल तोरणे , पंडीतराव देवकांबळे ,मनोहर पाटील चिखलीकर, यांच्यासह विविध संघटनेचे अधिकारी तसेच संत महंत उपस्थित होते.

गेल्या १३ वर्षापासून सतत होणाऱ्या या सामूहिक विवाह सोहळ्याचे गोरगरिबाचे आर्थिक नुकसान टळत आहे या विवाह सोहळ्याच्या जोडप्यांचा मोफत सोहळा सोबतच वधू-वरांना संस्थान कडून मनी मंगळसूत्र जोडवे कपडे या सोबतच ११ हजार रुपये येण्या जाण्यासाठी किंवा त्यांच्या कुटुंब यांना भेट देण्यात आले यावेळी आमदार चिखलीकर , माजी जिल्हा परिषद सदस्य धोंडगे, सामाजिक कार्यकर्ते मनोहर पाटील चिखलीकर यांच्याकडून उपस्थित जोडप्यांना घरगुती उपयोगी भेटवस्तू देण्यात आले.

**१हजार हुनही अधिक विवाह सोहळा लावण्यात आले**

संत नामदेव महाराज मठ संस्थान च्या वतीने मागील तेरा वर्षे पासून धार्मिक कार्यासोबतच सामाजिक कार्याचा वसा चालू आहे जवळपास १००० जोडप्यांचा सामूहिक विवाह सोहळा लावण्यात आला अखंड हरिनाम सप्ताहाचा काल्याच्या कीर्तनाच्या दिवशी घेण्यात येतो याच दिवशीही आजपर्यंत यासोबतच जवळपास ५०० रक्तदात्यांनी रक्तदान केले यंदा पंचवीस जोडप्यांचा विवाह सोहळा व १५० रक्तदात्यांनी रक्तदान केले या सोबतच संस्थांच्या वतीने समाज उपयोगी मोफत नेत्र तपासणी व शस्त्रक्रिया गुणवंत विद्यार्थ्यांना सत्कार व मदत गोमातेचे रक्षण गोरगरीब मोफत जेवण संस्थान मध्ये लहान मुलावर अध्यात्मिक अभ्यास असे विविध उपक्रम आज पर्यंत घेण्यात आले व घेत आहोत

# किनवट येथे काश्मीरमधील पर्यटकांवरील हल्लूयाचा निषेध

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि.२३ एप्रिल-**

पहलगाम, जम्मू-काश्मीर येथे पर्यटकांवर झालेल्या दहशतवादी हल्लूयाचा तीव्र निषेध करण्यासाठी व मृत पर्यटकांना श्रद्धांजली वाहण्यासाठी भारतीय जनता पक्ष महायुतीच्या वतीने किनवट शहरातील जिजामाता चौकात एकत्र येत निषेध आंदोलन व श्रद्धांजली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमात जोरदार घोषणाबाजी करत दहशतवादाचा निषेध करण्यात आला. उपस्थित सर्व कार्यकर्त्यांनी मेणबत्त्या प्रज्वलित करत मूक श्रद्धांजली वाहिली. काश्मीरमधील निष्पाप पर्यटकांवर झालेल्या अमानुष हल्लूयाने देशभरात संतापाची लाट पसरली असून, किनवट मधील नागरिकांनीही आपला संताप व्यक्त करत एकतेचा संदेश दिला.

या वेळी भाजपा किनवट मंडल अध्यक्ष स्वागत आयनेनीवार, उत्तर मंडल अध्यक्ष उमाकांत क-हाळे, माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार, भाजपाचे जिल्हा सरचिटणीस संदीप केंद्रे, माजी उपनगराध्यक्ष अजय चाडावार, राष्ट्रवादी काँग्रेसचे करपुडे पाटील, रा.कॉ. तालुका अध्यक्ष संजय सिडाम, युवा मोर्चा तालुका अध्यक्ष आशुतोष बेंद्रे, माजी शहराध्यक्ष संतोष चनमनवार, सुनिल मच्छेवार, तसेच विश्वास कोल्हारीकर, रमेश बड्डीवार, शिवा क्यातमवार, शिवा आंधळे, बालाजी धोत्रे, नरसिंग तक्कलवार, सुमित इटकेपेल्लीवार, निकेतन सुरोषे, कृष्णा पाटील, राहुल दारगुलवार, चेतन क-हाळे, पवन गोरी, सुरेश साकपेल्लीवार, जय वर्मा, शैलेश गटलेवार, सतिश बिराजदार, प्रमोद पोहरकर, सुनिल चव्हाण, अक्षय पेंशनवार, निसार भाटी निखिल तिरमनवार, पत्रकार मधुकर अन्नेलवार आदींची उपस्थिती होती.

देशाच्या सुरक्षेसाठी नागरिकांनी एकत्र राहून राष्ट्रविरोधी घटकांचा सामना करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे समारोप शोकसभा व 'भारत माता की जय' च्या घोषणांनी झाला.

## नगरपरिषद, भोकर जि. नांदेड.

## निविदा सूचना

भोकर नगरपरिषद भोकर खालील नमूद केलेल्या कामांसाठी सन २०२५-२६ करीता वापीक दर करार करण्यासाठी दिनांक ३०.०४.२०२५ रोजी दुपारी ५.०० वाजे पावेतो रोख अनामत रकमेसह सिलबंद निविदा मागवत आहे.

| अ. क्र. | कामाचा तपशील | निविदा प्रपत्रची किंमत | निविदा सोबत भरावयाची अनामत रक्कम | काम करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | **भांडार विभाग** | | | |
| १ | सांस्कृतीक व धार्मिक कार्यक्रमासाठी विछायत साहीत्य, शामीयाने, लाऊंडस्पिकर इत्यादी भाडे तत्वावर पुरविणे साठी निविदा मागविणे. | १००० | २००० | दि. ३१.०३.२०२६ व पुढील निविदा प्रक्रिया होईल पर्यंत |
| २ | कार्यालयीन विविध नमुने छपाई करणेसाठी निविदा मागविणे. | १००० | २००० | दि. ३१.०३.२०२६ व पुढील निविदा प्रक्रिया होईल पर्यंत |
| ३ | कार्यालयीन स्टेशनरी पुरविणेसाठी निविदा मागविणे. | १००० | २००० | दि. ३१.०३.२०२६ व पुढील निविदा प्रक्रिया होईल पर्यंत |
| ४ | कार्यालयीन अभिलेख भंडार विभागात जमा करण्यासाठी कापड पुरवठा करणेसाठी निविदा मागविणे. | १००० | २००० | दि. ३१.०३.२०२६ व पुढील निविदा प्रक्रिया होईल पर्यंत |
| ५ | भोकर नगरपरिषद चतुर्थ श्रेणी कर्मचा-यांच्या गणवेशासाठी कापड पुरविणे. | १००० | २००० | दि. ३१.०३.२०२६ व पुढील निविदा प्रक्रिया होईल पर्यंत |
| ६ | भगरपरिषदेने निर्देशित केलेल्या ठिकाणाची रंगरगोटी करणेसाठी निविदा मागविणे | १००० | २००० | दि. ३१.०३.२०२६ व पुढील निविदा प्रक्रिया होईल पर्यंत |
| २ | **बांधकाम विभाग** | | | |
| १ | ४००००/- चे आतील रस्ते, नाल्या, पुल, पाईप लाईन इ. बांधकाम दुरुस्ती | १००० | २००० | दि. ३१.०३.२०२६ व पुढील निविदा प्रक्रिया होईल पर्यंत |
| २ | भोकर नगरपरिषदेसाठी मुरुम, रेती, गट्टी, चुरी आवश्यकतेनुसार पुरवठा करणे | १००० | २००० | दि. ३१.०३.२०२६ व पुढील निविदा प्रक्रिया होईल पर्यंत |
| ३ | फोटोग्राफी व किडीओ शुटींग करणे, शोसल मिडीया, मैसेजिंग व तत्सम तयार करणे व प्रसिध्द करणं | १००० | २००० | दि. ३१.०३.२०२६ व पुढील निविदा प्रक्रिया होईल पर्यंत |
| ३ | **कार्यालयीन कामासाठी** | | | |
| १ | कार्यालयीन कामासाठी बॅनर तत्सम साहित्य छपाई करून पुरवठा करणे. | १००० | २००० | दि. ३१.०३.२०२६ व पुढील निविदा प्रक्रिया होईल पर्यंत |
| २ | कार्यालयीन अभिलेखांचे आवश्यकतेनुसार xerox करून मिळणे बाबत | १००० | २००० | दि. ३१.०३.२०२६ व पुढील निविदा प्रक्रिया होईल पर्यंत |

**सूचना/अटी**

१. कोरी निविदा प्रपत्रे दिनांक २४.०४.२०२५ ते ३०.०४.२०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत रं. खापाल यांचेकडून रोख किंमत भरल्यानंतर मिळतील.
२. सिलबंद निविदा दोन लिफाफा पध्दतीने दिनांक ३०.०४.२०२५ रोजी दुपारी २.०० वाजेपावेतो रोख अनामत रकमेसह रोखपाल न.प. भोकर यांच्याकडे स्विकारल्या जातील.
३. लिफाफा नं. १ मध्ये आयकर विक्रीकर प्रमाणपत्र, रजिस्ट्रेशन, अधिकृत विक्रेता पुरवठादार असल्याचे प्रमाणपत्र, अनुभवासंबंधील कागदपत्रे इ. कागदपत्रे सादर करावे लागतील तसेच लिफाफा नं. २ मध्ये मुख्य वित्तीय बोलीची निविदा सादर करावी लागेल.
४. प्राप्त निविदा शक्यतो दिनांक ०२.०५. २०२५ रोजी सायं. ४.०० वाजता उपस्थित निविदा धारकासभक्ष उघडण्यात येतील.
५. निविदा मंजूर झाल्यानंतर स्टैपपेपरवर करारनामा करून द्यावा लागेल.
६. कोणतीही अटिबध्द निविदा/ई-निविदा स्विकारली जाणार नाही.
७. कोणतीही किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न दाखवता नामंजूर करण्याचे अधिकार नगरपरिषदेने राखून ठेवलेले आहेत.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद, भोकर**

# नभाणेगाव तांडा येथे 'गोर धाटीने' विवाह सोहळा

## बंजारा समाजाची संस्कृती पुनर्जीवित करण्यासाठी सरसावले समाज बांधव

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि.२३ एप्रिल-**

लग्नात होणारा खर्च पाहता जणू काही एकप्रकारची खर्च करण्याची स्पर्धाच लागली कि काय ? असा प्रश्न निर्माण होतो. हल्ली ज्या पद्धतीने लग्न होत आहे त्यात लाखो रुपयांचे कपडे, अहिराचे भांडे, जुन्या परंपरेतील डफडा सोडून नवं तरुणाई सोबत पुरुषांबरोबर महिलाही या डीजेच्या तालावर बेधुंद फटाकेच्या अतिशबाजीकरत नाचताना दिसतात. परिणामी समाज बांधव हा दिवसेंदिवस कर्ज बाजारी होत आहे आणि अशा स्पर्धात्मक युगात बंजारा समाजातील इतर समाजासाठी आदर्श निर्माण करणारी जुन्या परंपरा या आपोआप लोप पावत आहे. त्यामुळे समाजात आदर्श निर्माण करणारी आणि परंपरेनुसार, बंजारा पूर्वजांनी पूर्वी केलेल्या पद्धतीने कमी खर्चात विवाह पार पाडण्याचे



गोरसेना या सामाजिक संघटनेने समाज बांधवाना आवाहन केले आहे.

भारत देशातील १५ कोटी बंजारा समाज आपल्या आगळ्यावेगळ्या परंपरेनुसार विविध राज्यामध्ये विखुरलेला आहे, भारताच्या संपूर्ण राज्यामध्ये या समाजाला आपल्या बोलीभाषा आपल्या पोशाख, चालीरीती खान पान वेशभूषा, एक दैवत मानणारा असा हा निसर्ग पूजक म्हणून ओळखला जातो. सदगुरु सेवालाल महाराज, माता मरियामाच्या आशीर्वादाने स्व. वसंतराव नाईक साहेबाच्या कर्तृत्वाने आणि नायक काशीनाथ यांच्या विचाराने प्रेरित समाज म्हणून ओळखला जातो. समाजाची खरी पद्धत विसरून लुप्त झालेली लग्न पद्धत पुन्हा समाजात रुजावी या करिता सुशिक्षित नवदामपत्य सुनील राठोड रा.पळसवाडी तांडा व जयश्री जाधव रा. भाणेगाव तांडा यांनी गोर शिकवाडीचे जनक नायक काशीनाथ यांच्या विचारांची प्रेरणा घेऊन व प्रा. संदेश चव्हाण यांची गोर धाटी बद्दल तळमळ बघून हदगाव तालुक्यातील भाणेगाव तांडा येथे 'गोर धाटीने ' विवाह पार पाडून एक नवा आदर्श गोर बंजारा समाजातील नवपिढीसाठी दिला. या सोहळ्यास प्रा. यशवंत पवार, विया दळ प्रमुख, अतुल नायक गोर सेना जि. अध्यक्ष ,प्रदीप जाधव गोर सेना जिल्हा उपाध्यक्ष, संदेश जाधव, अमोल आडे,लहू जाधव ,गणेश राठोड यांची उपस्थिती होती तर हा सोहळा पार पाडण्यासाठी अजय चव्हाण ता. संयोजक,रवी चव्हाण गोर सेना ता. अध्यक्ष , गोर सेना भाणेगाव तांडा व गावकरी मंडळी यांनी मेहनत घेतली.

# पश्चिम बंगालमधील हिंदूवरील हल्ले, पहलगाममधील नरसंहाराचा निषेध

## श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानच्या धारकऱ्यांकडून निवेदन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २३ एप्रिल**

पश्चिम बंगालमधील मुर्शिदाबाद येथील हिंदू लोकांची घरे जाळून, तेथील हिंदू महिलांवर अत्याचार करणाऱ्या तसेच हिंदुची हत्या करणाऱ्या आणि हिंदूना विस्थापीत करणाऱ्या कट्टरपंथीयांचा तसेच जम्मू कश्मीरमधील पहलगाम येथील हिंदू पर्यटकांचा नरसंहार करणाऱ्या आतंकवाद्यांचा श्री शिवप्रतिष्ठानच्यावतीने जाहीर निषेध करण्यात आला यावेळी शिवप्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकारी यांना निवेदन सादर केले.

पश्चिम बंगालमधील मुर्शिदाबाद येथे वक्फ कायद्याच्या विरोधात काही कट्टरवाद्यांनी तेथील हिंदू लोकांना लक्ष्य केले आहे. हिंदू लोकांच्या घरावर हल्ले करीत, घरे जाळून टाकण्यात आली. तसेच हिंदू महिलांवर अत्याचार करण्याच्या धमक्या दिल्या. ही घटना होत असतांना तेथील मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी हिंदू कुटुंबांना साधी भेटही दिली नाही किंवा त्यांचे सात्वन करण्यास गेल्या नाही. तेथील पोलिसही हिंदूच्या मदतीला धावून आले नाही. त्यामुळे या हल्ल्याला ममता बॅनर्जीच जबाबदार असून त्यांच्या काळात हिंदूचे पलायन होत आहे. हिंदूंना त्यांची घरे सोडून जावे लागले आहे. त्यामुळे ममता बॅनर्जी यांचे सरकार बरखास्त करून पश्चिम बंगालमध्ये राष्ट्रपती राजवट लागू करावी तसेच हिंदुंना सुरक्षा देण्यासाठी सरकारने पावले उचलावीत अशी मागणी करण्यात निवेदनात करण्यात आली आहे. तसेच जम्मू कश्मीरमध्ये पहलगाम येथे पर्यटनासाठी गेलेल्या पर्यटकांना आतंकवाद्यांनी बंधक बनवून त्यांना त्यांचा धर्म विचारून हिंदू पर्यटकांना त्यांच्या कुटुंबियांसमोर गोळ्या घालून हत्या केली. या घटनेत जवळपास २८ जणांचा मृत्यु झाला आहे. या घटनेमुळे देशातील सर्व हिंदू समाजात आक्रोश निर्माण झाला असून हिंदुस्थानातच हिंदू सुरक्षित नसल्याची भावना निर्माण होत आहे. या दोन्ही घटनेचा श्री शिवप्रतिष्ठानच्यावतीने जाहीर निषेध करण्यात आला. तसेच देशातील तमाम हिंदूची सुरक्षा सरकारने निश्चित करावी आणि हिंदूना संरक्षण देण्यासाठी कठोर पावले उचलावीत अन्यथा शिवप्रतिष्ठान रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करेल असा इशारा निवेदनात देण्यात आला आहे. निवेदनावर जिल्हाध्यक्ष विजय शिंदे, राम हराळ, संजय पडघन, निखील शिंदे, निलेश चव्हाण, विश्वनाथ बिरगड, बालाजी पोले, दशरथ पवार, सुनील काळे, भोला चव्हाण, पवन कसबे, पांडुरंग पोले यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# वसमत येथील हळद संशोधन केंद्राचे काम प्रगतीपथावर

## मंत्री आ. हेमंत पाटील यांनी केली पाहणी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २३ एप्रिल**

मा.बाळासाहेब ठाकरे हरिद्रा (हळद ) संशोधन व प्रशिक्षण केंद्र हे हिंगोली जिल्ह्याच्या विकासातील एक दिशा दर्शक प्रकल्प असून यामुळे हळद पिकाच्या नव्या सुवर्ण क्रांतीला सुरवात झाली असे मत हळद संशोधन केंद्राचे अध्यक्ष कॅबिनेट मंत्री हेमंत पाटील यांनी व्यक्त करून हळद संशोधन केंद्राच्या प्रक्षेत्रावर सध्या प्रगती पथावर असलेल्या ईमारत बांधकामाची पाहणी केली व कामाबाबत अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना केल्या.

हळद संशोधन केंद्रामुळे मराठवाड्यासह विदर्भाला सुद्धा याचा लाभ होणार आहे. केंद्राच्या प्रक्षेत्रावर देशातील जास्त कुरकुमीन असणाऱ्या हळदीच्या नवनवीन प्रजातींची लागवड करण्यात येत आहे. टिश्यू कल्चरच्या माध्यमातून बेणे तयार करण्यात येऊन त्याची विक्री शेतकऱ्यांना करण्यात येत आहे. सध्या या ठिकाणी ईमारत बांधकामास सुरवात झाली आहे हे बांधकाम प्रगती पथावर आहे या बांधकामाची पाहणी हळद संशोधन केंद्राचे अध्यक्ष तथा कॅबिनेट मंत्री आ. हेमंत पाटील यांनी केली.यावेळी त्यांनी कामाबाबत अधिकाऱ्यांना सूचना केल्या. मागील ३ वर्षांपासून हळद संशोधन केंद्र जनजगृती करत आहे. शेतकऱ्यांना अधिकची माहिती व्हावी यासाठी शेतकरी मेळावे, कृषी कार्यशाळा, कृषी प्रदर्शन आयोजित करण्यात येत आहेत त्यातून शेतकरी, हळद उत्पादक यांना माहिती दिली जाते. यापूर्वी राज्य शासनाने संशोधन केंद्रासाठी १०० कोटीचा निधी दिला आहे. त्यानंतर पुन्हा ८०० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. हळद पिकांमध्ये नवनवीन तंत्रज्ञान वापरून त्याचा वापर हळद पिकाच्या उत्पन्न वाढीसाठी कसा करता येईल याकरिता विविध कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या होत्या सध्या प्रचलित झालेल्या ख तंत्रज्ञानाचा वापर सुद्धा यामध्ये करता येईल याबाबत संशोधन सुरू आहे. भाभा अनुसंधान केंद्राचे आय रेडिएशन केंद्र हा याच प्रकल्पाचा भाग आहे. नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करून हळदीचे उत्पन्न वाढवून हळदीला भविष्यात जागतिक बाजारपेठ मिळेल यात दुमत नसल्याचे नामदार हेमंत पाटील म्हणाले.

# जिल्हाधिकाऱ्यांची औद्योगिक वसाहतीला भेट, व्यापाऱ्यांशी चर्चा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २३ एप्रिल**

येथील औद्योगिक वसाहतीला जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी भेट दिली तसेच तेथील भूखंडाची पाहणी केली. यावेळी व्यापाऱ्यांनी जिल्हाधिकारी गुप्ता यांच्यासमोर त्यांच्या समस्या सांगितल्या. या समस्यांचे लवकरच निराकरण करण्यात येईल असे आश्वासत गुप्ता यांनी व्यापाऱ्यांना दिले आहे. हिंगोली येथील लिंबाळा भागातील औद्योगिक वसाहतीमध्ये रस्ते, वीज तसेच पाणी पुरवठ्याची समस्या आहे. या ठिकाणी असलेल्या समस्यांकडे औद्योगिक विकास महामंडळाचे दुर्लक्ष होत असल्यामुळे या ठिकाणी नव्याने उद्योगच सुरू झाले नाहीत. त्यामुळे वसाहतीतील भूखंड उद्योग उभारणी विना पडून आहेत. त्याचा रोजगारावर परिणाम होत असून उद्योग नसल्याने रोजगार निर्मिती होणेही कठीण झाले आहे. जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी औद्योगिक वसाहतीला भेट देत वसाहतीमधील उद्योगांची माहीती घेतली. यावेळी उद्योजक संघटनेचे अध्यक्ष ज्ञानेश्वर मामडे, उपाध्यक्ष नंदकिशोर तोष्णीवाल, जनकराज खुराणा, सुनील देवडा, कुशल मुंदडा, शशीकांत दोडल, नितीन राठोड, भारत चिकटे, ओमप्रकाश हेडा, अंकीत सोनी, जितेन ठक्कर, विकास कऱ्हाळे आदींची उपस्थिती होती. याठिकाणी पोलिस चौकी उभारण्याची मागणीही व्यापाऱ्यांनी केली.



**हिंगोली– भगवान परशुराम जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त अहिल्यानगर शहरातून दरवर्षी भार्गव दर्शन यात्रा हिंगोलीत दाखल होते. यात्रत भगवान परशुराम यांच्या पादुका आणि मूर्ती असलेल्या रथ येथील शिवाजी नगरात श्री दत्त मंदिरात आगमन झाल्यानंतर सकल ब्राम्हण समाजाच्यावतीने पूजन, आरती तसेच महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. यावेळी सकल ब्राम्हण समाज उपस्थित होता. छाया– सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### जागतिक पुस्तक दिन साजरा

हिंगोली– व्यसनमुक्तीचा प्रचार आणि प्रसार करणाऱ्या नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य, महाराष्ट्र सर्वोदय मंडळ, गंगाप्रसादजी अग्रवाल सर्वोदय कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २३ एप्रिल बुधवारी जागतिक पुस्तक दिन पार पडला. वसमत शहरातील सुप्रसिद्ध गंगाप्रसादजी अग्रवाल सर्वोदय कार्यालयात सामाजिक कार्यकर्त्यांच्या वतीने जागतिक पुस्तक दिन पार पडला. सामाजिक कार्यकर्ते विशाल अग्रवाल, नशाबंदी मंडळाच्या जिल्हाध्यक्षा शुभदा सरोदे, समाजसेविका गायत्री बिरादार यांची उपस्थिती होती. व्यसनमुक्तीच्या प्रचार-प्रसारार्थ नशाबंदी मंडळाचे वैचारिक प्रबोधन करणाऱ्या मासिकाचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. नशाबंदी मंडळाच्या व्यसनमुक्ती दूत मृण्मयी अग्रवाल यांनी व्यसनमुक्तीसाठी 'कल्याण यात्रा-व्यसनमुक्तीच्या गाथा' हे पुस्तक मासिक असून वाचनीय असल्याचे सांगितले. 'कल्याण यात्रा-व्यसनमुक्तीच्या गाथा' या मासिक पुस्तकाचे वाचन करण्यात आले. व्यसनमुक्ती पुस्तकांचे वाचन करून व्यसनमुक्त जीवन जगण्याचे आवाहन सामाजिक कार्यकर्ते विशाल अग्रवाल, नशाबंदी मंडळाच्या जिल्हाध्यक्षा शुभदा सरोदे, गायत्री बिरादार यांनी केले आहे.

### सामुहीक उपनयन संस्कार सोहळ्याचे आयोजन

हिंगोली– सामुहिक उपनयन संस्कार समिती ब्राह्मण सभा हिंगोली यांच्या वतीने सलग तिसर्या वर्षी १ जूनला सामुहिक उपनयन संस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. समितीच्या वतीने या सोहळ्यात बटूंच्या निमंत्रित नातेवाईसाठी नाष्टा, शाही भोजन, अष्टवर्ग भोजन, मातृ भोजनाची व्यवस्था बटूंच्या मिरवणुकीसाठी रथ, बँड, फटाके, मंगल कार्यालयाची व्यवस्था, उपनयन संस्कार सोहळ्यासाठी सर्व पुजेचे साहित्य व पौराहित्य, बटूंच्या माता-पित्यांना समितीच्या वतीने आहेर करण्यात येणार आहे. या सोहळ्यानिमित्त समितीच्या वतीने जय्यत तयारी करण्यात येत असून इच्छुकांनी संजय घवाड ८८८८२५५९७७, शैलेश नांदेडकर ९८८१००९७९९, कुमार भालेराव ९४२३१४२३९४, प्रद्युम्न गिरीकर ९८५० २९३९२२, प्रणव पांडे ७०२०६०३३९९ , गणेश पहिणकर ९४२१०८२१०७, गजानन जकाते ९९२१४६३००३, संदीप कावडे ७७७५९७९४९४, विनायक लोहगावकर ९०१११६१०९०, श्याम शेवाळकर ९८२२६००९० यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

### अडचणीत असलेल्या प्रवाशांसाठी संपर्क क्रमांक

हिंगोली– हिंगोली जिल्हा प्रशासनाने जम्मू काश्मीर येथील घटनाक्रमानंतर पर्यटनाला गेलेल्या किंवा या घटनाक्रमाची संबंधित असणाऱ्या नागरिकांनी जिल्हा प्रशासनाशी संपर्क साधण्याचे आवाहन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी केले आहे. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागामार्फत या संदर्भात हेल्पलाईन नंबर जारी करण्यात आले आहेत. जम्मू काश्मीरमध्ये पर्यटनाला गेलेल्या नागरिकांसंदर्भात अडचण असेल, संपर्क होत नसेल, तर ९४०५४०८९३९ या हेल्पलाईन नंबरवर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी केले आहे. जिल्ह्याचे आपत्ती व्यवस्थापन कार्यालय मदतीसाठी सज्ज असून जम्मू-काश्मीरमध्ये थेट संपर्कासाठी काही नंबर प्रशासनाने दिले आहेत. यामध्ये जम्मू काश्मीर प्रशासनाने जारी केलेल्या ०१९४-२४८३६५१, ०१९४-२४५७५४३ तसेच व्हॉट्सअप क्रमांक ७७८०८०५१४४, ७७८०९३८३९७ क्रमांकाचा समावेश आहे.

# आयोध्या येथे श्रीराम लल्लाचे दर्शन घेवून आलेल्या भाविकांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २३ एप्रिल**

मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजनेअंतर्गत शनिवारी दिं.१९ रोजी ८०० भावीक विशेष रेल्वेने अयोध्या येथे रवाना झाले होते व आज दिं.२३ रोजी प्रभू श्रीराम यांचें दर्शन घेऊन रेल्वे स्थानकावर परत आले असता प्रादेशिक उपायुक्त अविनाश देवसटवार व सहाय्यक आयुक्त यादवराव गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली भावीकांचा सत्कार करण्यात आला.

त्याच बरोबर कार्यालयीन अधीक्षक श्री.आत्माराम वागतकर, यांनी सर्व भावीक भक्तांचे एक कुटुंब प्रमुख म्हणून उत्कृष्टरित्या काळजी घेतली म्हणून त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी सामाजिक कार्यकर्ते मिलिंद उबाळे, विशाल इंगोले व निरज देशमुख यांनी भाविकांचा पुष्पहार घालून सत्कार केला.

यावेळी सामाजिक न्याय विभागाचे नागनाथ नकाते, सखाराम चव्हाण, राजु ससाणे, सोनटक्के, नितीन खरात, आरोग्य विभाग पथकातील श्रीमती आशा क्षिरसागर, मिनाक्षी बांगर, ढोणे, खंदारे, बाळु नागरे, विनोद कांगने, मोतीराम फड, संतोष व्होडवे, पत्रकार विलास जोशी, आकाश सोनटक्के, नितीन राठोड, मारोती इंगळे, श्रीमती घुगे, व्होडगीर, फड यांचा ही सत्कार करण्यात आला

# मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत मुदतवाढ देण्याची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २३ एप्रिल**

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत जिल्ह्यातील विविध आस्थापनेमधील तसेच प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये कार्य प्रशिक्षण घेत असलेल्या प्रशिक्षणार्थींना मुदतवाढ देण्यात यावी अशी मागणी निवेदनाद्वारे संघटनेच्यावतीने जिल्हाधिकारी यांचेकडे करण्यात आली आहे.

कौशल्य रोजगार उद्योजकता नाविन्यता विभागाच्या दि १० मार्च २०२५ च्या शासन निर्णयानुसार मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत हिंगोली जिल्ह्यातील विविध आस्थापनेतील कार्यप्रशिक्षण घेत असलेल्या प्रशिक्षणार्थींना पाच महिन्याची मुदतवाढ दिली आहे. परंतु प्रशिक्षणाचा कालावधी हा ११ महिन्याचा आहे. त्याअनुषंगाने मुदतवाढ देण्यात यावी अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. निवेदनावर सुनील राठोड, ज्ञानेश्वर गावंडे, वैभव फुंदसे, अनिल खिल्लारे, अंकुश बगाटे, ओमकार मिरटकर, राजु आव्हाड, अभिमान शिरडकर, रणवीर कांबळे, शुभम खंदारे, राजरतन पंडीत, अक्षय करेवार आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी घेतला विविध योजनांचा आढावा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २३ एप्रिल**

महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेतून घेण्यात येणारी अपूर्ण कामे वेळेत पूर्ण करावीत, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी आढावा बैठकीत दिले.

जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात आज महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना, विविध आवास योजना, जलशक्ती अभियान, जलजीवन मिशन, स्वच्छ भारत मिशन, जलयुक्त शिवार, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना, गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार योजनेची आढावा बैठक जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश, अपर जिल्हाधिकारी अनिल माचेवाड, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक नामदेव केंद्रे, पंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी केशव गड्डापोल, पाणी पुरवठा विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी संजय कुलकर्णी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राजेंद्र कदम, विभागीय वन अधिकारी राजेंद्र नाळे, पुष्पा पवार, सर्व गटविकास अधिकारी, तालुका कृषि अधिकारी यांची उपस्थिती होती.

जिल्हाधिकारी श्री. गुप्ता म्हणाले, जिल्ह्यात रोहयोची मंजूर असलेली सर्व कामे वेळेत आणि जलदगतीने पूर्ण करावीत. मजुरांचे हजेरी पट वेळेत तातडीने पूर्ण करा. तसेच त्यांचे वेतन अदा करण्याची कार्यवाही तातडीने करावी. मजुरांचे वेतन अदा करण्यास विलंब झाल्यास संबंधितावर दंडात्मक कारवाई करावी. त्याला वेळ लागणार नाही याची दक्षता घ्यावी. रेशीम लागवड, फळबाग लागवड, चारा लागवड यासह विविध कामांना वेळेत तांत्रिक मान्यता देण्याची कार्यवाही करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी संबंधित अधिका-याला दिल्या. दि. २८ एप्रिल व १ मे रोजी होणाऱ्या ग्रामसभेत विविध योजनेचे जास्तीत जास्त प्रस्ताव मागवून घ्यावेत. योजनांचा लाभ जास्तीत जास्त लोकांना मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्याच्या सूचनाही यावेळी त्यांनी दिल्या.

तसेच प्रधानमंत्री आवास टप्पा दोन मधील ३९४४ घरकुलांना तात्काळ मंजुरी द्यावी तसेच घरकुलाचा पहिला हप्ता १० हजार ४८३ लाभार्थ्यांना ३० एप्रिलपर्यंत त्यांच्या बँक खात्यावर जमा करावा. अपूर्ण बांधकाम झालेली घरे तात्काळ पूर्ण करावीत. तसेच घरकुल योजनेच्या लाभार्थ्यांना त्यांच्या जागेत ५ झाडे लावण्यासाठी प्रोत्साहित करावे. घरकुलांसाठी जागा नसलेल्या लाभार्थ्यांना गावठाण विस्तारामध्ये जागा उपलब्ध करुन देण्यासाठी ग्रामपंचायतीने पुढाकार घेऊन प्रस्ताव सादर करावेत. त्यास मान्यता देण्यात येईल. तसेच आवास योजनेची प्रलंबित प्रकरणे तात्काळ निकाली काढावीत, अशा सूचना जिल्हाधिकारी श्री. गुप्ता यांनी दिल्या.

स्वच्छ भारत अभियान ग्रामीण अंतर्गत आढावा घेताना जिल्हाधिकारी श्री. गुप्ता यांनी सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापनाच्या कामाला गती द्यावी, कुटुंबाना वैयक्तिक कचरा कुंडी तसेच गावात सार्वजनिक कचराकुंडी उपलब्ध करून द्यावी व गावे ओडीएफ प्लस मॉडेल करावीत, वैयक्तिक शौचालय पूर्ण करावेत तसेच मोठ्या शाळांना सार्वजनिक शौचालय उपलब्ध करून द्यावेत, अशा सूचना देत यासंदर्भात सविस्तर आढावा घेतला व पुढील बैठकीत याचा प्रगती अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

जिल्ह्यात जलजीवन मिशनची ६१६ कामे प्रस्तावित असून, २०१ कामे पूर्ण झालेली आहेत. प्रलंबित कामे तात्काळ पूर्ण करावीत. जागेचा किंवा इतर काही वाद असल्यास ते तात्काळ सोडविण्यात यावेत. यासाठी पोलीस संरक्षणाची गरज भासल्यास तसे कळवावे. त्यानुसार आपणास पोलीस संरक्षण देण्यात येईल. जलजीवन मिशन अंतर्गत प्रत्येक घरामध्ये पाणी पोहोचविण्यासाठी 'हर घर जल' मोहिम यशस्वीपणे राबवावी. काम करण्यास अडचण येत असलेल्या गावांची यादी तयार करावी. त्या सोडविण्यासाठी प्रयत्न करण्यात येईल, असे जिल्हाधिकारी श्री. गुप्ता यांनी यावेळी सांगितले. जलयुक्त शिवार अभियान २.० अंतर्गत ७३ गावांची निवड करण्यात आली होती. निवड केलेल्या गावांमध्ये विविध विभागाने ७८.७५ कोटी रुपयांच्या १८०५ कामांचा आराखडा प्रस्तावित करण्यात आला होता. त्यापैकी विविध विभागाने ११५५ कामे पूर्ण करण्यात आली आहेत, तसेच पूर्ण झालेल्या कामावर २३.९८ कोटी खर्च करण्यात आलेला आहे. १०४ कामे प्रगतीपथावर आहेत. प्रकल्पनिहाय प्रलंबित कामाचा आढावा घेऊन ती कामे तात्काळ पूर्ण करावेत. जलशक्ती अभियानांतर्गत 'कॅच दि रेन' उपक्रम राबवावा. पाण्याच्या स्त्रोताच्या ठिकाणी शोषखड्डे (रिचार्ज शॉफ्ट) घेण्यात यावेत, अशा सूचना जिल्हाधिकारी श्री. गुप्ता यांनी दिल्या.